संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २५८ * * अमरावती * | शुक्रवार, दिनांक १४ मार्च २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)



।। परमात्मा एक ।।
मानव इंटरप्रायजेस मोबाईल शॉप
टि.व्ही. फ्रिज, वॉशिंग मशीन, मोबाईल रिचार्ज


7020267005 गजानन देशमुख 9284478885 सिद्धांत देशमुख
प्लॉट नं. ११, दुर्गा नगर, भरतवाडा, नागपूर-०४


अग्राग्रलेख

## खरीखरी..

## तरुणाई नशेच्या विळख्यात

आज एका वर्तमानपत्रातील बातमी वाचून आमचे डोकेच फिरले आहे. छत्रपती संभाजी नगर शहरातील हे प्रकरण नशेखोरीचे आहे. चांगल्या उच्चभ्रू वस्तीमधील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत 14 ते 16 वर्षे वयाच्या पाच मुली सिगारेट, गांजा, दारू यासारख्या व्यसनाच्या जाळ्यात अडकलेल्या आहेत. आपल्या महाराष्ट्रातील दामिनी पथकाने यापैकी एका मुलीला ताब्यात घेऊन तिला बालसुधार गृहात पाठवले आहे. ही नशेखोरी किती खोलपर्यंत पसरलेली आहे. याचाच हा नमुना आहे. आठवी आणि नववीच्या वर्गात असणा?्या या मुलींकडे एवढे धाडस कसे आले. याचा शोध घेतल्यानंतर एका मुलीचे वडील दररोज दारू पिऊन टून्न असतात. हे निष्पन्न झाले. मात्र गरीब बिचारी आई दुस?्याच्या घरी धुणीभांडी करून कुटुंबाचे पालन पोषण करते. म्हणजे तिचे उत्पन्न असे किती असावे, याची कल्पना सर्वांनाच येईल. जीवाचा आटापिटा करून त्या माऊलीने आपल्या पोरीला चांगले शिक्षण मिळावे. म्हणून महागड्या शाळेत दाखल केले. पुढे ही मुलगी शिकून चांगले नाव काढणार, अशी अपेक्षा असताना ही पोट्टी काय दिवे लावत आहे. हे दिसल्यावर बिचा?्या आईच्या अंतःकरणाला किती वेदना होत असतील. याची कल्पना तरी आपण करू शकतो का. आधी सिगारेट, नंतर बियर, नंतर दारू आणि आता गांजा इथपर्यंत ही मुलगी पोहोचलेली आहे. त्याच परिसरातील काही टारगट पोरांनी या मुलींना वाम मार्गावर इतक्या पुढे नेऊन कसे काय सोडले, हे सुद्धा कोडेच आहे. नव्हे, हे कोडे नाही तर ही वस्तुस्थिती आहे. त्या मुलींच्या नशेखोरीमुळे त्यांच्या शाळा बंद आहेत. पालक त्रस्त आहेत आणि या मुली समजतात की आपण नशेत मस्त आहोत. आता सांगा अशा स्थितीत आपली तरुणाई कुठे चाललेली आहे, हे दिसल्यावर तळपायाची आग मस्तकात जाईल नाहीतर काय होईल. आता तर असे म्हणतात की या मुली आईबापांना जुमानत नाहीत. यांची मजल मारहाणी पर्यंत गेलेली आहे. अगदी किशोरवयीन मुला-मुलींपासून तरुणाई नशेच्या विळखत अडकत चालल्याने अशा प्रकरणांकडे कानाडोळा करता येणार नाही. अर्थात हे एक प्रकरण उघड झाले, म्हणून आपल्याला कळले. पण अशा कितीतरी अज्ञात असलेल्या प्रकरणांची चौकशी कोण करणार. एकूणच आपल्या समाजाला नशाखोरीने कोणत्या वळणावर नेऊन सोडलेले आहे. हे पाहिल्यावर मनाला वेदना होतात. घरात बापाची दारूखोरी दिसल्यावर मुलीनेही तोच मार्ग निवडला, तर दोष कोणाला देणार. ही बातमी वाचून कोण सुन्न होणार नाही. एकूणच आपली किशोरवयीन पिढी कोणत्या मार्गाने कुठे जात आहे. याचा अत्यंत गंभीरपणे विचार करण्याची वेळ आलेली आहे.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सर्वच स्पर्धा परीक्षा

# यापुढे मराठीतूच होणार!

मुख्यमंत्री फडणवीसांची विधान परिषदेत माहिती

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १३ :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सर्वच परीक्षा मराठीतून घेण्याची योजना राज्य सरकार करत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

आमदार मिलिंद नार्वेकर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा मराठी मध्ये घेण्याविषयी प्रश्न उपस्थित केला होता. कृषी आणि अभियांत्रिकी विद्या शाखांसंदभार्तील काही परीक्षा इंग्रजीमध्येच घेतल्या जात असल्याचे ते म्हणाले होते.

त्यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी एमपीएससीच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या सर्व स्पर्धा परीक्षा मराठीमध्ये घेतल्या जातील, अशी घोषणा केली.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत घेण्यात येणाऱ्या बऱ्याच परीक्षा या मराठीतून होत असतात. मात्र, अभियांत्रिकी आणि कृषी विषयक तांत्रिक पदांच्या परीक्षा मराठीमध्ये घेतल्या जात नाहीत.

या परीक्षा इंग्रजीमध्येच घेतल्या जातात. यासंदर्भात विधान परिषदेमध्ये सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता. यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपरोक्त माहिती दिली.

मूळात या ज्या परीक्षा आहेत, त्या मराठी आणि इंग्रजी दोन्हीमध्ये घेतो, पण न्यायालयाने आपल्याला असा एक निर्णय दिला होता की, त्यातील काही परीक्षा अशा आहेत. कृषी अभियांत्रिकीशी संबंधित ज्या परीक्षा आहे, त्या आपण मराठीत घेत नाहीत, इंग्रजीतच घेतो. न्यायालयासमोर हा विषय गेल्यानंतर एक बैठक



झाली आणि त्या बैठकीत असा विषय आला की, याची पुस्तके उपलब्ध नाहीत. ते न्यायालयाच्याही निदर्शनास आणून देण्यात आले. न्यायालयानेही ते मान्य केले, असे फडणवीस यांनी सांगितले.

जरी याची पुस्तके उपलब्ध नसतील, तरी नव्या शैक्षणिक धोरणामध्ये अभियांत्रिकी देखील मराठीत घेण्याची मुभा मिळालेली आहे. टेक्निकल कोर्सेस ज्याची एमपीएससी परीक्षा मराठीमध्ये घेत नाहीत. कारण त्याची पुस्तके उपलब्ध नाहीत. त्याची पुस्तके तयार करण्यात येतील. एमपीएससीशी बोलू आणि त्याही परीक्षा या मराठीमध्ये घेण्यात येतील, असेही फडणवीस म्हणाले.

### एसटीच्या भाडेतत्त्वावरील बसमध्ये १७०० कोटींचा घोटाळा : महिनाभरात कारवाई

महायुती सरकार आकार घेत असतानाच राज्य परिवहन महामंडळाकडून भाडेतत्वावर घेण्यात येणाऱ्या १३१० बसमध्ये सुमारे १७०० कोटींचा घोटाळा झाल्याची बाब उघडकीस आली. हे प्रकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास येताच, तातडीने निविदा प्रक्रियेला स्थगिती देत, चौकशीचे आदेश दिले. महिनाभरात या प्रकरणाचा चौकशी अहवाल सादर होणार असून त्यानंतर दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही फडणवीस यांनी परिषदेत दिली.

राज्य परिवहन महामंडळामार्फत भाडेतत्वावर बस घेण्यासाठी काढलेल्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा तारांकित प्रश्न राजेश राठोड यांनी विचारला. आमदार अनिल परब, भाई जगताप यांनी तत्कालीन मुख्यमंत्री तथा परिवहन मंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळातील असल्याचे म्हटले. त्यांनी सरकारला धारेवर धरले. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी, महामंडळाची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन भाडेतत्वावर बस घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबवली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यानंतर यावर स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले की, सरकार स्थापनेच्या कालावधीत हा प्रकार घडला होता. मंत्रिमंडळाचा विस्तार झाला नसताना, याची वर्क ऑर्डर दिली. महामंडळाचे १७०० कोटींचे याच नुकसान होत होणार होते. ही बाब निदर्शनास आल्यानंतर तातडीने निविदा प्रक्रियेला स्थगिती देत चौकशी सुरू केली आहे. अहवाल आल्यावर कारवाई केली जाईल.

## औरंगजेबाची कबर नष्ट करा

शिंदेसेना खासदार म्हस्के यांची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी,मुंबई, दि. १३ :**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी छत्रपती संभाजीनगर लगतच्या खुलताबाद येथील मोगल बादशहा औरंगजेब यांची कबर नष्ट करण्याची मागणी केली आहे.



भारतीय पुरातत्व सर्वेक्षण अर्थात एएसआने संरक्षित केलेल्या देशातील 3,691 स्मारक व कबरींपैकी 25 टक्के कबरी व स्मारके ही देशाच्या संस्कृतीविरोधात काम करणाऱ्या मोगल व ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या असल्याचे ते म्हणालेत.

खासदार नरेश म्हस्के लोकसभेत बोलताना खुलताबाद येथील मोगल बादशहा औरंगजेब यांची कबर नष्ट करण्याची मागणी केली. सभागृहाच्या शून्य प्रहरात त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला. ते सभागृहात म्हणाले की, औरंगजेबासारख्या क्रूर व्यक्तीची कबर संरक्षित करण्याची काहीच गरज नाही. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय) द्वारा संरक्षित 3,691 स्मारके आणि कबरींपैकी 25 टक्के मुघल आणि ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या आहेत, ज्यांनी देशाच्या संस्कृती आणि परंपरांच्या विरोधात काम केले.

म्हस्के पुढे म्हणाले की, औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांची हत्या केली. हिंदू मंदिरे उद्ध्वस्त केली व लुटली. औरंगजेबाने शिखांच्या नवव्या आणि दहाव्या गुरूंचीही हत्या केली. औरंगजेबासह भारताविरोधात काम करणाऱ्या सर्वांची स्मारके नष्ट करावीत.

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांच्या एका विधानामुळे औरंगजेबाचा वाद तापला आहे. मुंबईतील एका न्यायालयाने मंगळवारी अबू आझमी यांना औरंगजेबाची प्रशंसा केल्याप्रकरणी त्यांच्यावर दाखल गुन्ह्याप्रकरणी जामीन मंजूर केला होता.

## शिवनेरी बसने तिघांना उडवले

शरद पवारांच्या पक्षाचा कार्यकर्ता ठार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १३ :**

मुंबई महामंडळाच्या शिवनेरी बसने बुधवारी मध्यरात्री मुंबईच्या प्रभादेवी भागात होळीच्या पूजेसाठी फुले आणायला गेलेल्या तिघांना उडवले. त्यात एका तरुणाचा मृत्यू झाला असून, इतर दोघे गंभीर जखमी झाले आहे.

प्रणय बोडके (29) असे मृत तरुणाचे नाव आहे. बुधवारी मध्यरात्री ते आजच्या होळीच्या पूजेसाठी फुले आणण्यासाठी दुचाकीवरून दादरच्या फुल बाजारात जात होते. प्रणयसोबत त्याचा मित्र करण शिंदे (29) व दुर्वेश गोरडे हे दोघेही होते. हे तिघेही प्रभादेवी भागात आले असता एसटी महामंडळाच्या बसने चुकीच्या दिशेने येऊन त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. त्यात हे तिघेही गंभीर झाले.

स्थानिकांनी त्यांना तत्काळ केईएम रुग्णालयात दाखल केले. तिथे प्रणयचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर दुर्वेश व करण गंभीर जखमी झालेत. त्यांच्यावर ग्लोबल रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दुसरीकडे, पोलिसांनी या अपघाताप्रकरणी एसटी चालक इक्बाल शेख याला अटक केली आहे. अपघातानंतर तो घटनास्थळावरून पळून जाण्याच्या प्रयत्नांत होता.

पण स्थानिकांनी त्याला पकडून भोईवाडा पोलिसांच्या ताब्यात दिले. मृत तरुणाच्या पश्चात पत्नी, आई-वडील व दीड वर्षांचा मुलगा असा परिवार आहे. प्रणय हा त्याच्या घरातील एकटाच कमावणारा होता.

### सुटीची सूचना

आज शुक्रवार दि. १४ मार्च रोजी धुळीवंदन निमित्त दै. महासागरच्या कार्यालय व मुद्रण विभागास सुट्टी असल्यामुळे १५ मार्चचा अंक प्रकाशित होणार नाही. याबाबत वाचक, जाहिरातदार व एजंटांनी नोंद घ्यावी.

**व्यवस्थापक**

## विद्यार्थिनीवर ६ मुलांचा १६ महिने बलात्कार

■ **वृत्तसंस्था, बनासकांठा (गुजरात), दि. १३ :**

गुजरातच्या बनासकांठा जिल्ह्यातील पालनपूरमध्ये, सहा मुलांनी एका महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर १६ महिने बलात्कार केला. एका आरोपीने मुलीचा अश्लील व्हिडिओ बनवला आणि नंतर तिला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. नंतर त्याच्या मित्रांनीही मुलीवर बलात्कार करण्यास सुरुवात केली. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी ६ मुलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यापैकी एक मुलगा अल्पवयीन आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सहा आरोपींपैकी एक असलेल्या राहुल शामलभाई फोपने २० वर्षीय विद्यार्थिनीशी इंस्टाग्रामवर मैत्री केली होती. ती विद्यार्थिनी तेव्हाच कॉलेजला जाऊ लागली होती. नोव्हेंबर २०२३ मध्ये, आरोपी राहुलने तिला त्याच्यासोबत एका हॉटेलमध्ये जेवणासाठी नेले. तिथे त्याने जाणूनबुजून तिचे कपडे घाणेरडे केले आणि त्यावर अन्न सांडले. यानंतर, तो तिला कपडे स्वच्छ करण्यास सांगून हॉटेलच्या खोलीत घेऊन गेला. दरम्यान, मुलगी बाथरूममध्ये कपडे काढून स्वच्छ करत असताना तिचा अश्लील व्हिडिओ बनवण्यात आला.

व्हिडिओ बनवल्यानंतर, व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन राहुलने तिच्यावर बलात्कार केला. नंतर, आरोपीने त्याचे मित्र दीपक नरसंगभाई फोप, आशिष शामलभाई फोप, जिगर गालभाभाई बोका आणि शुभम घेमरभाई भूतडिया आणि एका अज्ञात व्यक्तीने विद्यार्थिनीवर बलात्कार केला. एफआयआरनुसार, आरोपीने नोव्हेंबर २०२३ ते मार्च २०२५ या कालावधीत विद्यार्थिनीला पालनपूर न्यू बस पोर्टमधील अनेक गेस्ट हाऊस आणि कॅफेमध्ये नेले आणि तिच्यावर बलात्कार केला. एवढेच नाही तर मुलीचा व्हिडिओही व्हायरल करण्यात आला.

यानंतर मुलीने तालुका पोलिस ठाण्यात सहा जणांविरुद्ध नावाची तक्रार दाखल केली. पोलिसांनी सर्व ६ आरोपींची ओळख पटवली आहे. सर्व आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

## दारुवरून मारहाणीत धाकट्याचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १३ :**

जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील व आदिवासी बहुल संग्रामपूर तालुक्यातील खिरोडा येथे बुधवारी, रात्री उशिरा हा खळबळजनक घटनाक्रम घडला. मंगेश विठ्ठल भिवटे असे मृत युवकाचे नाव आहे.

मंगेशला दारूचे व्यसन होते. तो दररोज रात्री दारू पिऊन घरी यायचा. त्यामुळे घरची मंडळी कंटाळली होती. तसेच मोठा भाऊ संदीप विठ्ठल भिवटे यालाही लहान भावाचे असे वागणे पसंत नव्हते.

बुधवारी रात्री उशिरा दारु पिऊन घरी का येतो या कारणा वरून दोघा भावामध्ये पुन्हा कडाक्याचा वाद झाला. याचे पर्यवसन हाणामारीत झाले. यावेळी मोठा भाऊ असलेल्या संदीप भिवटे याने चुल फुंकण्याच्या लोखंडी फुकणी व फायबरच्या फावडयाच्या दांड्याने मंगेश ला मारहाण केली. यावेळी डोक्यात, तोंडावर पाठीला जबर मार लागल्याने मंगेश गंभीर जखमी झाला.त्याच्या तोंडातून रक्त निघाले आणि तो बेशुद्ध झाला. या अत्यवस्थ स्थितीत नातेवाईकांनी उपचारासाठी १०८ रुग्णवाहिकेव्दारे शेगाव येथे हलविले. मात्र उपचार दरम्यान मंगेश मृत्यूमुखी पडला.

दरम्यान वैदकीय अहवाल चौकशी अंती संग्रामपूर तालुक्यातील तामगाव पोलीस ठाण्यात आरोपी संदिप विठ्ठल भिवटे याच्या विरुध्द कलम १०३ (१) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला बुधवारी रात्री उशिरा आरोपी मोठ्या भावाला (संदीप भिवटे) याला तामगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने अटक केली.

## देशी कट्टा व जिवंत काडतुस जप्त

■ **महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १३ :**

गावठी बनावटी देशी कट्टा तसेच एक नग जिवंत ९ एम.एम. काडतुस जप्त करण्यात आली. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. आरोपीचे नाव संगम संभाजी सागोरे (२८) असे आहे.

रेकॉर्ड वरील आरोपी संगम संभाजी सागोरे (२८) धंदा-ठेकेदारी, रा. मित्रनगर, आंबेडकर कॉलेज मागे, चंद्रपूर हा स्वतः जवळ अग्निशस्त्र (हत्यार) बाळगुन चुनाभट्टी बस स्टॉफ येथे बसलेला आहे अशा माहितीवरून आरोपीस पंचासमक्ष ताब्यात घेवुन त्याचेकडुन एक गावठी बनावटी देशी कट्टा तसेच एक नग जिवंत ९ एम.एम. काडतुस जप्त करून आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन, बल्लारपूर येथे भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करून पुढील तपास पोलीस स्टेशन बल्लारपूर येथे ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधिक्षक मुम्मका



सुदर्शन, अप्पर पोलीस अधिक्षक रिना जनबंधु यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचे नेतृत्वात पोउपनि विनोद भुरले, पोउपनि सुनिल गौरकार, सुभाष गोहोकार, सतिश अवथरे, रजनिकांत पुठ्ठवार, दिपक डोंगरे, प्रशांत नागोसे, किशोर वाकाटे, शशांक बदामवार, अमोल सावे, दिनेश अराडे यांनी केली.

## दिल्लीत ब्रिटीश तरुणीवर रेप

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :**

दिल्लीतील महिपालपूर येथील एका हॉटेलमध्ये एका ब्रिटिश महिलेवर बलात्कार आणि विनयभंगाचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात वसंत कुंज पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. या घटनेची माहिती ब्रिटिश उच्चायुक्तालयाला देण्यात आली आहे.

पीडित महिला इंग्लंडची आहे. ती काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र आणि गोवा दौऱ्यावर आली होती. पीडितेची इन्स्टाग्रामवरून आरोपी तरुण कैलाशशी मैत्री झाली होती. ती महिला त्या तरुणाला भेटण्यासाठी गोव्याहून दिल्लीला आली होती. दोघेही एका हॉटेलमध्ये थांबले, जिथे त्या तरुणाने महिलेवर बलात्कार केला. ती महिला कशीतरी हॉटेलच्या रिसेप्शनवर पोहोचली, पण ती निघून जाण्याचा प्रयत्न करत असतानाच दुसऱ्या एका पुरूषाने लिफ्टमध्ये तिचा विनयभंग केला.

भाजपच्या अध्यक्षपदावरून

## संघ, भाजपात वाद

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :**

'भाजपला नवीन अध्यक्षपदासाठी जेपी नड्डा यांच्यासारखे नाव हवे आहे. दुसरीकडे, संघाला अशा व्यक्तीची आवश्यकता आहे जो संघटनेसाठी विश्वासार्ह असेल, ज्याचा संघाच्या पद्धती आणि धोरणांचे पालन करण्याचा हेतू असेल. किमान नड्डा किंवा नड्डांसारखा कोणताही नेता या परीक्षेत अजिबात उतरत नाही.

भाजपचा पुढचा अध्यक्ष कधी निवडला जाईल? या प्रश्नाचे उत्तर देताना, आरएसएसमधील आमच्या एका सूत्राने भाजप आणि आरएसएसमधील सुरू असलेल्या संघर्षाकडे लक्ष वेधले आहे. त्यांच्या मते, नवीन अध्यक्षाच्या नावावर पक्ष आणि संघटनेत एकमत नाही. यामुळे विद्यमान राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांना 40 दिवसांची मुदतवाढ मिळाली आहे. याचा अर्थ असा की 20 एप्रिलपूर्वी नवीन अध्यक्षाचे नाव जाहीर करणे कठीण आहे.

भाजपचा नवीन अध्यक्ष निवडता न येण्याचे एक कारण म्हणजे ३६ पैकी २४ राज्य घटकांमध्ये संघटनात्मक निवडणुका घेण्यात अपयश. राष्ट्रीय अध्यक्ष निवडण्यासाठी आणखी ६ राज्यांमध्ये प्रदेशाध्यक्षांची निवड करणे आवश्यक आहे. पण आता संघ व भाजपा आमनेसामने उभे ठाकले आहेत.

## अवैध सावकार वैभव देवरेसह टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई

■ **महासागर प्रतिनिधी नाशिक, दि. १३ :**



अवैध सावकारी करून लोकांची फसवणूक करणाऱ्या वादग्रस्त वैभव देवरे आणि त्याच्या टोळीवर पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे. नागरिकांना सुरक्षा आणि न्याय मिळावा यासाठी देवरेवर मोक्का अंतर्गत ही कारवाई केली आहे. पोलिसांनी केलेल्या कारवाईचे स्वागत केले जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून वादग्रस्त सावकार वैभव देवरे याचे अनेक गुन्हेगारी कृत्य उघडकीस आले होते वैभव देवरे च्या जाचाला कंटाळून काहींनी आत्महत्या देखील केल्या आहेत या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी वैभव देवरे विरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केले आहेत

त्यामध्ये अंबड पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीनुसार अवैध सावकार वैभव देवरे आणि त्याच्या साथीदारांनी बनावट जमीन कागदपत्रे तयार केली. ही कागदपत्रे खरी असल्याचं भासवून, त्यानी हिरावाडी आणि सारूळ येथील जमिनींचा व्यवहार ३.०५ कोटी रुपयांमध्ये ठरवला. फिर्यादीने व्यवहारासाठी ६३.४९ लाख रुपये दिले, पण त्यानंतरही कोणतीही जमीन त्यांच्या नावावर न करता फसवणूक केली.

यातील फिर्यादींनी पैसे परत मागितले असता, आरोपींनी टाळाटाळ केली. शिवाय, आरोपी वैभव देवरे याने आपल्या सावकारी व्यवसायासाठी फियार्दीकडून आरोपी सोनल देवरेच्या खात्यावर रोख स्वरूपात जबरदस्तीने ३५ लाख रुपये घेतले.

जेव्हा फिर्यादीने पैसे परत मागण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आरोपींनी त्यांना खोटी विनयभंगाची तक्रार करण्याची आणि जिवे मारण्याची धमकी दिली.

या टोळीने लोकांकडून जबरदस्तीने पैसे वसूल केले. नकार दिल्यास धमकी, मारहाण, खंडणी, विनयभंग आणि खुनाचा प्रयत्न या स्वरूपाचे गंभीर गुन्हे केले टोळी प्रमुख वैभव देवरे, गोविंद ससाणे, सोनल देवरे आणि निखील पवार यांच्यावर आधीपासूनच इंदिरानगर, अंबड, गंगापूर आणि मुंबई नाका पोलीस ठाण्यात १५ गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यांमध्ये आर्थिक फसवणूक, खंडणी, जबरदस्तीने पैसे वसूल करणे, धमकी देणे, आणि लोकांमध्ये दहशत पसरवणे यांचा समावेश आहे.

# डिजिटल अटक प्रकरणांत ८३ हजारावर व्हॉटसअॅप खाती बंद

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :**

गृह मंत्रालयाने दिली माहिती : 4386 कोटींचे नुकसान टळले

गृह मंत्रालयाने बुधवारी राज्यसभेत सांगितले की, सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटरने डिजिटल अटक प्रकरणांमध्ये सहभागी असलेल्या 3,962 हून अधिक स्काईप आयडी आणि 83,668 व्हॉटसअॅप अकाउंटची ओळख पटवली आहे आणि ते ब्लॉक केले आहेत. आय4सी ही सायबर गुन्ह्यांवर लक्ष ठेवण्यासाठी गृह मंत्रालयाची एक विशेष शाखा आहे.

द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक) खासदार तिरुची शिवा यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात गृह राज्यमंत्री संजय बंदी कुमार यांनी ही लेखी माहिती दिली. ते म्हणाले की, सायबर गुन्हेगारांनी ईडी, सीबीआय सारख्या एजन्सीचे अधिकारी असल्याचे भासवून फसवणूक करण्यासाठी या खात्यांचा वापर केला. याशिवाय, २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत ७.८१ लाखांहून अधिक सिम कार्ड आणि २.०८ लाखांहून अधिक आयएमईआय क्रमांक ब्लॉक करण्यात आले आहेत. त्याच वेळी, १३.३६ लाखांहून अधिक तक्रारींच्या आधारे, ४३८६ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे नुकसान टाळता आले.

स्पूफ कॉल ओळखण्यासाठी सिस्टम सज्ज गृह राज्यमंत्र्यांनी सांगितले की, केंद्र सरकार आणि दूरसंचार सेवा प्रदात्यांनी (ळरढ) आंतरराष्ट्रीय स्पूफ कॉल ओळखण्यासाठी आणि ब्लॉक करण्यासाठी एक प्रणाली विकसित केली आहे.




जेव्हा असे कॉल येतात तेव्हा मोबाईलवर भारतीय नंबर दिसतो, जरी तो कॉल परदेशातून येत असला तरी. टीएसपींना असे कॉल ब्लॉक करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याशिवाय सायबर गुन्ह्यांबाबत तक्रार करण्यासाठी १९३० हा टोल-फ्री हेल्पलाइन क्रमांक सुरू करण्यात आला आहे. जागरूकता वाढवण्यासाठी प्रादेशिक भाषांमध्ये जागरूकता वाढवणारे कॉलर ट्यून प्रसारित केले जात आहेत. रिझर्व्ह बँकेच्या एका अहवालानुसार २०२३ मध्ये देशात ३० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त फसवणूक झाली. त्याच वेळी, गेल्या १० वर्षांत, बँकांनी सायबर फसवणुकीची ६५,०१७ प्रकरणे नोंदवली. ज्यामध्ये एकूण ४.६९ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले.

फेसबुक, इंस्टाग्राम प्रोफाइल खाजगी ठेवा. अनोळखी व्यक्तींकडून आलेल्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका. बहुतेक प्रकरणांमध्ये, सायबर गुन्हेगार गुन्हा करण्यापूर्वी या सोशल साइट्सवरून लोकांची माहिती गोळा करतात.

# पब्लिसिटीसाठी महापुरुषांबाबत बोलणे योग्य नाही

## राधाकृष्ण विखे पाटीलही नितेश राणेंच्या वक्तव्याने नाराज



■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई , दि. १४ :** केवळ स्वत:च्या प्रसिद्धीसाठी देशातील महापुरुष यांच्याबाबत बोलणे योग्य नाही. देशातील महापुरुषांवर केलेल्या कोणत्याही विधानाचे कोणीही समर्थन करू शकत नसल्याचे भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले आहे. मंत्री नितेश राणे यांना अजित पवार यांनी समज दिल्यानंतर यावर आता भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांकडून देखील प्रतिक्रिया येत आहेत. महापुरुषांवर विनाकारण बोलण्याची आवश्यकता नसल्याचे विखे पाटील यांनी म्हटले आहे. व्यक्ती कोणत्याही पक्षातला असो, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या विषयी बोलतात काळजी घ्यायला हवी. तसेच अशा वक्तव्ये न करण्याचा सल्ला अजित पवार यांनी नितेश राणे यांना दिला होता. या माध्यमातून नितेश राणे यांना समज देण्याचा प्रयत्न अजित पवारांनी केला होता. या संबंधीत बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, अजित पवार यांच्या वक्तव्याचे मी समर्थनच करतो. आमच्या महापुरुषांवर कोणी टिप्पणी करत असेल, तर त्याचे कोणीही समर्थन करणार नाही. आमचे महापुरुषांची एक गरिमा आहे, त्यांची गरिमा आणि पावित्र जपले पाहिजे. त्यामुळे अजित पवार जे बोलले ते एकदम योग्य आहे. केवळ पब्लिसिटीसाठी जे लोक बोलतात, ते देखील स्वत:ची प्रतिमा मलीन करत असल्याचा त्यांनी विचार करायला हवा, असे देखील राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले आहे.

**नेमके राणेंचे वक्तव्य काय ?**

नीतेश राणे म्हणाले होते की, औरंगजेबची कबर उखडून काढू. सरकारने काढली नाही, तर आम्ही काढू. कबर काढण्यासाठी लाँग मार्च काढू. आम्ही हिंदू म्हणून व्यासपीठावर एकत्र आहोत. कसबा शास्त्रीपूल या ठिकाणी छत्रपती संभाजी महाराज धर्मरक्षण दिन समितीच्या वतीने संभाजी महाराज धर्मरक्षण दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री नीतेश राणे बोलत होते.

नीतेश राणे म्हणाले की, आमच्यातील काही कारटे सांगतात की शिवाजी महाराज यांच्या सैन्यात मुस्लीम होते, कोण मुसलमान शिवरायांच्या सैन्यात नव्हते. ही लोकं उगाच टेप रेकॉर्डर चालवतात. स्वराज्याची लढाई ही इस्लामच्या विरोधातच होती.

हिंदू-विरुद्ध मुसलमान होती. औरंग्याची निशाणी नष्ट केली आहे, आता कबरही उखडून काढू. तर छत्रपती संभाजी महाराज यांचे कसबा येथे असे स्मारक उभारू की, जगभरातील सर्वजण या ठिकाणी येऊन नतमस्तक होतील, असे मंत्री नीतेश राणे यांनी म्हटले आहे. नीतेश राणे पुढे बोलताना म्हणाले की, औरंगजेबाची कबर उखडण्यासाठी तारीख किंवा वेळ घोषित केली जाणार नाही, लाँग मार्च काढू. आपल्या नावापुढे जी हिंदू नावे दिसत आहे ही फक्त धर्मवीर संभाजी महाराज यांच्यामुळेच लागली आहेत.

**उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून समज देण्याचा प्रयत्न**

मंत्री नीतेश राणे यांच्या वक्तव्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी स्पष्ट शब्दांत त्यांची कानउघाडणी केली.

ते म्हणाले की, दोन्हीही बाजूच्या सन्मानीय सदस्यांनी कुठल्याही प्रकारची कायदा सुव्यवस्था अडचणीत येणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. ज्यांचे देशावर प्रेम आहे, असा मुस्लीम समाज मोठ्या प्रमाणात भारतात आणि महाराष्ट्रात आहे. छत्रपती शिवरायांच्यासोबत मुस्लीम लोकही होते. त्यांचा दारूगोळा कोण सांभाळत होते? किती तरी उदाहरणे आपल्याला देता येतील.

त्यामुळे त्यांनी असे वक्तव्य का केले, त्यांच्या वक्तव्यामागील हेतू काय होता, तो मला माहिती नाही. आपल्या देशाबद्दल अभिमान वाटणारा जो-जोमुस्लीम घटक आहे, तो देशप्रेमीच आहे.

## महिलेसह प्रियकराची रेल्वेखाली आत्महत्या

**नांदगाव :** वारंवार दिल्या जाणाऱ्या धमक्यांना कंटाळून महिला आणि तिच्या प्रियकराने रेल्वेखाली झोकून देत आत्महत्या केली. नांदगाव तालुक्यातील नस्तनपूर येथील शनिदेव मंदिराजवळ ही घटना घडली. आत्महत्येस प्रवृत्त केल्याने १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येवला तालुक्यातील व्यक्तीने यासंदर्भात नांदगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, नांदगाव तालुक्यात राहणाऱ्या त्यांच्या बहिणीचे तिच्या गावातील एकाशी प्रेमसंबंध होते. मात्र, गावातील काही लोकांनी त्यांच्या नात्याला विरोध करत त्यांना वारंवार धमक्या दिल्याने मानसिक छळाला कंटाळून दोघांनी आत्महत्या केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

संबंधित महिलेने तिच्या भावाला व्हॉट्स पवर संदेश पाठवला. त्यात तिने आत्महत्येस जबाबदार असलेल्या १६ जणांची नावे नमूद केली होती. महिलेचे नातेवाईक मनमाड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यासाठी गेले असता तिथे त्यांना महिलेसह तिच्या प्रियकराने रेल्वेखाली आत्महत्या केल्याची माहिती मिळाली. आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयितांपैकी दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# गणेशमूर्तींबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका मुख्यमंत्र्यांची विधान परिषदेत घोषणा



■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई , दि. १३ :** प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींमुळे प्रदूषण होते किंवा नाही, याचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन केली जाईल. या समितीचा अहवाल येईपर्यंत पीओपी गणेशमूर्तींचा वापर करण्यासाठी मुदतवाढ मिळावी, यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे पीओपी गणेशमूर्तींचा मुद्दा उपस्थित केला. या मूर्तींच्या वापरास बंदी घातल्यामुळे एकीकडे हजारो कामगार बेकार होणार आहेत, तर दुसरीकडे पीओपी गणेश मूर्तींच्या वापरामुळे पर्यावरणाची हानी होण्याची भीती आहे. त्यामुळे राज्य सरकारची नेमकी भूमिका काय, अशी विचारणा दानवे यांनी केली होती. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सरकार प्रदूषणाविरोधात आहे. पीओपीतील प्रदूषण संपवता येईल का किंवा कमी करता येईल का, यातून काही मार्ग काढता येईल का, यासाठी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. या समितीचा अहवाल येईपर्यंत न्यायालयाने आम्हाला मुदतवाढ द्यावी, यासाठी राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणार आहे.

# न्यायालयाची सरकारला विचारणा

**मुंबई , दि. १२ :** बदलापूर येथील बालवाडीतील दोन बालिकांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप असलेला आरोपी अक्षय शिंदे याच्या कथित चकमकीचा अपघाती मृत्यू म्हणूनच तपास करणार का? अशी विचारणा उच्च न्यायालयाने बुधवारी राज्य सरकारला केली. या प्रकरणाची अपघाती मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली असून गुन्हे अन्वेषण विभागातर्फे (सीआयडी) स्वतंत्र चौकशी सुरू आहे. या चौकशीअंतीच याप्रकरणी गुन्हा दाखल करायचा की नाही याचा निर्णय घेतला जाईल, या आपल्या भूमिकेचा राज्य सरकारच्या वतीने वरिष्ठ वकील अमित देसाई यांनी बुधवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी पुनरुच्चार केला. त्यावेळी, न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने उपरोक्त विचारणा केली. एखाद्या व्यक्तीने आत्महत्या केली आणि पोलिसांनी त्याची अपघाती मृत्यू म्हणून नोंद केली. मात्र, नंतर संबंधित व्यक्तीच्या कुटुंबीयांनी ही आत्महत्या नाही, तर खून असल्याची तक्रार केल्यावर त्या आधारे पोलिसांकडून गुन्हा दाखल केला जातो. शिंदे चकमक प्रकरणात त्याच्या पालकांनी चकमकीवर प्रश्न उपस्थित करून मुलाचा खून झाल्याचा आरोप करणारे पत्र स्थानिक पोलीस आणि संबंधित पोलीस आयुक्तांना लिहिले होते. त्यामुळे, याप्रकरणी गुन्हा का नोंदवला गेला नाही, या प्रकरणाचा अपघाती मृत्यू म्हणून तपास केला जाणार आणि आरोपपत्र दाखल करणार असे आम्ही मानायचे का, अशी विचारणाही खंडपीठाने पोलिसांकडे केली. बदलापूर अत्याचार प्रकरणानंतर शालेय मुलांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित झाला होता. मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शिफारशींचा अहवाल सादर करण्यासाठी विशेष समितीची नियुक्ती करण्यात आली होती.

# रुग्णवाहिका घोटाळा प्रकरणी तानाजी सावंतांना तुरुंगात टाका

### शिंदेंच्या कुंटुबियांचा संबंध तपासा -आदित्य ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई , दि. १३ :** एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये रुग्णवाहिका खरेदी घोटाळा झाला. यामध्ये जवळपास १० हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला. या प्रकरणी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांची चौकशी करावी, अशी मागणी ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केली आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले की, तत्कालीन मुख्यमंत्री शिंदे यांच्या कुटुंबातील सदस्याचीही घोटाळ्यात भूमिका होती का, याचाही तपास करा. गरज असेल तर तानाजी सावंत यांना तुरुंगात टाका असेही त्यांनी यावेळी बोलताना म्हटले आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवृत्त न्यायाधीशांमार्फत या रुग्णवाहिका घोटाळ्याची न्यायालयीन चौकशी करावी. शिवाय १०८ नंबर डायल करून दहा मिनिटांत रुग्णवाहिका येते का हे पाहणं गरजेचे असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. तर मी पर्यावरणमंत्री होतो. केवळ पीओपीमुळेच मुंबईत प्रदूषण होते असे नाही. मुंबईत थर्मल प्लॅण्ट आहेत, आरेतील जंगलात झाडे कापली जात आहेत, लाडक्या कंत्राटदारांसाठी बिल्डरांसाठी जंगल तोडले जात आहे. त्यामुळेही प्रदूषण होत आहे.

**महायुतीला कसली भीती**

आदित्य ठाकरे म्हणाले की, महायुती सरकारला एवढे बहुमत मिळाले असताना विरोधी पक्षनेतेपद देण्यासाठी का घाबरत आहेत. विरोधी पक्षनेतेपद हे लोकशाहीत महत्त्वाचे पद आहे, पारदर्शकता कायम ठेवायची असेल तर ते द्यायला हवे. दर्जा कॅबिनेटचा असतो तो वेगळा, पण लोकांच्या हिताचे प्रश्न सभागृहात अधिक प्रभावीपणे मांडता येतात.

**दिल्ली महाराष्ट्रातील बहिणींमध्ये फरक काय ?**

आदित्य ठाकरे म्हणाले की, महायुती सरकारची कातडी इतकी जाड आहे की, त्यांनी निवडणुकीपूर्वी वचननाम्यात दिलेल्या दहापैकी एकाही वचनाची पूर्तता केलेली नाही. लाडक्या बहिणींचा आकडा कमी होतोय. दिल्लीच्या बहिणी आणि महाराष्ट्रातील बहिणींमध्ये फरक काय? एकीकडे २५०० आणि दुसरीकडे २१००, तेसुद्धा नाहीत फक्त दीड हजार रुपये दिले जात आहेत, असे ते म्हणाले.

**सब का मालिक अदानी**

आदित्य ठाकरे म्हणाले की, साईबाबा म्हणायचे सब का मालिक एक है, पण भाजप म्हणते सब का मालिक अदानी है. कुणी टेंडर पारदर्शकपणे मिळवत असेल तर शिवसेनेचा आक्षेप नाही, पण धारावीसारखा या टेंडरचाही आम्ही अभ्यास करू आणि काही चुकीचे झाले असेल तर लोकांच्या समोर आणू.

# माझे काही खरे नाही, माझ्यावर विश्वास ठेवू नका

### जयंत पाटील यांच्या विधानाने खळबळ



■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई , दि. १२ :** नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्गाला विरोध करण्यासाठी शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीचा आझाद मैदानावर धडक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, स्वाभिमानी शेतकरी पक्षाचे राजू शेट्टी यांच्यासह विरोधी पक्षातील नेत्यांनी भेट दिली. यावेळी जयंत पाटील यांनी मोर्चेकरांना उद्देशून भाषण केले. आपल्या भाषणात बोलताना त्यांनी खळबळजनक विधान केले. माझे काही खरे नाही, माझ्यावर विश्वास ठेवू नका, असे वक्तव्य जयंत पाटील यांनी केले. जयंत पाटलांच्या या विधानाचा रोख काय? असा प्रश्न पडला आहे. शक्तिपीठ महामार्गाला विरोध करणाऱ्या १२ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन सुरू आहे. हा महामार्ग रद्द करावा, अशी मागणी या शेतकऱ्यांची आहे. त्यासाठी आज मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चाला काँग्रेस विधिमंडळ विधान सभा नेते विजय वडेट्टीवार, विधान परिषद गटनेते सतेज पाटील, विश्वजीत कदम, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, तसेच राजू शेट्टी उपस्थित होते. यावेळी भाषणात बोलताना जयंत पाटील यांनी उपरोक्त विधान केले. मात्र, त्यांच्या विधानाचा अर्थ काय? त्यांचा रोख कोणाकडे होता? यासंदर्भात ते भाषणात स्पष्टपणे काहीच बोलले नाही.

**काय म्हणाले जयंत पाटील ?**

कोणाची मागणी नसताना नवीन मार्ग तयार केले जात आहे. विकासाला आमचा विरोध नाही. पण सरकार नवे, नवे रस्ते करण्यात का इंटरेस्ट घेत हे कळत नाही. मोठ मोठे प्रकल्प घ्यायचे, त्यातून निधी उपलब्ध करायचा, असा प्रकार सुरु आहे. पण ज्याची जमीन जात असेल त्यांचा उपजीविकेचा प्रश्न निर्माण होतो. सरकार जमिनीचे पैसे देते, मग मॅनेज होत असाल तर पाहते. परंतु आम्हाला जमीन वाचवायची आहे, पैसे नको, असे शेतकरी सांगत आहे. आम्ही भाषण करुन दमलो, कारण लोकांना पैसे देऊन शांत केले जाते. निर्धाराने आलात तर निर्धार टिकला पाहिजे, असे जयंत पाटील यांनी आंदोलकांना उद्देशून म्हटले.

माझा सल्ला राजू शेट्टी ऐकत नाही. आपली एकी कायम ठेवा, संघर्ष करायला ठाम रहा, मोजणीला अटकाव ठेवा. आमचा दारुण पराभव झाला. आम्ही बोलायचे हळूहळू कमी झालोय, कारण बोलून लोकांना काही समजत नाही. दुसरेच हिंदुत्व वैगरे समोर असते, पण तुमच्या अंगावरून शक्तिपीठ जाईल, असे जयंत पाटील म्हणालेत. राजू शेट्टींनी एकदा झेंडा घेतला तर ते सोडत नाहीत असेही जयंत पाटील यांनी म्हटले. यावेळी, शेतकऱ्यांनी तुम्ही देखील आंदोलनात हवे, अशी इच्छा व्यक्त केली. त्यावर, माझी गॅरंटी घेऊ नका, माझे काही खरे नाही, असे जयंत पाटील यांनी म्हटले. त्यावर, अनेकांनी भुवया उंचावल्या तसेच त्यांच्या बोलण्याचा रोख काय होता?

## खटले दाखल असणाऱ्यालाच पोलीस ठाणे बांधकामाचे कंत्राट

**यवतमाळ:** यवतमाळमधील अवधूतवाडी पोलीस ठाण्याचे बांधकाम पोलिसांनी स्थानिक गुन्हेगारांच्या आर्थिक सहाय्याने केली तसेच बांधकामासाठी कुठलीही रीतसर परवानगी घेतली नाही. पोलिसाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वत: या प्रकाराची कबूली उच्च न्यायालयात दिली. पोलीस ठाण्याचे अवैधरित्या बांधकाम झाले असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवल्यावर आता नव्या इमारतीचे कार्य प्रगतिपथावर आहे. मात्र हे कार्य चार खटले दाखल असणाऱ्या कंत्राटदारालाच दिले गेले असल्याचा दावा याचिकाकर्त्याने उच्च न्यायालयात केला.

**विनापरवानगी बांधकाम**

सामाजिक कार्यकर्ते दिगंबर पाजगडे यांनी याबाबत फौजदारी याचिका दाखल केली आहे. याचिकेवर न्या. नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. पोलीस अधिकाऱ्यांनी स्थानिक प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय पोलीस ठाण्याचे बांधकाम केले.

# महाराष्ट्रासह ३ राज्यांमध्ये होळीपूर्वीच उन्हाचा तडाखा

### विदर्भात अनेक शहरांत पारा चाळिशीपार

■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई , दि. १३ :** होळी आधीच गुजरात, महाराष्ट्र आणि राजस्थानमधील अनेक भाग उष्ण लाटेच्या विळख्यात सापडले आहेत. गुजरात आणि राजस्थानमधील डझनभराहून अधिक शहरांमध्ये तापमान ४० अंशांपुढे गेले आहे. अनेक ठिकाणी तापमान सरासरीपेक्षा८.८ . अंश सेल्सियसने जास्त आहे. सलग दुसऱ्या दिवशी गुजरात, महाराष्ट्र आणि राजस्थानमधील१७ शहरांमध्ये कमाल तापमान ४० अंशांपेक्षा जास्त नोंदवले गेले. विदर्भातील अनेक शहरांत बुधवारी ४० अंशांपेक्षा जास्त तापमान होते.

गुरुवारपासून गुजरात, शेजारील राजस्थान आणि पश्चिम किनारपट्टीवरील कोकण प्रदेशात तापमान घटण्याची शक्यता आहे, परंतु उष्णतेची लाट कायम राहील.

बुधवारी ११ राज्यांमध्ये पारा ३८ अंशांवर राहिला. राजकोटला सर्वाधिक तापमान ४२.१. अंश



नोंदवले गेले, जे सरासरीपेक्षा ६.७. अंश जास्त होते. राजस्थानच्या बाडमेरला तापमान ४०.६. अंश जे ५.४. अंशांनी जास्त आहे. गोव्यातील पणजी येथे तापमान ३६.८. अंश नोंदवले गेले, जे सरासरीपेक्षा ४.१. अंश जास्त आहे.

**विदर्भातील तापलेली शहरे**

अकोला४१/३.
ब्रह्मपुरी४०.४.
चंद्रपूर४०.६.
नागपूर४०.२.
वर्धा४०.०.
यवतमाळ४०.०.

**हीटवेव्ह म्हणजे...**

साधारणत: तापमान ४० डिग्रीपेक्षा जास्त किंवा सरासरीपेक्षा ४.६. डिग्रीपर्यंत जास्त असल्यास उष्णतेची लाट मानली जाते.

# चांदीत किलोमागे १ हजाराची वाढ



**जळगाव :** जळगावच्या सराफा बाजारात बुधवारी चांदीचा भाव १.०००, रुपयांनी वाढून४४.००० , रुपये (जीएसटी शिवाय) प्रतिकिलो झाला.३० ऑक्टोबर २०२४ रोजीच्या १,००,०००,, रुपयांच्या विक्रमी उच्चांकावरून आता ते फक्त रुपये कमी आहे. तर देशात चांदी १,४७४, रुपयांनी वाढून ४८.१००, रुपये प्रतिकिलोवर स्थिरावली. २३ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या ४८.८६२, रुपयांच्या विक्रमी उच्चांकावरून आता फक्त ७६२ रुपये कमी आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनच्या (आयबीजेए) आकडेवारीनुसार, चांदीने २०२५ मध्ये आतापर्यंत १४% आणि गेल्या तीन महिन्यांत १५% पर्यंत परतावा दिला आहे. गेल्या एका वर्षात चांदीत ३५.% वाढ झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, चांदीतील तेजी सुरूच राहणार आहे. या वर्षी आंतरराष्ट्रीय बाजारात चांदीची किंमत प्रति औंस ३८ डॉलर आणि देशांतर्गत बाजारात १ लाख ३० हजार रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचू शकते. सोन्यापेक्षा चांदी अजूनही स्वस्त आहे. सोने-चांदीचेुणोत्तर प्रमाण (गोल्ड-सिल्व्हर रेश्यो) ४०च्या खाली ट्रेड करत आहे. जेव्हा तो ४० च्या आसपास असतो तेव्हा असे म्हटले जाते की चांदी सोन्यापेक्षा स्वस्त आहे. गेल्या५० वर्षांत, तो कधीही४० च्या पातळीपेक्षा वर जास्त काळ राहू शकला नाही. कोविड काळात सोने-चांदीचेुणोत्तर प्रमाण १२८ पर्यंत वाढले होते आणि २०११ मध्ये ते ३२ पर्यंत कमी झाले होते.

**मागणी वाढत असताना चांदीचे उत्पादन चौथ्या वर्षी घटले**

हे चौथे वर्ष आहे, जेव्हा चांदीचे उत्पादन घटले आहे आणि दुसरीकडे वाढत्या औद्योगिक वापरामुळे त्याची मागणी वाढत आहे. पूर्वी चांदी फक्त फोटोवोल्टिकध्ये वापरली जात असे. परंतु गेल्या१० वर्षांत स्वच्छ ऊर्जा, हरित ऊर्जा आणि ५जी इत्यादी उद्योगांमध्ये चांदीचा वापर वाढला आहे आंतरराष्ट्रीय शेअर बाजारातील अलीकडच्या घसरणीच्या पार्श्वभूमीवर लोक शेअर्समधून पैसे काढून सोने आणि चांदीत गुंतवत आहे. रशियन सेंट्रल बँकेने म्हटले आहे की ते चांदीचा साठा वाढवण्याचा विचार करू शकतात.

# राज्यावर ९ लाख ३२ हजार कोटींचे कर्ज

## महायुती सरकार राज्य कसे चालवणार ?संजय राऊतांचा सवाल



■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई , दि. १२ :** राज्यावर ९ लाख ३२ हजार कोटी रुपये कर्ज आहे. आता हे कर्ज काढून राज्य चालवंले आणि लुटले जात आहे. राज्यावरील कर्ज वाढत असताना लाडक्या बहिणींसारख्या योजन्या आणल्या आणि आता त्या बंद करायच्या मार्गावर आहे, असा आरोप ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, शिवभोजन थाळी, आनंदाचा शिधा योजनेसारख्या गरिबांना मिळणाऱ्या योजना बद करण्यात आल्या आहेत. राज्य कसे चालवणार हा आता प्रश्न आहे. कर्ज काढून दिवाळी साजरी करणे आणि निवडणुकांमध्ये मते विकत घेणे हा कर्ज बाजारी महाराष्ट्राची तिजोरी महिलांची मते विकत घेण्यासाठी वापरली.

**कर्जाचा डोंगर कसा कमी करणार**

संजय राऊत म्हणाले की, जाहीरनाम्यात महायुतीच्या ज्या दोन घोषणा आहेत, त्या बहिणींना २१०० रुपये आणि शेतकऱ्यांना कर्जमाफी यांचे तुम्ही काय करणार आहात, असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे. याचे उत्तर राज्याच्या जनतेला दिले पाहिजे.

राज्यावरील कर्जाचा डोंगर तुम्ही कसा कमी करणार आहात? प्रत्येक माणसांच्या डोक्यावर किती कर्ज तुम्ही केले आहे याचा हिशोब तुम्ही करायला हवा.

तुमचे कर्ज ह्या राज्याची जनता फेडणार आहे.

**शक्तीपीठ मार्गाला शेतकऱ्यांचा विरोध**

संजय राऊत म्हणाले की, शक्तीपीठ मार्गाची मागणी कुणी केली होती. ठेकेदारांकडून जे गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर पैसे उकळले गेले हे रस्ते बनवणारे ठेकेदार आहे.

समृद्धी असो किंवा शक्तीपीठ बनवणाऱ्या ठेकेदारांकडून हजारो कोटो रुपये आधीच काढून घेतले आहेत.

त्यांना टेंडर देत करोडो रुपये काढून घेण्यात आले, ते निवडणुकीत किंवा आमदार-खासदार फोडण्यात वापरले असतील. शक्तीपीठाच्या संदर्भात जमीन अधिग्रहणाला शेतकऱ्यांचा विरोध असून ते रस्त्यावर उतरले आहेत.

**काही ठेकेदारांना मालमाल करण्यासाठी महामार्ग ?**

संजय राऊत म्हणाले की, ज्या १०० शेतकऱ्यांनी देवेंद्र फडणवीस यांना शक्तीपीठ महामार्गाबाबत निवेदन दिले आहे, हे शेतकरी भाजपाचे एजंट असावे. त्यांच्यामार्फत जमीन खरेदी विक्रीचे व्यवहार सुरू असावेत, असा आरोप राऊतांनी केला आहे. तर सामान्य शेतकऱ्यांना जमीन द्यायची नाही, असेही त्यांनी यावेळी म्हटले आहे. तर मुळात या महामार्गाची गरज काय? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. हा मार्ग महत्त्वाचा का हे जनतेला तुम्ही पटवून द्या. काही ठेकेदार मालामाल व्हावे यासाठी हा महामार्ग नाही ना? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

**हे कसले हिंदूत्व**

महायुती सरकारच्या काळात होळीला परवानगी मिळत नाही. उद्या गणेशोत्सव येणार आहे.

गणपतीच्या पीओपीच्या मुर्तीवर बंदी आणली आहे. वर्षांतून एकदा येणारा सणावर तुम्ही बंधन आणत आहात. यापूर्वी असे कधीच झाले नाही.

आमच्या राज्यात हिंदूचे सण खुल्या वातावरणात होतील हे तुम्ही सांगत होतात मग आता काय झाले, असा सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

# गुंतवणूक परिषदेत १४२ सामंजस्य करार

## १४हजारहून अधिक रोजगार निर्मिती




■ महासागर प्रतिनिधी,
**नाशिक , दि. १३ :** उद्योग संचालनालयाच्यावतीने येथे आयोजित गुंतवणूक परिषदेत १४२ उद्योगांशी सामंजस्य करार झाले. यातून सहा हजार कोटींची गुंतवणूक झाली असून त्यामुळे १४ हजार ४०३ रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यातील काही उद्योगांनी जागा घेतल्या असून काहींचा जागेचा शोध प्रगतीपथावर आहे. पुढील एक-दोन वर्षात हे उद्योग कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. राज्याच्या उद्योग संचालनालयातर्फे हॉटेल द गेट वे येथे गुंतवणूक परिषद २०२५ झाली. यावेळी मैत्रीच्या समन्वय अधिकारी प्रियदर्शिनी सोनार, उद्योग विभागाच्या सहसंचालक वृषाली सोने, नाशिक डाकघरचे प्रवर अधीक्षक प्रफुल्ल वाणी, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संदीप पाटील, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी दीपक पाटील यांच्यासह उद्योग संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. सामंजस्य करार झालेल्यांमध्ये उद्योग विस्तार आणि काही नवीन गुंतवणुकीचा समावेश आहे. यात अन्न प्रक्रिया, वस्त्रोद्योग, अभियांत्रिकी अशा विविध क्षेत्रातील उद्योगांचा अंतर्भाव आहे. प्रातिनिधिक स्वरूपात सामंजस्य कराराचे वितरण विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी नाशिकच्या विकासात उद्योगांचे योगदान मोलाचे असल्याचे नमूद केले.

या ठिकाणी वायनरी उद्योग आणि पर्यटन क्षेत्रास अधिक संधी आहे. आगामी दोन वर्षात नाशिकच्या विकासाला निश्चितच चालना मिळणार आहे. यात नाशिक ते पुणे आणि मुंबईपर्यंत जाणारा समृद्धी महामार्ग लवकरच सुरू होणार आहे. पुणे शहराच्या धर्तीवर नाशिकलाही याचा लाभ होईल. विमानतळामुळे हवाई प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. आगामी कुंभमेळाच्या दृष्टीने शहरासाठी पायाभूत सुविधांकरिता अनेक प्रकल्प विचाराधीन आहेत.

यात रस्ते, मेट्रोसह विविध प्रकल्पांचा समावेश आहे. उद्योगांचे लहान प्रश्नांचे स्थानिक पातळीवर निराकरण होणे गरजेचे असून मोठ्या धोरणात्मक प्रश्नांचा प्राधान्यक्रम ठरवून ते कसे सोडवावेत, यादृष्टीने नियोजन उद्योग विभागाने करावे, असे त्यांनी सूचित केले. यावेळी सोनार यांनी मैत्री दोनची सादरीकरणाद्वारे माहिती दिली. सोनटक्के यांनी भारतीय लघु उद्योग विकास बँकेमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची तर वाणी यांनी भारतीय डाक विभागाच्या योजनांची माहिती सादर केली. सिंग यांनी उद्योग क्षेत्रातील निर्यात व औद्योगिक परिस्थिती यावर मार्गदर्शन केले.

होळीच्या हार्दिक शुभेच्छा

महासागर अमरावती

शुक्रवार, दि. 14 मार्च 2025

# अमरावती विमानतळाला डीजीसीए कडून हिरवी झेंडी!

## विमानतळाला विमान वाहतुकीचा परवाना!



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 13)** अमरावती विमानतळावरील वाहतुकीसाठी अत्यावश्यक असणारा नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाचा (डीजीसीए) एअरोड्रोम परवाना गुरूवारी (दि.13) मिळाला. यामुळे गेले अनेक वर्षांचे हवाई वाहतुकीचे अमरावतीकरांचे स्वप्न आता लवकरच पूर्ण होणार आहे.

गेल्या अनेक वर्षापासून चर्चेत असलेले अमरावती येथील बेलोरा विमानतळ आता जवळपास तयार झाले असून लवकरच या विमानतळावरून पहिले विमान उड्डाण होण्याची शक्यता आहे. नुकतीच या विमानतळावर एअर कॅलिबरेशन ऑफ प्रिसिजन अप्रोच पाथ इंडिकेटर अर्थात पीएपीआय चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. त्यामुळे अमरावतीकरांना मुंबईपर्यंत विमानाने ये-जा करण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. दरम्यान आता गुरूवारी (दि.13)अमरावती विमानतळावरून विमान उड्डाण करण्यासाठी छत्रष्ट कडून हिरवी झेंडी मिळालेली आहे. आता लवकरच नियमित विमान उड्डाण सुरू होईल. दरम्यान, अमरावती विमानतळ सुरू झाल्यानंतर त्याअनुषंगाने या भागात उद्योग, रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावतीकरांच्या स्वप्नाला पंख भरारीचे लागले!!, अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी या विमानतळासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या पाठपुराव्याचा उल्लेख करून त्यांचे आभार मानले व या क्षणाची उत्कटतेने वाट बघणाऱ्या अमरावतीकरांचे पालकमंत्री म्हणून मी मनपूर्वक अभिनंदन करतो,असे ते म्हणाले.

अमरावती विमानतळावरील वाहतुकीसाठी अत्यावश्यक असणारा नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाचा (डीजीसीए) एअरोड्रोम परवाना आज मिळाला. आता येथून लवकरच जगभरात उड्डाण सुरू होतील. मार्च 2025 च्या अखेरीस विमान वाहतूक सुरू होणार आहे. प्रवास, व्यवसाय, पर्यटन व उद्योगाला चालना मिळणार आहे.

# आज धुळवड : मस्तीत खेळा, पण शिस्तीत खेळा

## पोलिसांचा इशारा | चौकाचौकात पोलिसांनी लावला कडेकोट बंदोबस्त

*महासागर प्रतिनिधी*
*अमरावती,( दि. 13 ) - अमरावती शहरात होळी सण उत्साहात साजरा करण्यात आले. ठिकठिकाणी घरगुती आणि सार्वजनिक होळी पेटवून विधीवत पुजन करण्यात आले. दरम्यानच एकमेकांना रंग लावून धुळीवंदनाला सुध्दा सुरुवात झाली होती. आता 14 मार्च रोजी धुळीवंदनची धुम राहणार आहे. या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी शहरात कडेकोट बंदोबस्त लावलेला आहे. रंगपंचमीला उत्सवात जर कुणी धुमाकुळ घालत असेल, किंवा नागरिकांना त्रास होईल असे कृत्य करीत असेल, तर त्याच्यावर पोलिस कठोर कारवाई करणार आहे. धुळवड मस्तीत खेळा, पण शिस्तीत खेळा असा इशारा पोलिसांनी दिलेला आहे. रंगपंचमीनिमीत्त पोलिसांनी टवाळखोरपणा करणाऱ्यांवर करडी नजर ठेवली आहे.*



### कडेकोट पोलीस बंदोबस्त

महिलांच्या सुरक्षेकरीता सीआर मोबाईल, दामिनी पथक, बिट मार्शल पथक नेमुन महिलांची छेडखानी होणार नाही, त्याकरीता पोलिस ठाणे स्तरावर चिडीमार पथक नेमण्यात आलेले आहे. शहर पोलीस आयुक्तालयामार्फत शहरात चोख बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. सदरच्या बंदोबस्ताकरीता 3 पोलीस उपायुक्त, 5 सहायक पोलीस आयुक्त, 24 पोलीस निरीक्षक, 60 पोलीस उपनिरीक्षक, 900 पोलीस अंमलदार, 1 कंपनी सशस्त्र राखिव पोलीस बल व 200 होमगार्ड बंदोबस्ताकरीता तैनात करण्यात आलेली आहे.

### निर्जनस्थळावर लक्ष द्यावे

होळी व रंगपंचमी पर्यावरणपूरक साजरा करणे अपेक्षित आहे. परंतु काही जण निर्जनस्थल जंगलात जाऊन पार्ट्या करतात, ही बाब धोकादायक ठरू शकते. जंगलात वन्यप्राण्याचा मुक्तसंचार असतो. त्यामुळे जंगलातील वन्यप्राण्यापासून धोका होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी जंगलातील निर्जनस्थळी जाणे टाळावे.

**निलेश कंचनपूरे, वॉर संस्था.**

### ड्रंक ॲण्ड ड्राइव्ह मोहिम

वाहनचालकांवर शहर वाहतूक शाखेने लक्ष केंद्रीत केले आहे. तसेच सर्व पोलिस ठाण्याच्या हद्दीत प्रभावी ड्रंक व ड्रॉईव्ह मोहीम राबविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे, पोलिस ठाणे व गुन्हे शाखेचे पथकामार्फत अवैध दारू विक्रेते व जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. तडीपार इसम व रेकॉर्डवरील गुन्हेगारांची शोध मोहीम राबवुन कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

### महत्वाच्या मार्गावर नाकाबंदी

होळी, धुलीवंदन व रमजान मास असे सण असल्यामुळे अमरावती पोलिसांनी विशेष लक्ष ठेवले आहेत. 4 मार्च रोजी धुलीवंदन साजरा होत आहे, त्याचप्रमाणे 14 मार्च रोजीच रमजान मासमधील शुक्रवार नमाज राहणार आहे. नमाजचे वेळेस सर्व मस्जिदवर योग्य तो बंदोबस्त नेमण्यात येणार आहे व सतत पेट्रोलींग ठेवण्यात येणार आहे. 1त्यामुळे सर्व पो. ठाणे प्रभारी व वाहतुक शाखा यांचेकडून महत्वाचे ठिकाणी नाकाबंदी नेमण्यात आली आहे. ट्रीपल सिट तसेच भरधाव वेगाने वाहन चालकाविरुध्द कारवाई तसेच भरधाव वेगाने, रॅश ड्रायव्हिंग करणार्या वाहन चालकाविरुध्द कारवाई करण्यात येईल.

### शहरात प्रतिबंधात्मक आदेश जारी

सर्व सामान्य नागरीकांच्या भावना दुखावतील अशा प्रकारचे कोणतेही कृत्य करू नये, असे आवाहन पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी केले असून सर्व नागरीकांना होळी व धुलीवंदन निमीत्त हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम 37 (1) व (3) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश 18 मार्च ते दि. 1 एप्रिलच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी कळविले आहे.

### राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांचा दौरा

**अमरावती** - राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांचे शनिवार, दि. 15 मार्च 2025 रोजी सायंकाळी 5 वाजता अमरावती येथील विश्रामगृह येथे आगमन व ओबीसी संघटनांशी चर्चा करतील. त्यानंतर सायंकाळी 7 वाजता रहाटगाव येथील कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर रात्री आठ वाजता चंद्रपूरकडे प्रस्थान करतील.

# प्रहार शिक्षक संघटनेच्या मागण्यांची दखल!

## ग्रामविकास मंत्र्यांची घेतली 17 रोजी मंत्रालयात बैठक | आंतर जिल्हा व अंतर्गत बदलीत मिळणार शिक्षकांना न्याय

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी( दि.13 )** - ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना अमरावती येथे 6 फेब्रुवारी 2025 रोजी प्रहार शिक्षक संघटनेने दिलेल्या निवेदनाची दखल घेत ग्रामविकास मंत्र्यांनी झेडपी मधील शिक्षकांच्या आंतर जिल्हा व जिल्हा अंतर्गत बदलीतील मागण्या संदर्भात महत्त्वाची बैठक दिनांक 17 मार्च सोमवार रोजी दु.4 वा.मुंबई येथील मंत्रालयात आयोजित केली आहे. या बैठकीला ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव व महत्वाचे अधिकारी उपस्थित राहणार आहे.

प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी आपल्या झेडपी शिक्षकांच्या बदली प्रक्रिये बाबत ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना दिलेल्या निवेदनातील मागण्यांची अखेर दखल घेण्यात आली असून सोमवार रोजी या अनुषंगाने मंत्रालयात महत्वपूर्ण बैठक होणार आहे.

यात आंतरजिल्हा बदली पूर्वी सर्व पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करावी,आंतरजिल्हा बदलीसाठी मागील वर्षाच्या संच मान्यतेनुसार रिक्त जागा कळवाव्या,दिनांक 31 मे 2025 पर्यंत निवृत्तीने रिक्त होणाऱ्या पदांचा यात समावेश करावा, आंतरजिल्हा आणि जिल्हा अंतर्गत बदल्यांसाठी आपसी बदली प्रक्रिया राबवावी,आपसी आंतर जिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांची पूर्वीच्या जिल्हा परिषद मधील सेवा ग्राह्य धरून त्यांची जिल्हा अंतर्गत शिक्षक बदलीसाठी सेवाजेष्ठता ग्राह्य धरावी,2022 मध्ये घोषित केलेल्या अवघड शाळांमधील शिक्षकांना 2025 च्या बदली प्रक्रियेत संधी द्यावी,आंतरजिल्हा बदलीसाठी राज्य रोस्टर तयार करावे,आंतरजिल्हा व जिल्हांतर्गत मध्ये आपसी बदलीचा पर्याय द्यावा, आदी प्रमुख सात मुद्यांवर चर्चा होणार आहे.

प्रहार शिक्षक संघटनेच्या पाठपुरावाने भ्रष्टाचार मुक्त ऑनलाईन बदलीचे सहा टप्पे आतापर्यंत राबविण्यात आले.राज्यातील 15000 शिक्षकांना स्वगृही येता आले. तसेच सातव्या टप्प्यामध्ये राज्यातील 8000 शिक्षकांना आपल्या जिल्ह्यात सहजपणे परत येता येणार आहे.दोन्ही बदली प्रक्रिया न्यायपूर्ण करण्यासाठी प्रहार शिक्षक संघटनेमार्फत पाठपुरावा सुरूच राहणार आहे.

**महेश ठाकरे,**
**राज्याध्यक्ष , प्रहार शिक्षक संघटना.**



# नोकरीचे आमिष दाखवून युतीची फसवणूक

## 90 हजार 624 रुपयांचा फटका



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.13 )** - रायगड जिल्ह्यातील महाड येथील गोदरेज ग्रोवेट या कंपनीत जरूड येथील 25 वर्षे युवती नोकरीला आहे. प्रतिक्षा जगदीश आलोने असे फसवणूक झालेल्या युतीचे नाव आहे. एका अज्ञात व्यक्तीने तिला नोकरीची आमीष दाखवून तिची 90 हजार 624 रुपयांनी फसवणूक केल्याचे नुकतेच उघडकीस आले आहे. प्राप्त माहितीनुसार 5 फेब्रुवारीपासून ती रजा घेऊन जरूड येथे आली होती. 6 मार्च रोजी तिच्या मोबाईल क्रमांकावर सायंकाळी 4 वाजताच्या सुमारास एका अनोळखी नंबर वरून तिला एका अज्ञात व्यक्तीने फोन केला. त्या अनोळखी व्यक्तीने त्याचे नाव अभिषेक असे सांगून हायरवेल या कंपनीतून बोलत असल्याचे सांगितले. आमची कंपनी जॉब कन्सल्टन्सीमध्ये काम करते तुला चांगल्या कंपनीत नोकरी मिळून देतो, असे त्यांनी तिला सांगितले. त्याच्या सांगण्यावरून तिने तिचे रिजूम मार्कशीट व आधार कार्ड अशी कागदपत्रे त्यांनी सांगितलेल्या मेल आयडीवर पाठविले. त्याने तिला 1500 रुपये नोंदणी शुल्क भरण्यास सांगितले. त्याच्या सांगण्यावरून तिने 7 मार्च रोजी फोनपे वरून पैसे पाठवले. त्यानंतर त्याने तिच्या मेल आयडीवर एक लिंक पाठवली व पंधराशे रुपयांची हायरवेल कंपनीच्या नावाने पावती पाठवली. या प्रक्रिया नंतर तो तिला परत पैसे मागत होता. चांगली नोकरी मिळविण्यासाठी आजपावतो तिने त्याला एकूण 90 हजार 624 रुपये पाठवले. 10 मार्च रोजी त्यांनी तिला परत 33 हजारांची मागणी केली. नोकरी बाबत माहिती सांगत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे तिच्या लक्षात आले. या प्रकरणी तिने अभिषेक नावाच्या अध्यात व्यक्तीविरुद्ध 11 मार्च रोजी वरूड पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपी विरुद्ध विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करून तपास सुरू केला आहे.

# भिवापुरकर अंधविद्यालयात दृष्टिहीन दिव्यांग बांधवांसोबत अनोखे 'इको-फ्रेंडली धूलिवंदन'

## अनोख्या होळीचा रंगोत्सव साजरा













*महासागर प्रतिनिधी*
*अमरावती, ( दि.13 ) - वनमाला बहुद्देशीय संस्था, साद फाउंडेशन आणि दिशा बहुद्देशीय संस्था, स्वराज्य प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने अनोख्या होळी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालयात 13 मार्च 2025 रोजी 'इको-फ्रेंडली धूलिवंदन' कार्यक्रम पार पडला.*

विशेष म्हणजे हा धुळवळीचा कार्यक्रम दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता दरसाल साजरा करण्यात येते. सणासुदीच्या उत्सवात कुणीही उपेक्षित राहू नये, या हेतूने हा अनोखा उपक्रम दरवर्षी आयोजित केला जातो.

दृष्टिहीन तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि पर्यावरणपूरक पद्धतीने होळीचा आनंद लुटला यासाठी कोरड्या रंगांची होळी खेळल्या जाते. सणाचा आनंद, स्पर्शाच्या माध्यमातून अनुभवता यावा, यासाठी विविध गाण्यांसह पारंपरिक पद्धतीने हा उत्सव साजरा करण्यात आला.

### समाजासाठी सकारात्मक संदेश

या उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा कार्यक्रम फक्त एक सण नसून, समता, समरसता आणि आनंद यांचे प्रतीक आहे. विविध सामाजिक संस्था आणि नागरिक यामध्ये सहभागी झाले होते. शहरातील युवक मोठ्या प्रमाणात या रंगपंचमी उत्सवात सहभागी होऊन दृष्टिहीन विद्यार्थी विद्यार्थ्यांना सोबत रंगपंचमी खेळून त्यांना आनंद लुटता यावा हाच या मागचा हेतू आहे सोबतच संगीताच्या तालावर दृष्टीहीन विद्यार्थी विद्यार्थ्यांनी तसेच तेथील कर्मचारी ताल धरला होता या कार्यक्रमाला शहरातील उपस्थित इलेक्ट्रॉनिक्स मीडिया, प्रिंट मीडिया, वृत्तपत्र छायाचित्रकार, छायाचित्रकार आणि तसेच शहरातील विविध सामाजिक क्षेत्रातील काम करणारी मंडळी या रंग उत्सवात त्यांनी हजेरी लावली. सर्वांनी यामध्ये आनंद लुटला या कार्यक्रमात मोठ्याप्रमाणात युवती व महिलांचा सहभाग होता.

# वृक्षतोड करून साठवून ठेवलेला लाकडाचा साठा जप्त

## परतवाडा परिक्षेत्रातील चांदुर बाजार परिसरात कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.13 )**- वृक्षतोड करून साठवून ठेवलेला लाकडाचा मोठ्या प्रमाणात मुद्देमाल वनविभागाच्या अधिकारी व कर्मचार्यांनी परतवाडा परिक्षेत्रातील चांदुरबाजार परिसरातून 12 मार्च रोजी जप्त केला. या कारवाईमुळे खळबळ उडाली आहे.

12 मार्च रोजी अमरावती प्रादेशिक वनविभागाचे सहाय्यक वनसंरक्षक यांना गुप्त माहिती मिळाली होती की, परतवाडा परिक्षेत्रातील चांदुर बाजारमध्ये अवैधरित्या वृक्षतोड करून मोठ्या प्रमाणात इमारती नग व आडजात जलतन साठवुन ठेवले आहे. या माहितीवरून अमरावती येथील सहाय्यक वनसंरक्षक (कॅम्पा व वन्यजिव), परतवाडा प्रादेशिकचे वनपरिक्षेत्र अधिकारी व वनपरिक्षेत्रातील वन कर्मचारी यांनी चांदुरबाजार शहरालगतच्या जमापुर भागात असणार्या खुल्या प्लॉटची पाहणी केली.

त्यावेळी तेथील ठिक-ठिकाणी विना परवानगी अवैधरित्या वृक्षतोड करून वाहतुक केलेला आडजात माल आढळून आला. प्लॉट क्र. 01 मध्ये सुर्या बारच्या मागील बाजुस खुल्या प्लॉटमध्ये एकुण 195 नग (28.170 घ.मी एवढा इमारती) व 74.000 घ.मी. जलतन माल आढळून आला. प्लॉट नं-02 मोहम्मदीया प्लॉट येथे एकुण 110 नग ( 44.000 घ.मी. एवढा इमारती) व 40.000 घ.मी, प्लॉट नं.03 निम 17 नग (6.000 घ.मी), 9.000 घ.मी जलतन माल आढळून आला. सदरचा माल 24 नग हा निम, बाभुळ, गोंधन आंबा, महारुख, आवळा, पिंपड, निलगीरी इत्यादी प्रजातीचे असुन सदरच्या माल जप्त करण्यात आला. यात एकूण 322 नग, 78.17 घ.मी. इमारती तसेच 123.00 घ.मी जलतन या मालाची बाजार भावानुसार अंदाजित 4 लाख 4 हजार 300 रुपये किमंतीचा आहे. सदर कार्यवाही सहाय्यक वनसरंक्षक ज्ञानेश्वर देसाई, परतवाडा वनपरिक्षेत्र अधिकारी एस.एच. हाते, वनपाल पी.एम.उमक, वनपाल व्ही.व्ही. कोवळे, ए.ए. मंजुळकर, वनरक्षक यु.एल. गणवीर, बि.एम. खेडकर, अमोल पाटील, पि.आर. अलोकार, जे.टी. भारती, आर. आर. थोरात, आर. आय. बैस, पडोळे, डी.ओ. चव्हाण, वाहनचालक संजय पंचभाई यांनी केली. सदर कार्यवाही प्रादेशिक अमरावती वनवृत्ताच्या मुख्य वनसंरक्षक जयोती बॅनर्जी, उपवनसंरक्षक (प्रादे.) धैर्यशिल पाटिल, विभागीय वनअधिकारी (दक्षता) किरण पाटिल, सहाय्यक वनसरंक्षक ज्ञानेश्वर देसाई यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आली. पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी एस.एच.हाते, वनपाल पी.एम.उमक करीत आहेत. वन व वन्यजिव तसेच अवैध वाहतुक लाकुड संबधित कुठलाही गैरप्रकार निदर्शनास आल्यास तात्काळ टोल फ्री.नं. 1926 वर संपर्क करावा. असे आवाहन वनविभागाने केले आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# बंधुभाव व एकतेचे प्रतिक होळी

प्राचीन भारतात होळी हा रंग, प्रेम आणि वसंत ऋतूचा सण म्हणून साजरा केला जाणारा लोकप्रिय आणि महत्त्वाचा हिंदू सण आहे. वसंत ऋतुच्या आगमनाप्रसंगी निसर्गाने अधिकच साजश्रृंगार केलेला असतो. फुललेल्या फुलाला कोमलतेचा बहार आलेला असतो. झाडं पाना-फुलांनी नववधुगत बावरुन गेलेली असतात आणि पक्षाचं आकाशात झुलायचं स्वप्नही साकार झालेलं असतं.

निसर्गाच्या तारुण्याचे हिरवेपण पाहून माणसाचं मन बहरुन आनंदून आलेलं असतं. वसंतोत्सव हा कालांतराने होळी दहनाच्या रुपाने साजरा होऊ लागला. उत्सवाचं स्वरुप जरी बदललं तरी उद्देश धोरण तोच आहे. प्रसन्नता, आनंद, मस्ती या दिवसात मन उचंबळून आलेलं असतं.

लहान मुलांना पीडा देणाऱ्या होलिका, ढुंढा, पुतना ह्यांसारख्या राक्षसींच्या दहनांच्या कथांमधे ह्या उत्सवाच्या परंपरेचा शोध काही लोक घेतात. एका पौराणिक कथेनुसार भगवान विष्णूचा भक्त असलेल्या प्रल्हादाला मारण्यासाठी हिरण्यकश्यपूने धाडलेल्या होलिकादेवतेचा श्रीविष्णू देवाने वध केला होता. होलिकेला वर होता की तिला अग्नी जाळू शकणार नाही, परंतु प्रल्हादाला जाळण्यासाठी तिने त्याला मांडीवर घेऊन अग्निकुंडात प्रवेश केला. प्रल्हाद बचावला व होलिकेचे दहन झाले अशी आख्यायिका प्रचलित आहे.

अशाप्रकारे हिंदूंच्या इतर सणाप्रमाणे होलिका दहन देखील वाईटावर चांगल्याचा विजयाचे चांगले प्रतीक आहे. कारण तो हिरण्यकश्यपूवर नरसिंहाच्या रूपात विष्णूच्या विजयाचे स्मरण करतो. वाईट गोष्टींवर विजय मिळवणे ही या सणाची व्याख्या आहे. या प्रकारे होळीची उत्पत्ती झाली आणि ती प्रामुख्याने भारतीय उपखंडात साजरी केली जाते.

होळी भारतात वसंत ऋतूचे आगमन, हिवाळ्याचा शेवट आणि प्रेमाचा बहर साजरी करते. हे वसंत ऋतु कापणीच्या चांगल्या हंगामासाठी देखील एक आवाहन आहे. हे एक रात्र आणि एक दिवस चालते, हिंदू पंचांग फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेच्या संध्याकाळी (पौर्णिमेचा दिवस) चालू होतो, जो इंग्रजीब ग्रेगोरियन कॅलेंडरमध्ये मार्चच्या मध्यभागी येतो.

फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण लोक आनंदाने साजरा करतात. या उत्सवाला होलिकादहन किंवा होळी पौर्णिमा, शिमगा, हुताशनी महोत्सव, फाग, फागुन दोलायात्रा, कामदहन अशा वेगवेगळ्या संज्ञा आहेत, ज्याला कोकणात शिमगो म्हणतात. फाल्गुन महिन्याच्या शेवटच्या दिवशी साजरा होणाऱ्या ह्या लोकोत्सवाला फाल्गुनोत्सव आणि दुसऱ्या दिवशी सुरू होणाऱ्या वसंत ऋतूच्या आगमनानिमित्त वसंतागमनोत्सव किंवा वसंतोत्सव असेही म्हणण्यात येते. देशीनाममाला या ग्रंथात हेमचंद्र याने या सणाला सुग्रीष्मक असे नाव दिले आहे. यातूनच ह्यशिमगा असा अपभ्रंश तयार झाला असावा असे मानले जाते.

भारताचा सांस्कृतिक सण म्हणजे होळी! अंतःकरणातील अपार प्रेमाने रंग गुलालाची उघळण करणारा. रंगोन्मादानं भारतीय मातीत अंर्तबाहय मस्ती भरणारा. प्रांत, भाषा व धर्माच्या विभिन्न रंगांच्या सरितांना राष्ट्रीय रंगस्थळीच्या त्रिवेणीत एकात्मतेच्या रंगानं प्रवाहित करणारा हा राष्ट्रीय सण. होळी-धुळीवंदन सणाला महाराष्ट्रात धामधुम, युवकांचा जल्लोष, मादक द्रव्यांचा सर्रास वापर व आहारी जात या सणाची सणसण समाजात पसरवितांना दिसतात.

होळीच्या दिवशी राजा आणि प्रजा एक होऊन एकमेकांवर रंग उडवितात ते काय निदान वर्षाचे चार-पाच दिवस तरी समानतेचे तत्व अनुभवण्यासाठी? मानवी आरोग्यावर होणारे ऋतुचे परिणाम याचा संकेत देणारा सण आहे, निसर्ग आनंदाचा सण आहे.

होळीमध्ये एकमेकांना विविध रंग लावून हा सण साजरा करतात. तसेच विविध पारंपरिक गाणी, पारंपरिक नृत्ये यामध्ये समाविष्ट असतात. बंजारा समाजामध्ये होळीला फार महत्त्व आहे. बंजारा समाजामध्ये, बंजारा भगिनी पारंपरिक पोशाखात नृत्य करतात. विशेषतः उत्तर भारतामध्ये उत्साहाने साजरा होणारा एक सण आहे. याला वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते.

भारताच्या निरनिराळ्या राज्यात निरनिराळ्या प्रकारे होळी करतांना दिसतात. परंतू होळी पेटविण्याचा प्रकार सर्वच ठिकाणी सारखाच होत असतो. महाराष्ट्रात शेणाच्या गोवऱ्यांची किंवा लाकडांची होळी करण्याची प्रथा आहे.

कोकणपट्टीत सुपारीचे झाड, आंब्याचे किंवा इतर कुठल्याही झाडांचा सोट देवळापूढे रोवून त्यांच्या तळाशी लहान-लहान लाकडे व गवत जाळतात. इतर प्रदेशाच्या मानाने महाराष्ट्रातील कोकणपट्टीत या सणाला बरेच महत्व आहे.

गोव्यात काही ठिकाणी वायंगणी शिमगा म्हणजे चैत्र शुक्ल पक्षात देखील घुमट (मडक्याचे वाद्य) वाजविले जावून जल्लोशात होळी सण साजरा करतांना आढळतात. होळी हा रंगाचा आणि कृषी संस्कृतीचे जतन करणारा सण आहे. शेतकरी वर्गात होळी या सणाचे खास महत्त्व आहे.

पौराणिक इतिहास पाहता या सणाचे आणि कृष्ण-बलराम यांचे नाते दिसून येते. होळीच्या निमित्ताने या दोन्ही देवतांचे स्मरण आणि पूजा करतात. यादिवशी हाती आलेल्या पिकाबद्दल देवाला धन्यवाद देण्यासाठी प्रार्थना करतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी गव्हांच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे.



**प्रविण बागडे**
**नागपूर.**
**9923620919**

या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याचीही प्रथा आहे. आदिवासी जमातीतील स्त्री-पुरुष हा दिवस गुलाल उधळून, टिमक्या-ढोल वाजवून, नृत्य करून उत्साहाने साजरा करतात.

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील लोकांत होळी हा सण उत्साहाने साजरा केला जातो. होळी साजरा करत असतांना आदिवासी लोकांच्या भोजनामध्ये गोड पुरी, मासळी व गोड भात या पदार्थांचा समावेश असतो.

सातपुडा पर्वत प्रदेशातील आदिवासी होळीच्या दरम्यान काठी उत्सव साजरा करतात. बाराव्या शतकापासून ही परंपरा सुरू असल्याचे दिसते. दागदागिने घालून, नक्षीकाम करून स्त्री-पुरुष यात सहभागी होऊन विविध वाद्यांच्या तालावर नृत्य करतात.

महाराष्ट्रात होळीच्या दिवशी समिधा म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळतात येतात आणि पेटलेल्या होळीभोवती ह्यबोंबाह्ण मारत लोक प्रदक्षिणा घालतात. होळीला नारळ अर्पण करून नैवेद्य दाखवतात. महाराष्ट्रात पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्याची रीत आहे.

होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. या दिवशी होळीची रक्षा अंगाला फासली जाते किंवा ओल्या मातीत लोळण घेतली जाते. होळीनंतर ५ दिवसांनी रंगपंचमी हा सण साजरा केला जातो.

एकमेकांना गुलाल लावून रंगांची उधळण करणे, सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून याकडे पहिले जाते. होळी हा रंगाचा सण आहे, समस्त समुदाय होळीची विधियुक्त पूजा करतो. होळी समोर गा?हाणे, नवस बोलण्याची परंपरा आहे. नागपूरकर भोसल्यांच्या वाड्यात व तसेच पेशवाईत खेळ्ली जाणारी होळी आणि रंगपंचमी तर महाराष्ट्राच्या इतिहासात सुप्रसिध्दच आहे.

स्वतंत्र भारतात होळीची प्रथा पंडित जवाहरलाल नेहरुंजी पण जोपासली, जपली! प्रेम आणि आनंद पसरवणे आपण या सणाचा स्वीकार करत असताना, या मनःपूर्वक शुभेच्छांसह प्रेम आणि आनंद पसरवू या. या प्रसंगी सर्वांना सुरक्षित होळी आणि धुलीवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा !

■ ■ ■

# वायफळ बडबड अन् सरकारची गोची!

## शिवरायांच्या सैन्यात होते मुस्लीम

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात मुस्लीम नव्हते, असे वादग्रस्त वक्तव्य मंत्री नीतेश राणे यांनी केले. मात्र, हे खोटे आणि चुकीचे माहितीवर आधारित असल्याचे समोर येत आहे. शिवाजी महाराज यांच्या सैन्यात तोफखाना प्रमुख, दयासारंग, वकील, न्यायाधीश असे अनेक मुस्लीम होते. इतकेच नव्हे तर त्यांच्या सैन्यात तब्बल 700 पठाणांची फौजही होते, असे इतिहास सांगतो.

छत्रपती शिवाजी महाराजांवरील चरित्र ग्रंथ, बखरी आणि भारतीय तसेच पाश्चिमात्य इतिहासकारांच्या अनेक ग्रंथातही याचा उल्लेख आहे. त्यामुळे मंत्री नीतेश राणे यांचे वक्तव्याने महायुती सरकारची आणि विशेषतः भाजपची चांगलीच गोची होणार असल्याचे दिसते.

नितेश राणे वायफळ बडबड करताना म्हणाले होते, औरंग्याला थांबवण्याचे आणि त्याला आव्हान देण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी केले आहे. आमच्यातले काही कारटे आहेत. ते सांगतात शिवाजी महाराजांच्या सैन्यात मुसलमान होते. कोण मुसलमान नव्हते. उगाच टेपरेकॉर्डर चालवतात. स्वराज्याची लढाई ही इस्लामच्या विरोधातच होती. हिंदू विरुद्ध मुसलमान होती. त्या लढाईत आमच्या राजाने हिंदू धमार्ला इस्लामच्या समोर झुकू दिले नाही. हाच आमच्या सगळ्यांचा ज्वलंत इतिहास आहे.

मंत्री नीतेश राणे यांच्या वक्तव्यानंतर अजित पवारांनी स्पष्ट शब्दांत त्यांची कानउघाडणी केली. ते म्हणाले की, दोन्हीही बाजूच्या सन्मानीय सदस्यांनी कुठल्याही प्रकारची कायदा सुव्यवस्था अडचणीत येणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. ज्यांचे देशावर प्रेम आहे, असा मुस्लीम समाज मोठ्या प्रमाणात भारतात आणि महाराष्ट्रात आहे.

छत्रपती शिवरायांच्यासोबत मुस्लीम लोकही होते. त्यांचा दारूगोळा कोण सांभाळत होते? किती तरी उदाहरणे आपल्याला देता येतील. त्यामुळे त्यांनी असे वक्तव्य का केले, त्यांच्या वक्तव्यामागील हेतू काय होता, तो मला माहिती नाही. आपल्या देशाबद्दल अभिमान वाटणारा जो-जो मुस्लीम घटक आहे, तो देशप्रेमीच आहे.

**इतिहास काय सांगतो?**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदरी अनेक मुसलमान सरदार होते. त्यांनी चक्क मोठमोठी पदे भूषविली आहेत. तोफखाना हे सैन्याचे सर्वात महत्त्वाचे अंग असते. शिवाजी महाराज यांच्या तोफखान्याचा प्रमुखच इब्राहिम खान हा मुस्लीम सरदार होता. महाराष्ट्राला मोठा समुद्र किनारा लाभला आहे. हे पाहता शिवाजी महाराज यांनी आरमार उभारले. याचे प्रमुखपदही दौलतखान या मुस्लीम सरदाराकडे होते. त्यांना दयासारंग असे म्हटले जायचे.

शिवाजी महाराज यांचा अंगरक्षक मदारी म्हेतर हा मुस्लीम होता. आग्रा येथे शिवाजी महाराज आणि शंभू राजांना औरंगजेबाने नजरकैदेत ठेवले होते. त्यावेळी मदारी म्हेतर यांनी चमकदार कामगिरी केली आणि दोन्ही राजे स्वराज्यात सुखरूप आले, हा इतिहास सांगतो.

**मुस्लीम वकील पाठवला**

शिवाजी कोण होता? या अतिशय महत्त्वाच्या पुस्तकात गोविंद पानसरे यांनी शिवरायांच्या सैन्यात कोण मुस्लीम होते, याची यादीच दिली आहे. सालेरीच्या लढाईनंतर औरंगजेबाच्या दक्षिणेतील अधिकाऱ्यांनी शिवाजी महाराजांशी सख्य जोडायचे म्हणून एक ब्राह्मण वकील पाठवला होता. तेव्हा शिवाजी महाराज यांनी काजी हैदर यास मोगलांकडे पाठवले. म्हणजे मुसलमानांचा वकील हिंदू आणि हिंदूचा वकील मुसलमान असे चित्र होते.

शिवरायांच्या सैन्यात सिद्दी हिलाल हा मुस्लीम सरदार होता. 1660 मध्ये रुस्तूमजमा व फाजलखान यांचा शिवरायांनी पराभव केला. त्यावेळी सिद्दी हिलाल हा छत्रपती शिवरायांच्या बाजूने लढला होता हे विशेष. सिद्दी जौहरने 1660 मध्ये पन्हाळगडास वेढा दिला. तेव्हा नेताजी पालकर यांनी सिद्दीच्या सैन्यावर छापा मारून वेढा उठवण्याचा प्रयत्न केला. तेव्हासुद्धा सिद्दी हिलाल आणि त्यांचा मुलगा वाहवाह हे नेताजीबरोबर होते. या चकमकीत हे दोघे पिता-पुत्र जखमी झाले. त्यांना सिद्दी जौहरने कैदही केले होते.

**सभासद बखरीतही उल्लेख**

सभासद बखरीच्या 76 व्या पानावर एका मुस्लीम शिलेदाराचा उल्लेख आला आहे. त्याचे नाव आहे शामाखान. सोबतच राजवाडे यांचे 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' नावाचा एक ग्रंथ आहे. याच्या 17व्या खंडामधील 17 पानावर नूरखान बेग यांचा शिवाजीचा सरनोबत असा उल्लेख आहे. रियासतकार सरदेसाई यांनी शककर्ता शिवाजी हे पुस्तक लिहिले.

त्यात ते म्हणतात की, सन 1648 च्या सुमारास विजापूरच्या लष्करातले पाच-सातशे पठाण शिवाजीकडे नोकरीस आले. तेव्हा गोमाजी नाईक पानसंबळ याने त्याला सल्ला दिला, तो फार चांगला म्हणून शिवाजीने मान्य केला व पुढे तेच धोरण ठेवले.

नाईक म्हणाला, 'तुमचा लौकिक ऐकून हे लोक आले आहेत. त्यांस विन्मुख जाऊ देणे योग्य नाही. हिंदूंचाच संग्रह करू, इतरांची दरकार ठेवणार नाही अशी कल्पना धरिली तर राज्य प्राप्त होणार नाही. ज्या राज्य कारणे त्याने अठरा जाती, चारी वर्ण यांस आपापले धर्माप्रमाणे चालवून संग्रह ठेवावे.' ग्रँड डफने याने शिवाजी महाराज यांच्यावर चरित्र ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या 129 पानावर ते गोमाजी नायकांच्या सल्ल्याचा उल्लेख करतात. ते म्हणतात की, 'यानंतर शिवाजीने आपल्या सैन्यात मुसलमानांना सुद्धा सामावून घेतले आणि त्यांच्या स्थापनेत याचा फार मोठा उपयोग झाला.' त्यामुळे शिवरायांच्या पदही हिंदू, मुस्लीम साऱ्याच जाती-धर्माचे सैन्य होते, अधिकारी होते.

**इस्लामविरोधी होते का?**

'शिवाजी कोण होता?' या पुस्तकात गोविंद पानसरे म्हणतात की, शिवाजी हिंदू होता. त्याची धर्मावर श्रद्धा होती. त्या श्रद्धेप्रमाणे तो वागत होता. देव-देवतांना आणि साधुसंतांना पूजत होता. धर्मासाठी व देवळांसाठी दान देत होता व खर्च करीत होता. पण तो इस्लाम धर्माच्या विरुद्ध होता काय? तो हिंदू धर्मावर श्रद्धा ठेवत होता, म्हणजे मुस्लीम धर्माचा द्वेष करीत होता काय? मुसलमानांचे 'हिंदूकरण' किंवा 'महाराष्ट्रीयीकरण' करण्याचा त्याचा इरादा वा प्रयत्न होता काय? इतिहासाशी इमान राखून खरे बोलायचे, तर या साऱ्या प्रश्नांची उत्तरे 'नाही' अशी आहेत.

शिवाजीने सुरतेच्या केलेल्या दोन्ही वेळच्या लुटीची तपशीलवार वर्णने उपलब्ध आहेत. जुन्नरची बाजारपेठ लुटल्याची व अशाच इतरही लुटीची वर्णने आहेत. पण एक तरी मशीद पाडल्याचे उदाहरण इतिहासात नमूद आहे काय ? निदान मुळात मंदिर असलेली पण मुसलमानांनी मशिदीत रूपांतर केले अशी तरी मशीद पाडून तिथे पुन्हा मंदिर बांधल्याची नोंद आहे काय? मुळीच नाही. याउलट मशिदींना दान व इनामे दिल्याच्या नोंदी मात्र आहेत.

**अशाही सहिष्णुतेची नोंद**

सभासदाच्या बखरीतील एक उतारा आहे. ते म्हणतात, 'मुलखात देव-देवस्थाने जागोजागी होती. त्यास दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक स्थान पाहून यथायोग्य चालविले. मुसलमानांचे पीर, मशिदी, त्यांचे दिवाबत्ती, नैवेद्य, स्थान पाहून चालविले.' शिवाजी महाराजांच्या काळात हिंदू मंदिरे, मुस्लिमांचे दर्गे, साधू, संत आणि फकीरांना मान होता. शिवाजी महाराज अनेकांना गुरू मानतात त्यात 'याकुतबाबा' या एका मुस्लीम संताचाही समावेश आहे.

खाफीखान हा मुस्लीम इतिहासकार म्हणतो,'शिवाजीने सैनिकांकरिता असा सक्त नियम केला होता की, सैनिक ज्या ज्या ठिकाणी लूट करण्यास जातील; तेथे तेथे त्यांनी मशिदीस, कुराण ग्रंथास अथवा कोणत्याही स्त्रीस तोषीस अगर त्रास देता कामा नये. जर एखादा कुराणाचा ग्रंथ हाती आला तर त्याबद्दल पूज्यभाव दाखवून तो आपले मुसलमान नोकरांच्या स्वाधीन करीत असे. केव्हाही हिंदू किंवा मुस्लीम स्त्रिया हाती सापडल्यास व त्यांचे रक्षण करण्यास कोणी जवळ नसल्यास त्यांचे नातलग त्यांची सुटका करण्यास येईपर्यंत शिवाजी स्वतः तिची काळजी करीत असे.'

**तर साम्राज्य नष्ट होईल**

गोविंद पानसरे शिवाजी कोण होता, या पुस्तकात शिवरायांनी औरंगजेबाला लिहिलेल्या पत्राचा उल्लेख करतात. त्या पत्रात शिवाजी महाराज म्हणतात की,'कुराण धर्मग्रंथ ही प्रत्यक्ष ईश्वराची वाणी आहे. ते अस्मानी किताब आहे. त्यात ईश्वरास 'जगाचा ईश्वर' म्हटले आहे. 'मुसलमानांचा ईश्वर' असे म्हटलेले नाही. कारण हिंदू व मुसलमान या जाती ईश्वरापाशी एकरंग आहेत. मुसलमान लोक मशिदीत बांग देतात, ती भगवंताची स्तुतीच होय आणि हिंदू लोकही देवळात घंटा वाजवून ईश्वराची स्तुतीच करतात. म्हणून जातिधर्मावर जुलूम करणे भगवंताशी वैरत्व करणे होय. कारण शास्त्र व न्याय या दोन्हीही दृष्टीने विचार केला तरी जिझिया पट्टी ही गैर आहे. म्हणून शिवाजीने औरंगजेबास असे लिहिले आहे की, त्याने विवेकास फाटा देऊ नये.

छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि त्यांच्या राज्यकारभाराचा इतिहास तपासला तर त्यांच्या सैन्यात मुस्लीम सरदार होते हे सिद्ध होते. परंतु, नितेश राणेसारखे काही XX डोक उगाच अकलेचे तारे तोडून वातावरण कलुषित करीत आहेत .

■ ■ ■

# विनोद सम्राट दादा कोंडके

आज १४ मार्च, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांचा स्मृतिदिन.

जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले.



त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले.

निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले.

वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली.

पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. गाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला.

सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती.

दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली.

सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली.

दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डाशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली.

१४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. विनोद सम्राट दादा कोंडके यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

■ ■ ■

## हिंदू-मुस्लिमच्या गोंधळात होळी

**व्यंग्य**

गावात यंदा होळीचा धुरळा काहीसा वेगळ्याच कारणांसाठी उडत होता.
होळी पेटायच्या आधीच लोकांच्या मनात विचारांचे वणवे पेटले होते.
पंचायतच्या बैठकीत रामभाऊ उठून म्हणाले,
₹बघा मंडळी, होळी ही आपली परंपरा आहे. पूर्वजांपासून चालत आलेली!
यावर अजीजभाई हसत म्हणाले, हो, पण परंपराही बदलत असते, नाही का? काय हरकत आहे, यंदा हिंदू-मुस्लिम सगळे मिळून होळी साजरी करू?
इतक्यात सरपंचांनी कपाळावर आठ्या घेत विचारलं, म्हणजे? नेमकं काय सुचवताय?
अहो, दरवर्षी कोणीतरी कुठल्या तरी वादाच्या नादात होळी पेटवतो. मग कधी मंदिर-मशिदीचा वाद, कधी कोणाचा राजकीय अजेंडा. यंदा काहीतरी वेगळं करूया!
रामभाऊंनी मिशा कुरवाळत विचारलं, ते म्हणजे काय?
₹यंदा होळीमध्ये जुनाट भांडणं, द्वेष आणि भेदभावाची कागदपत्रं टाकू या! आणि सर्वांनी मिळून होळीच्या आगीत नफरत जाळून टाकूया!
गावात एकच कुजबुज सुरू झाली. कोणी म्हणे, ही काहीतरी नवीन शक्कल आहे!, तर कोणी म्हणे, असं केल्याने आपल्या धार्मिक परंपरांचा अपमान नाही का होणार?
इतक्यात जुनेरकर आजोबा, गावातल्या सगळ्यात अनुभवी माणसांनी, आपली काठी टाकली आणि म्हणाले, अहो, परंपरा टिकवल्याच पाहिजेत, पण त्याहीपेक्षा माणुसकी जपली पाहिजे! जोपर्यंत होळीच्या ज्वाळांमध्ये नफरत जळत नाही, तोपर्यंत खरी होळी कधीच होणार नाही.
शेवटी सर्वांनी एकमतानं ठरवलं - यंदाची होळी नुसती लाकडं जाळण्यासाठी नव्हे, तर मनातला द्वेष जाळण्यासाठी असेल. रामभाऊंनी जुन्या राजकीय वादाच्या कात्रणांचा गठ्ठा टाकला, अजीजभाईंनी फुटक्या कट्टरतेच्या घोषणा असलेले पोस्टर्स टाकले, आणि सरपंचांनी गावातल्या तंट्याच्या फाईली होळीत फेकून दिल्या. आगीच्या ज्वाळा वर चढू लागल्या, पण यंदा त्या भांडणांचे नव्हे, तर सलोख्याचे प्रतीक बनल्या.

---------------------

**डॉ. प्रवीण डबली**
**वरिष्ठ पत्रकार, नागपूर.**
**9422125656**

■ ■ ■

**वाचक लिहितात**

## तुकाराम बीज

१६ मार्च, फाल्गुन कृष्ण द्वितीया म्हणजेच तुकाराम बीज .संत तुकाराम महाराजांचा जन्म पुण्या जवळील देहु या गावी झाला. पांडुरंगाचा साक्षात्कार झाल्यानंतर ते हरिनामात लीन झाले. त्यांचे अभंग ठाऊक नाहीत असा कोणी महाराष्ट्रात शोधून सापडणार नाही.

स्वर्गीय लता मंगेशकर यांनी त्यांचे अभंग गाऊन ते घरोघरी पोहोचवले. तुकाराम महाराजांच्या इतक्या साध्या सोप्या रचना आणि लता मंगेशकर चा गोड आवाज यांनी त्या अजरामर झाल्या. ज्ञाना रचिला पाया, तुका झालासे कळस! हे वारकरी संप्रदायाचे शाश्वत सत्य आहे.

तुकाराम बीज म्हणजे संत तुकाराम महाराजांचा सदेह वैकुंठ गमनाचा दिवस. म्हणजेच साधकांचा या संतश्रेष्ठच्या चरणी कोटी कोटी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. असं म्हणतात फक्त तुकाराम महाराजच सदेह वैकुंठात गेले. आजपर्यंत कोणीही मानव असा सदेह वैकुंठात गेला नाही. यावरून संत तुकाराम महाराज अवतारी पुरुषच होते हे सिद्ध होते. महाराज सतत भावावस्थेतच असायचे. अखंड नामस्मरण याव्यतिरिक्त त्यांना कशाचे भान नसायचे. संसारात ते असून नसल्यासारखे होते. इतके ते ईश्वरचरणी लीन झालेले असत. ते सतत भावावस्थेतच असायचे त्यामुळे त्यांची देह बुद्धी अत्यल्प होती आणि ते सर्व साक्षीभावाने पाहत . तुकाराम महाराज ज्या स्थानावरून सदेह वैकुंठ्यात गेले तेथे वृक्ष आहे. त्याचे नाव आहे नांदूरकी. आजही तो वृक्ष ज्या दिवशी आणि ज्या वेळेस म्हणजे दुपारी बारा वाजून दोन मिनिटांनी महाराज सदेह वैकुंठात गेले त्यावेळी तो हलतो. याची लाखो भक्त अनुभूती घेतात. इथे स्थळ आणि काळ यांचा संगम झाला. आणि ती ऊर्जा घणीभूत झाली असे वाटते. वारकरी संप्रदायात ज्ञानभक्ती प्रचार- प्रसार करण्यासाठी जी कीर्तने होतात ती तुकाराम महाराजांच्या अभंगांवर होतात आणि प्रत्येक कीर्तनाच्या शेवटी हेचि दान देगा देवा ! तुझा विसर न व्हावा !हा अभंग आवर्जून म्हंटला जातो.

तुकाराम महाराजांनी मराठी वाङ्मय समृद्ध केले. पुढे ते जोपासणे आपले कर्तव्य आहे, नव्हे ती आपली साधना आहे. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे चरणी कोटी कोटी कृतज्ञता.

■ **सौ. माधवी पत्की, नागपूर.**

# घरीच करा रक्त तपासणी हे अॅप्स करतील तुमची मदत

एआयचे हे युग आहे. देशात तंत्रज्ञान दिवसागणिक वाढत आहे. यामुळे लोकांची जीवनशैलीही सोपी होत चालली आहे. तुम्ही आता एक क्लिकवर काहीही करू शकता. आता जर तुम्ही किंवा तुमचे कुटुंब आजारी पडले तर तुम्हाला रुग्णालयात जाण्याची गरज नाही. ना पॅथॉलॉजीच्या रांगेत उभं राहावं लागेल ना जॅममध्ये ढकलून लॅबपर्यंत पोहोचण्याची स्पधार्ही होणार नाही. घरबसल्या तुमची तपासणी केली जाईल. आरोग्य तपासणीसाठी कुठेही जायची गरज नाही. हे काम तुम्ही काही ॲप्सच्या माध्यमातून घरबसल्या करून घेऊ शकता.

रक्त तपासणी, साखर, बीपी तपासण्यासाठी पॅथॉलॉजीमध्ये जाण्याची गरज नाही. बाजारात असे काही ॲप्स आहेत, जे तुम्हाला घरबसल्या हेल्थ चेकअपची सुविधा देतात. ॲपच्या माध्यमातून तुम्ही घरबसल्या ऑनलाइन अपॉइंटमेंट बुक करू शकता. तुम्ही हे सर्व ॲप्स डाऊनलोड करू शकता आणि बुकिंग करण्यापूर्वी सर्व ॲप्समधील टेस्टच्या किंमतीची तुलना करू शकता.

डॉ. लाल पॅथलॅब ही भारतातील सर्वात मोठी आणि जुनी पॅथॉलॉजी लॅब आहे. याची स्थापना



1949 मध्ये डॉ. एस. के. लाल यांनी केली. या अॅप्सच्या माध्यमातून तुम्ही घरबसल्या बुकिंग आणि चेक करू शकता. बुकिंग केल्यानंतर टीम तुमच्या घरी येऊन नमुने घेईल. त्यानंतर अहवाल तुमच्याकडे पाठवला जाईल.

हेल्थियन्स ही आणखी एक अग्रगण्य पॅथॉलॉजी लॅब आहे जी देशभरात आपली सेवा प्रदान करते. दीपक शहा यांनी 2015 मध्ये याची स्थापना केली. यामाध्यमातून घरबसल्या आरोग्य तपासणी ही करता येणार आहे. सर्व चेकअप फी पाहून तुम्ही स्वतःनुसार निर्णय घेऊ शकता.

रॅडक्लिफ लॅब्स ही पॅथॉलॉजी लॅब आहे. जी देशभरात आपली सेवा पुरवते. याची स्थापना 2017 मध्ये दिनेश चौधरी यांनी केली. या लॅबच्या ॲपच्या माध्यमातून तुम्ही ऑनलाईन हेल्थ चेकअपसाठी बुकिंग करू शकता आणि आपली टेस्ट करून घेऊ शकता.

हे वरील ॲप्स तुम्हाला घरबसल्या हेल्थ चेकअपची सुविधा देत आहे. या ॲप्सच्या माध्यमातून तुम्ही घरी ऑनलाइन अपॉइंटमेंट बुक करू शकता. तुम्ही हे सर्व ॲप्स डाऊनलोड करू शकता आणि बुकिंग करण्यापूर्वी सर्व ॲप्समधील टेस्टच्या किंमतीची तुलना देखील करू शकता.

■ ■ ■

# ॲमेझॉन इंडियाच्या एलीव्हेटहर २०२५ ने गतीशील मार्गदर्शन आणि करिअर विकासाच्या माध्यमातून महिलांना सक्षम केले




**मुंबई, १३ मार्च :** इंटरनॅशनल विमेन्स डे (आयडब्ल्यूडी) २०२५ निमित्त ॲमेझॉन इंडियाने ॲमेझॉन एलीव्हेटहर २०२५' उपक्रम साजरा केला. हा उपक्रम मार्गदर्शन आणि करिअर विकास संधींच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. यंदाची जागतिक आयडब्ल्यूडी थीम ॲक्सेलरेट ॲक्शन'शी संलग्न असलेल्या आणि बेंगळुरूमध्ये आयोजित करण्यात आलेल्या इव्हेण्टमध्ये ॲमेझॉन लीडर्स व महत्त्वाकांक्षी प्रोफेशनल्स एकत्र आले, ज्यांनी करिअर विकासासाठी मार्गदर्शन, सहयोग आणि प्रायोजकत्वाबाबत माहितीपूर्ण चर्चा केली. एलीव्हेटहर २०२५ मधून लैंगिक समानता आणि महिलांना त्यांच्या संपूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यास आवश्यक असलेली टूल्स व संसाधने प्रदान करण्याप्रती ॲमेझॉनची कटिबद्धता दिसून येते.

या इव्हेण्टचे खास आकर्षण ठरले गतीशील मार्गदर्शन सत्र, जेथे विविध पार्श्वभूमींमधील १०० हून अधिक माहिला व्यावसायिकदृष्ट्या प्रगती करण्यासाठी ॲमेझॉन लीडर्ससोबत करिअर वाढ, नेतृत्व विकास आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासंदर्भातील केंद्रित चर्चांमध्ये सामील झाल्या. मार्गदर्शक दिवा: प्रायोजकत्व, स्थिरता आणि प्रगती करण्यास महिलांचे सक्षमीकरण' या विषयावर झालेल्या फायरसाइड गप्पागोष्टींनी या इव्हेण्टला अधिक उत्साहवर्धक केले. या गप्पागोष्टींमध्ये अभिनेत्री व लेखिका सोनाली बेंद्रे आणि जपान व इमर्जिंग मार्केट्समधील ॲमेझॉन इंडियाच्या पीपल ईएक्स्पेरिअन्स अँड टेक्नॉलॉजीच्या उपाध्यक्ष व एचआर दीप्ती वर्मा सहभागी झाल्या.

ॲमेझॉनमध्ये आम्ही संस्कृती घडवत आहोत, जेथे प्रत्येकजण प्रगती करू शकतो. आमचा दृष्टिकोन मार्गदर्शनावरून सहयोग व प्रायोजकत्वापर्यंत विकसित झाला आहे, ज्यामुळे करिअर प्रगतीसाठी सपोर्ट सिस्टम निर्माण होत आहे. आमचे लीडर्स कर्मचारी, सहयोगी व भागीदारांसाठी उपक्रमांचे नेतृत्व करतात, ज्यामुळे ॲमेझॉनमध्ये विकासाला गती मिळते. एलीव्हेटहर २०२५ चा विविध पार्श्वभूमींमधील महिलांना त्यांची करिअर ध्येये संपादित करण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये व नेटवर्कसह सुसज्ज करण्याचा मनसुबा आहे. आम्हाला गतीशील मार्गदर्शन सत्रांनी या महत्त्वाकांक्षी प्रोफेशनल्स दिलेल्या संधीचा आनंद होत आहे,'' असे इमर्जिंग मार्केट्समधील ॲमेझॉन इंडियाच्या पीपल ईएक्स्पेरिअन्स अँड टेक्नॉलॉजीच्या उपाध्यक्ष व एचआर दीप्ती वर्मा म्हणाल्या.

## खलनायकी भूमिका साकारण्यासोबतही त्याची अशी आव्हाने सांगत आहे पुलकित बांगिया कैसे मुझे तुम मिल गयेमधील अबीरच्या परिवर्तनाबद्दल!



**मुंबई, १३ मार्च :** झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका कैसे मुझे तुम मिल गये आपल्या लक्षवेधी कथानक आणि अमृता (सृती झा) आणि रणवीर/विराट (अर्जित तनेजा) यांच्यातील केमिस्ट्रीने प्रेक्षकांना खिळवून ठेवत आहे. यातील नाट्य आता अधिक गहन झाले असून विशेषत: अबीर (पुलकित बंगिया) मध्ये धक्कादायक परिवर्तन होत आहे.

सुरुवातीला एक आकर्षक आणि सहाय्यक व्यक्तिरेखा म्हणून दाखवण्यात आलेला अबीर आता अमृताला रणवीर (विराट) पासून वेगळे करण्याच्या प्रयत्नात धूर्तपणा करू लागला आहे. अमृताच्या प्रेमाचे त्याला वेड लागले असून तिच्याशी लग्न करण्याचा दृढनिश्चय त्याने केला आहे आणि त्यामुळे आता तो मानवी (आकांक्षा चमोला) सोबत मिळून रणवीरच्या (विराटच्या) आठवणी औषधांच्या वापराने पुसून टाकण्यामध्ये तिला सामील होतो. अबीरच्या व्यक्तिरेखेतील या बदलामुळे कथानकात नवीन स्तर निर्माण झाले आहेत आणि पुलकितने परिवर्तनाच्या या गुंतागुंतींना अतिशय कुशलतेने स्वीकारले आहे.

व्यक्तिरेखा विकासाबद्दल बोलताना पुलकित बांगिया म्हणाला, अबीरची व्यक्तिरेखा आव्हानात्मक पण रोमांचक आहे. 'कैसे मुझे तुम मिल गये' मधील अबीरच्या दृष्टिकोनातून त्याच्या कृती योग्य वाटतात – तो त्याच्या प्रेमासाठी लढत आहे असे त्याला वाटते आणि विराट आपल्या मार्गातील एक अडथळा आहे असे त्याला वाटते. अमृतासोबत राहण्यासाठी तो कुठल्याही थराला जाण्यास तयार आहे. त्याने सुरुवात एका सकारात्मक पात्राच्या रुपात केली होती, परंतु आता त्याच्या भावना त्याला नैतिकदृष्ट्या खलनायकी मार्गावर घेऊन गेल्या आहेत. या व्यक्तिरेखेला अनेक स्तर आहेत आणि ही खलनायकी भूमिका साकारताना आव्हानेही येत आहेत. परंतु अशाच भूमिका तुम्हाला अभिनेता म्हणून सखोल भावनांचा शोध घेण्यास प्रवृत्त करतात. हे परिवर्तन साकारताना मला खरंच मजा येत आहे. अबीरचा दृष्टिकोन विकसित करणे हा शिकण्याचा एक उत्तम अनुभव आहे आणि प्रेक्षक त्यावर कसा प्रतिसाद देतात हे पाहण्यासाठी मी उत्सुक आहे.

अबीरच्या गडद बाजूकडे जाण्याच्या पुलकितच्या प्रभावी चित्रणामुळे आता मालिकेत आणखी खोली आली आहे, परंतु तो आपले ध्येय साध्य करण्यासाठी कुठल्या थराला जातो हे पाहणे बाकी आहे. अबीरची हेराफेरी यशस्वी होईल की त्याचे खरे हेतू उघड होतील हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक असतील. तो अमृता आणि विराट/रणवीर यांना वेगळे ठेवण्यात यशस्वी होईल का?

## इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग अँड फायनान्शियल सरव्हिसेस INVIT रोडस्टार इन्फ्रा इन्वेस्टमेंट ट्रस्ट एनएसई वर सूचीबद्ध




**मुंबई, १३ मार्च :** इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग अँड फायनान्शियल सरव्हिसेसने रोडस्टार इन्फ्रा इन्वेस्टमेंट ट्रस्ट InvIT युनिट्स एनएसई वर सूचीबद्ध केले. त्यासाठी झालेल्या कार्यक्रमात इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग अँड फायनान्शियल सरव्हिसेस समूहाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. नंद किशोर; अध्यक्ष डॉ. जे. एन. सिंग आणि रोडस्टार इन्वेस्टमेंट मॅनेजर्स लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. डॅनी सॅम्युएल; तसेच नवीन संचालक मंडळातील अनेक सदस्य उपस्थित होते.

रोडस्टार इन्वेस्टमेंट मॅनेजर्स लिमिटेडची सूचीबद्धता च्या वितरणानंतर झाली आहे. त्यात ६ रस्ते प्रकल्प समाविष्ट असून त्यांचे एकूण उपक्रम मूल्यांकन ८,५९२ कोटी रु. आहे. यामुळे इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग अँड फायनान्शियल सरव्हिसेस ग्रुपने कर्ज निर्धारणासाठी विविध आर्थिक साधनांचा प्रभावी वापर करण्याची क्षमता दाखवली आहे.

रोडस्टार इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड द्वारे प्रायोजित रोडस्टार इन्फ्रा इन्वेस्टमेंट ट्रस्टची स्थापना भारतातील पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये थेट किंवा अप्रत्यक्षरित्या मालकी, संचालन आणि गुंतवणूक करण्याच्या उद्देशाने करण्यात आली असून तो नियमनांतर्गत नोंदणीकृत आहे.

इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग अँड फायनान्शियल सरव्हिसेस ग्रुपचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक नंद किशोर म्हणाले, इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग अँड फायनान्शियल सरव्हिसेस InvIT ची यशस्वी सूचीबद्धता यातून नवीन संचालक मंडळाने निवड केलेला आणि पूर्ण केलेला एक नाविन्यपूर्ण निर्धारण पर्याय सूचित होतो. यातून आपल्या रस्ते प्रकल्पांसाठी जास्तीत जास्त परतावा मिळवून देत एक कार्यक्षम निर्धारण सुनिश्चित करण्यात आले.

मुद्रीकरण, अंतरिम वितरण आणि आता रोडस्टार InvIT चे NSE वर यशस्वी सूचीबद्धकरण हे इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग अँड फायनान्शियल सरव्हिसेसच्या निर्धारण प्रक्रियेतील महत्त्वाचे टप्पे आहेत. आम्हाला विशेष आनंद आहे की या उपक्रमामुळे पोर्टफोलिओअंतर्गत सध्याच्या आणि भविष्यातील रस्ते प्रकल्पांच्या वाढीची मोठी क्षमता खुली होईल.

इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग अँड फायनान्शियल सरव्हिसेसने अलीकडेच त्यांचा सर्वात मोठा अंतरिम वितरणाचा टप्पा पूर्ण केला. त्यामध्ये ५,००० कोटी रु. चे वितरण करण्यात आले. यामुळे इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग अँड फायनान्शियल सरव्हिसेस ग्रुपने आतापर्यंत एकूण ४३,००० कोटी रु. चे कर्ज फेडले आहे. हे त्यांच्या ६१,००० कोटी रु. च्या एकूण कर्ज निर्धारण लक्ष्याच्या ७० टक्के भागाची पूर्तता करते. यामुळे भारताच्या सर्वात मोठ्या आर्थिक संकट निर्मूलनाच्या प्रभावी प्रवासात इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग अँड फायनान्शियल सरव्हिसेसच्या बांधिलकीला अधोरेखित केले आहे.

रोडस्टार इन्वेस्टमेंट मॅनेजर्स लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॅनी सॅम्युएल म्हणाले, NSE वर इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग अँड फायनान्शियल सरव्हिसेसचे यशस्वी सूचीबद्ध होणे हे इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग अँड फायनान्शियल सरव्हिसेस च्या मोठ्या प्रमाणातील कर्ज निर्धारणातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या सूचीबद्धतेनंतर, ट्रस्ट पर्यायी गुंतवणूक क्षेत्रात रस असलेल्या जोखीम टाळणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी एक नवीन प्लॅटफॉर्म सादर करेल.

महसूल उत्पन्न करणारी पायाभूत सुविधा मालमत्ता व्यवस्थापन आणि संपादनामधील व्यवस्थापन टीमचे कौशल्य, क्षमता आणि व्यावसायिकता तसेच या क्षेत्रात नवीन भांडवलासाठी वाढणाऱ्या संधी, ट्रस्टच्या सध्याच्या पोर्टफोलिओ आणि मूल्यांकनाला लक्षणीयरीत्या वृद्धिंगत करतील. आम्ही ट्रस्टच्या मालमत्तांचे व्यवस्थापन एक शाश्वत आणि मूल्यवर्धित दृष्टिकोनातून प्रभावीपणे करण्यास कटिबद्ध आहोत. त्याचा फायदा आमच्या युनिट धारकांना आणि इतर स्टेकहोल्डर्सना होईल.

## भूल भुलैया ३: अब टूटेगा डर का ताला वर्ल्ड टीव्ही प्रीमियर, फक्त सोनी मॅक्सवर



**मुंबई, १३ मार्च :** थरारक रहस्ये, भयंकर चकमकी आणि हास्यस्फोटांनी भरलेल्या थरारक रजनीच्या अनुभवासाठी सज्ज व्हा, कारण सोनी मॅक्सवर भूल भुलैया ३ या ब्लॉकबस्टर चित्रपटाचा प्रीमियर सादर होणार आहे! आपल्या घरी आरामात बसून भूल भुलैया ३ची जादू अनुभवण्याची संधी गमावू नका. १६ मार्च रोजी रात्री ८ वाजता सोनी मॅक्स लावा आणि एक अविस्मरणीय रजनी अनुभवा!

या चित्रपटात रहस्य, कॉमेडी आणि अमानवी थरार यांची कुशलतेने गुंफण केली आहे. यातील पात्रांना पुन्हा जाग्या झालेल्या दुष्ट आत्म्यांचा अनुभव येतो. मोंजोलिकाच्या पुनरागमनाचे रहस्य या कथानकाच्या केंद्रस्थानी आहे आणि त्यामागचे सत्य शोधून त्या अतृप्त आत्म्यांना शांत करण्याचा प्रयत्न असे या कथानकाचे स्वरूप आहे.भूल भुलैया ३ मध्ये थरार आणि हास्य यांचे अद्भुत मिश्रण आहे त्यामुळे संपूर्ण कुटुंबाला एकत्र बसून बघता येईल असा हा चित्रपट आहे. या चित्रपटात कार्तिक आर्यन, विद्या बालन, माधुरी दीक्षित आणि तृप्ती डिमरी यांसारखे मोठमोठे कलाकार आहेत.

या चित्रपटाच्या वर्ल्ड टीव्ही प्रीमियरच्या आधी अभिनेता कार्तिक आर्यन आणि विद्या बालन यांनी या चित्रपटाच्या शूटिंग दरम्यानचे त्यांचे संस्मरणीय अनुभव शेअर केले. चित्रपटाच्या शेवटी येणाऱ्या आपल्या तांडव परफॉर्मन्सची आठवण कार्तिकने सांगितली. या परफॉर्मन्ससाठी आमी जे तोमार या प्रसिद्ध गीताला सोनू निगमने आवाज दिला आहे. कार्तिकला आठवते आहे की, या गीताच्या तालमीच्या वेळेस माधुरी दीक्षितने त्याला मार्गदर्शन केले होते, ज्यामुळे त्याला आपल्या डान्स स्टेप्स अचूक बसवता आल्या. तो म्हणतो, चित्रपटाच्या शेवटी आमी जे तोमार गाणे येते. यावेळी ते सोनू निगमने म्हटले आहे. या गाण्यावर मी तांडव केले आहे, जी माझी सखोल स्मृती आहे. या गीताची बहुतांशी कोरिओग्राफी सेटवरच झाली होती. मला आठवते आहे की, त्यातील काही स्टेप्स शिकवण्यासाठी माधुरी जी खास तालमीसाठी हजर होत्या. माझ्या काही डान्स स्टेप्स त्यांनी सुधारल्या आणि त्या गीतावरील डान्सिंगच्या काही युक्त्या मला शिकवल्या, ज्याचा मला खूप उपयोग झाला. या सुंदर आठवणी कायम माझ्यासोबत राहतील.

दुसरीकडे, दीवाना बना दे या गीतावर तिने माधुरी दीक्षितसोबत केलेल्या डान्सच्या आठवणींना उजाळा देताना कबूल करते की, तो अनुभव स्वर्गीय होता आणि माझ्या आदर्श डान्सरसोबत मी मंच शेअर केला यावर अजून माझा विश्वासच बसत नाही. ही आठवण सांगताना ती म्हणते, माझ्यासाठी, दीवाना बना दे म्हणजे माझ्या गीतावर माधुरी दीक्षित सोबत केलेला डान्स. ही भावनाच फार सुंदर आहे. आणि आता ते फक्त माझे नाही तर आमचे गाणे झाले आहे. माझा तर अजून यावर विश्वास बसत नाहीये. हे सारे अद्भुत आहे आणि खुद्द माधुरी दीक्षित म्हणजेच एक जादू आहे. तिच्यासोबत परफॉर्म करण्याचा थरार मी अनुभवला आहे. आपल्या घरी आरामात बसून भूल भुलैया ३ची जादू अनुभवण्याची संधी गमावू नका. १६ मार्च रोजी रात्री ८ वाजता सोनी मॅक्स लावा आणि एक अविस्मरणीय रजनी अनुभवा!

## उर्मिला शर्मा एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये हप्पूच्या सासूच्या भूमिकेत सामील झाल्या



**मुंबई, १३ मार्च :** हसून-हसून लोटपोट होण्यास सज्ज राहा, जेथे दिग्गज टेलिव्हिजन अभिनेत्री उर्मिला शर्मा एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये भव्य प्रवेश करत आहेत. मालिकेमध्ये त्या राजेशची (गीतांजली मिश्रा) आई आणि दरोगा हप्पू सिंगच्या (योगेश त्रिपाठी) सासूच्या भूमिकेत दिसणार आहेत. त्यांच्या प्रवेशासह घरामध्ये विनोदी गोंधळ निर्माण होणार आहे. प्रबळ व्यक्तिमत्त्व, सूक्ष्म बुद्धीकौशल्य आणि कधीच शमन होणाऱ्या भूकेसह त्या मालिकेमध्ये नवीन गोंधळ निर्माण करण्यास सज्ज आहेत. आपल्या भूमिकेबाबत सांगताना उर्मिला शर्मा म्हणाल्या, ''माझा प्रवेश हप्पूच्या घराला रणांगणामध्ये बदलेल, जेथे एक टीम हप्पूच्या कटोरी अम्माला (हिमानी शिवपुरी) पाठिंबा देईल, तर दुसरी टीम राजेशच्या (गीतांजली मिश्रा) अम्माला पाठिंबा देईल. तूतू-मैंमैं, विनोदी वादविवाद आणि एपिक सासू-सून प्रतिस्पर्धी नवीन विनोदी ट्विस्ट घेऊन येतील. दोन्ही महिलांचे व्यक्तिमत्त्व धाडसी आहे आणि एकमेकींना पाठिंबा देऊ शकत नाही, ज्यामुळे विनोदी रोलरकोस्टरचा आनंद मिळेल. यामध्ये अधिक उत्साहाची भर म्हणजे माझी भूमिका खूप फूडी आहे. ती सतत किचनमध्ये जाते, ज्यामुळे गैरसमज निर्माण होतात. रोजश व बिमलेश (सपना सिकरवार) यांची आई विशिष्ट सासूसारखी नाही. ती खोडकर आहे. तिला हप्पू (योगेश त्रिपाठी) कधीच आवडला नाही, पण अनपेक्षित स्थितींमुळे त्यांचा विवाह स्वीकारावा लागला होता. आता, ती राजेशला आठवण करून देते की हप्पूसोबत विवाह करणे तिच्या जीवनातील सर्वात मोठी चूक होती, जे आता तिच्यासाठी मोठे करमणूक बनले आहे. ती लोभी, चतुर आहे आणि तिला सतत भूक लागते, ज्यामुळे हप्पूच्या आधीच गोंधळलेल्या जीवनाला अधिक असह्य करून टाकते.''

विविध भूमिका साकारण्यासाठी लोकप्रिय असलेल्या अभिनेत्रीला विनोदीशैलीमध्ये परतण्याचा आनंद होत आहे. त्या म्हणाल्या, ''दीर्घकाळनंतर पुन्हा एकदा कॉमेडीकडे वळणे अत्यंत आनंददायी आहे आणि ही मालिका जादुई आहे. मी स्वत: मालिका 'हप्पू की उलटन पलटन'ची चाहती आहे आणि अशी महत्त्वपूर्ण भूमिका साकारणे अत्यंत आनंददायी आहे. मी या विनोदी भूमिकेप्रती प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया पाहण्यासाठी अत्यंत उत्सुक आहे. मी शूटिंगला सुरूवात केली आहे आणि कलाकार व टीम अत्यंत सहाय्यक आहेत, ज्यामुळे मला घरी असल्यासारखे वाटते.''

## तेनाली रामा मध्ये आपल्याविषयी संशय घेणाऱ्या तिम्मारासुला मारण्याचा विषकन्येचा प्रयत्न

**मुंबई, १३ मार्च :** सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज) या दरबारी कवी आणि मुत्सद्दी सल्लागाराच्या रोचक गोष्टींमध्ये प्रेक्षक रंगले आहेत. अलीकडच्या भागांमध्ये विषकन्या लैलाने (पवित्रा पुनिया) एका पर्शियन नर्तकीच्या वेषात विजयनगरच्या दरबारात प्रवेश केला आहे. राजा कृष्णदेवरायाला (आदित्य रेडिज) संपवण्याचा तिचा हेतू आहे. तिच्या आगमनामुळे दरबारी लोकांमध्ये कुतूहल जागे झाले आहे.

आगामी भागांमध्ये, विषकन्या एक पर्शियन भाषेत लिहिलेले पत्र राजाला देते, ज्यामुळे संदेह निर्माण होतो. तिम्मारासु (अमित पचोरी) त्या पत्राची सत्यासत्यता पडताळून पाहतो तेव्हा नकळत तो तिच्या योजनेतील अडथळा बनतो. त्याला दूर करण्याच्या निर्धाराने विषकन्या अंधारात लपतछपत त्याच्या कक्षात येते आणि त्याच्यावर विषारी हल्ला करते. तिम्मारासु जीवनासाठी झगडा देतो आणि त्यावेळी रामाला जाणवते की काहीतरी गडबड आहे. महाल संवेदनशील होतो, खोटेपणा आणि सत्य यांच्यात संघर्ष सुरू होतो. विषकन्येच्या घातक हल्ल्यातून तिम्मारासुचा बचाव होईल का? आणखी कुणाचा बळी जाण्याअगोदर रामा खऱ्या गुन्हेगाराचा बुरखा फाडू शकेल का?

तेनाली रामा मालिकेत विषकन्या लैलाची भूमिका करणारी पवित्रा पुनिया म्हणते, विषकन्येने पूर्वी तिच्यावर झालेल्या अन्यायाचा सूड उगवण्यासाठी गिरगिट राजशी हातमिळवणी केली आहे. ती अंधाराची राणी आहे आणि सूर्यप्रकाश तिला सहन होत नाही. आपल्या मार्गातला अडथळा दूर करून आपल्या लक्ष्याच्या आणखी जवळ पोहोचण्यासाठी ती तिम्मारासुवर विषारी हल्ला करते. आगामी भागांमध्ये, प्रेक्षक बघतील की विषकन्येची दुष्ट योजना कशी उलगडते आणि तेनाली रामा आणि राजाच्या जीवाला कसा धोका निर्माण होतो.

## अपप्रवृत्तीमुळे पवित्र सणाला गालबोट लागते



होळी हा आपल्या संस्कृतीतील एक मोठा आणि महत्वाचा सण आहे. भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण विविध नावांनी साजरा केला जातो. हा सण होळी, होलिकादहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, दोलायात्रा, कामदहन अशा विविध नावांनी साजरा केला जातो. होळीच्या दिवशी आपण आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून राख करावे अशी कल्पना आहे. त्यामुळे आपले मन निर्मळ व्हावे अशी अपेक्षा असते. आपल्या मनातील वाईट विचारांना होळी प्रमाणे आगीत जाळून सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा संकल्प करण्याचा हा दिवस. महाराष्ट्रात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. कोकणात तर हा सण अधिक मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी अग्नीत गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील एक कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. या दिवशी एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करणे. सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकता जपणे हा याचा उद्देश. बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. या दिवशी लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात मात्र गेल्या काही वर्षात या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तीमुळे या सणाचे पावित्र्य लोप पावले आहे. होळीचा सण साजरा करताना धांगडधिंगा घातला जातो. धुलीवंदनाच्या दिवशी तर एकमेकांना गुलाल लावण्याऐवजी रसायन मिश्रित रंग लावले जातात. पाण्याचा अपव्यय केला जातो. काही समाज कंटक पाण्याने, रंगाने भरलेले फुगे, पिशव्या रेल्वे गाड्या, बसगाड्यावर तसेच रस्त्यावर फेकून मरतात. त्यात अनेकजण जखमी होतात. अशा घटनांत यापूर्वी काहींना आपले डोळे गमवावे लागले आहेत तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. काही महाभाग तर जाणीवपूर्वक महिलांना टार्गेट करतात. काहीजण रंगाऐवजी नासकी अंडी फेकून मारतात. काहीजण तर या दिवशी लाऊस्पिकरवर मोठ्या आवाजात गाणी लावून हिडीस नृत्य करतात. धुलीवंदनच्या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. मद्यपान करून नृत्य करताना बऱ्याचदा वाद होतो. हा वाद विकोपाला गेला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. वास्तविक होळी आणि धुलीवंदन हे अतिशय पवित्र सण आहेत. मात्र या अपप्रवृत्तीमुळे या सणाला गालबोट लागत आहे. ही अपप्रवृत्ती दूर करून सर्वांनी होळीचा सण साजरा करावा. जे समाज कंटक या पवित्र सणाला गालबोट लावतील त्यांना पोलिसांनी कडक शासन करावे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## राशीभविष्य

**मेष :** जवळच्या मित्राची भेट होईल. राजकारणात तुमचे विरोधक पराभूत होतील. आज न्यायालयीन खटल्यांमध्ये यशासोबतच नुकसानही सहन करावे लागेल. आज आर्थिक स्थिती सुधारेल.

**वृषभ :** आज तुम्हाला पालकांकडून सहकार्य मिळेल. समाजात मान-सन्मान मिळेल. प्रेमसंबंधांमध्ये भावनिक वागणूक जवळ आणेल. लग्नाची चर्चा पुढे नेण्यापूर्वी एकमेकांची योग्य काळजी घ्या आणि नात्याला वेळ द्या.

**मिथुन :** काही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर झाल्यास आर्थिक लाभ होईल. तुम्हाला तुमच्या नोकरीत पैसे आणि भेटवस्तू मिळतील. सामाजिक कार्यावर जास्त पैसा खर्च करण्यापूर्वी तुम्ही नीट विचार केला पाहिजे.

**कर्क :** आज आर्थिक स्थितीत चढ-उतार असतील. उत्पन्न चालू राहील पण खर्च जास्त होईल. घरामध्ये धार्मिक शुभ अधिकाजयांवर पैसा खर्च होण्याची शक्यता आहे. शहाणपणाने पैसे खर्च करा.

**सिंह :** बेरोजगारांना रोजगार मिळेल. नको त्या प्रवासाला जावे लागेल. राजकारणात विरोधक अधिक सक्रिय होतील. विज्ञान आणि संशोधन कार्यात लक्षणीय यश मिळेल. ज्याचे सर्वत्र कौतुक होईल.

**कन्या :** आज तुम्हाला वैवाहिक जीवनात आनंददायी काळ जाईल. पर्यटनस्थळी सहलीला जाता येईल. प्रेमप्रकरणात पैसा जास्त खर्च होईल. एखाद्या चांगल्या मित्राकडून चांगली बातमी मिळेल.

**तुळ :** आज तुमचे वरिष्ठ तुमचे व्यवहार आणि गोड बोलण्याने खूप प्रभावित होतील. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.

**वृश्चिक :** आज तुमच्या संचित संपत्तीत वाढ होईल. प्रलंबित पैसे मिळण्यात काही वाढ होऊ शकते. व्यवसायाशी संबंधित लोकांना अचानक पैसे मिळू शकतात. एखादी महागडी वस्तू खरेदी करता येईल.


**धनु :** आई-वडिलांची सेवा केल्याने तुम्हाला आशीर्वाद मिळेल. आज आरोग्यात बिघाड होईल. गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांना उपचारासाठी घरापासून दूर जावे लागेल.

**मकर :** आज जुनी जखम बरी होऊ शकते. म्हणजे जुना प्रतिस्पर्धी नव्या रूपात समोर येऊ शकतो. आज तुम्हाला मुलांकडून काही चांगली बातमी मिळेल. अभ्यास आणि व्यवसायाशी संबंधित लोकांना विशेष यश मिळेल.

**कुंभ :** काही अनुचित घटना घडण्याची शक्यता आहे. पाठदुखीचा त्रास कायम राहील. आज परदेश दौजयावर किंवा लांबच्या प्रवासाला जाण्याची शक्यता आहे. उद्योगधंद्यातील अडथळे दूर होतील.

**मीन :** तुम्हाला तुमच्या सासरच्या मंडळींकडून काही शुभ कार्यक्रमाचे आमंत्रण मिळेल. व्यवसायात नवीन सहकारी प्रगतीचे घटक सिद्ध होतील. सरकारच्या सहकार्याने योजना मार्गी लागतील.

## शब्दकोडे क्रमांक २०५८




**आडवे शब्द :-**
१) ह्या विमानांनी बालाकोटवर बॉम्ब वर्षाव केला
७) सपाट
१०) मीठ
११) एक क्षार
१२) पंधरवडा
१३) मुसलमानांचा उपवासाचा महिना
१५) वांती
१७) अवस्था, स्थिती
१८) अगदी गोलाकार
१९) जिम्मेदार
२१) सप्तस्वरातील पहिला स्वर
२३) पंकज
२४) नाश, शेवट, लय
२५) बाण
२६) मनातील इच्छा
२७) भांडण, चर्चा
२८) मनाला वाटणारी अनिश्चिततेची भीती
३०) शक्ती, जोर, बळ
३२) मर्यादा, सीमा
३३) विळखा
३४) शेवटचा भाग
३६) आवळा फळाचा एक गोड औषधी प्रकार
३७) देवाचे मानवी रूप
३८) कर्ज देणारा
४१) उंट हाकणारा
४३) च्या पुढे, च्या देखत
४५) लेखणीच्या एका फटक्याने दुसऱ्याचे कायमचे नुकसान करणारा
४८) सुस्ती
५०) श्रीरामाच्या एका पुत्राचे नाव
५१) प्रेमळ
५२) उत्तम सोने
५५) विशेष
५७) नोकर
५८) हेळसांड
५९) लपेटी अक्षराचा फाटा
६१) स्त्री, बाई
६२) पंख
६३) आजोबा
६४) कापड
६६) उद्याच्या नंतरचा दिवस
६८) मत्सर
६९) वाळवू ठेवलेली पालेभाजी
७०) नाविकदल

**उभे शब्द :-**
१) सूर्याचे एक नाव
२) जन्मापासून
३) ताठा, गर्व
४) हिरव्या विषारी सापाची जात
५) कंटाळवाणे (भाषण)
६) आजोबांचे वडील
७) घरोघर जाऊन भविष्य सांगणारा
८) तापविणारा सूर्य
९) अवधान, चित्त
१४) नंतर
१६) मृताची क्रिया
१८) श्रीविष्णूचे बटु रूप
१९) कथिल व शिसे यांचा मिश्र धातू
२०) कापडी बैठक, सतरंजी
२२) ऐक्य, तादाम्य
२३) उणीव
२४) शेराचा अठवा भाग
२८) पळापळ
२९) जुळा
३१) फणसाचा एक प्रकार
३३) अगदी क्षुल्लक किमतीचे
३४) नवऱ्याच्या दुसऱ्या बायकोबद्दलचा द्वेष
३५) सैन्यदल
३६) मयूर
३८) लहान
३९) अंजन
४०) वचक, भीती
४१) शिर्डीचे संत
४२) बुटका
४४) कोकणातील एक दैवत
४६) जलदीने, झटकन
४७) मनाचा ओढा
४८) थारा
४९) सोबती, मित्र
५३) सततची हालचाल
५४) प्रेतावरचे वस्त्र
५६) कमीजबरोबरचे एक वस्त्र
५८) थप्पड
५८) आजोबा
६०) घोड्याची लाथ
६३) कुंभाराची भट्टी
६५) एक अधिक एक चतुर्थांश
६७) लक्ष्मीचे एक नाव

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# घाटलाडकी शेत शिवारात बिबट्याची दहशत

## वारोली जंगलात पुन्हा दोन वासराची शिकार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 13 )** - घाटलाडकी शेतशिवारात बिबट्याची दहशत पसरली असून वारोली जंगलात दोन जनावरांची पुन्हा शिकार झाली आहे.त्यामुळे शेतकरी व सामान्य नागरिक चिंतेत आहेत.

पंधरा दिवसांपासून बिबट्या फिरत असल्याच्या अनेक तक्रारी वन विभागाला शेतकऱ्याने दिल्या आहे. मात्र वन अधिकाऱ्यांनी जाणीव पूर्वक दुर्लक्ष केले. अखेर प्रथम पिठोडा जंगलात अजय इंगोले यांच्या शेतातील गाईची शिकार त्या बिबट्याने केली तरीही वन अधिकारी आपल्या गुर्मीतून बाहेर आलेले नाही.



आता आठवडा उलटल्यानंतर पुन्हा बिबट्याने वारोली शेत शिवारात शिकार केली आहे. संतोष भिकाजी गायन यांनी एका शेतात आपली जनावरे नेले असता रात्रीच्या वेळी जनावरांची शिकार केली. ही घटना गुरूवारी (दि.13) उघडकीस आली. या घटनेमुळे घाटलाडकी परिसरातील शेतकऱ्याच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या भागात ओलीताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याने शेतकऱ्यांना रात्री अपरात्री शेतात जावे लागते. 13 मार्च ला झालेल्या वासरांच्या शिकारीमुळे शेतकरी चिंतेत पडले आहे.

वन विभागाशी यासंदर्भात संवाद साधला असता आमचे कर्मचारी गस्तीवर आहे असे उडवा उडावी चे उत्तर दिले जात असून साधी मुनादी सुद्धा वन विभागाने अजून पर्यंत परिसरात दिली नाही. या बिबट्याचा शोध वन विभागाने तत्काळ लावला नाही तर जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# कुऱ्हा देशमुख शेत शिवारातील गव्हाची गंजी जाळून खाक



## कापणी नंतर लावली होती गंजी

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार( दि.13 )**- कुऱ्हा देशमुख शेत शिवारातील गव्हाच्या पिकाची कापणी करून लावल्या गंजीला आग लागल्याने राख रांगोळी झाल्याची घटना 12 मार्च रोजी दुपारी साडेतीन वाजता दरम्यान घडली.

मनोहर शेषरावजी चर्जन (रा. करजगाव ) असे नुकसानग्रस्त शेतकऱ्याचे नाव आहे.

चर्जन यांनी त्यांच्या मालकीच्या कुऱ्हा शेत शिवारातील खेल खुशाल मौजा 39 / 3 मधील शेतात गव्हाच्या पिकाची लागवड केली. मोठ्या मेहनती पिकाची फवारणी मशागत करून पीक घेतले. गव्हाचे पीकही मस्त दिमाखात उभे होते कापणीवर आल्याने गव्हाची कापणी करून ताडपत्री गव्हाच्या गंजी वाळण्याकरिता मारून ठेवल्या होत्या.तोच अचानक गव्हाच्या गंजी चे वरुन गेलेल्या वीज तारांमध्ये तांत्रिक बिघाड होऊन अचानक आगीचे गोळे गंजीवर पडले आणि गव्हाच्या गंजीने पेट घेतला. या घटनेमूळे शेतकऱ्याच्या हाता तोंडाशी आलेले गव्हाचे पीक आगीच्या भक्षस्थानी पडले. शेतकरी मनोहर चर्जन हे घरी असताना शेजारी असलेल्या शेतकऱ्यांनी त्यांना भ्रमणध्वनी वरुन त्यांना ही माहिती दिली. प्रत्यक्षदर्शी चे मते आम्ही शेतातच होते अर्धा फक्त जेवण करायला घरी आलो.आणि परत जातो तो दुरूनच धूर दिसल्याने गव्हाच्या गंजी जवळ जाऊन पाहिले असता गव्हाची गंजी जवळपास राख झाली होती.या आगीत जवळपास 30 ते 35 क्किंटल गव्हाचे नुकसान झाले आहे. ज्याचे बाजारमुल्य जवळपास 1 लाख रुपये आहे. शेतकऱ्यांच्या वाटाल्या आधीच आसमानी व सुलतानी संकटे आहे. त्यात आणखी भर घातली ती महावितरणचया ढिसाळ कारभाराने. घटनेची माहिती मिळताच महसूल चे अधिकारी कर्मचारी व महावितरण चे अधिकारी यांनी घटना स्थळाची पंचनामा केला आहे.

### महावितरण च्या ढिसाळ कारभारामुळे वारंवार घटना

महावितरण देखभालावर लाखो रुपये दरवर्षी खर्च करतात तरी तांत्रिक त्रुटी कश्या? हा सर्वांनाच पडलेला नेहमीचाच प्रश्न आहे. या ढीसाळ कारभारामुळे वारंवार अश्या घटना होत असल्याने समोर आले आहे. गेल्या वर्षी खरपी शेत शिवारातील राजेंद्र ठाकरे यांचा 8 एप्रिल 2024 रोजी लाखो रुपये किमतीचा गहू महावितरण चे ढिसाळ कारभाराने जळाला होता. त्याची नुकसान भरपाई अद्याप मिळाली नाही .राजेंद्र ठाकरे हे महावितरण कृषी कार्यालयात चकरा मारून थकले असून ते हतबल झाले आहे.

# मिस्टर ग्रीन भारत स्पर्धेत डॉ. संदीप कंठाळे ठरले उपविजेते

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )**- येथील प्रसिध्द दंतशल्य चिकित्सक डॉ. संदीप कंठाळे यांनी पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवरील सौंदर्य स्पर्धेत अमरावतीचा नावलौकीक वाढविला आहे.कोल्हापूर येथे झालेल्या या स्पर्धेत डॉ. कंठाळे उपविजेते ठरले आहेत.

गौरा मिस, मिसेस, मिस्टर ग्रीन भारत व भारत वस्त्र शृंगार 2025 तसेच गौरा यशश्री पुरस्कार 2025 (सिजन-7) ची अंतिम फेरी कोल्हापूर येथील हॉटेल हाईलॅण्ड क्लब येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या सौंदर्य स्पर्धेत संपूर्ण भारतातून 1500 पेक्षा जास्त स्पर्धक सहभागी झाले होते. अंतिम फेरीत 35 स्पर्धकांनी धडक मारली. त्यांचे पाच दिवसांचे ग्रुमिंग वर्कशॉप गगनबावडा कोल्हापूर येथे घेण्यात आले. ज्यामध्ये स्पर्धकांना देहबोली, संभाषण कला, रॅम्प वॉक, कॅट वॉक अशा विविध स्पर्धेतून जावे लागले. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील ज्युरींनी मूल्यांकन केले. या स्पर्धेमध्ये मिस्टर ग्रीन चा किताब जम्मू येथील संदीप रैना यांनी पटकाविला, तर अमरावतीचे डॉ. संदीप कंठाळे हे उपविजेते ठरले. तर नागपूर येथील आदित्य राजे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. डॉ. संदीप कंठाळे हे अमरावती शहरातील युवकांसाठी आयकॉन ठरले आहेत. यापूर्वीही त्यांनी अनेक स्पर्धा गाजविल्या आहेत. या स्पर्धेच्या आयोजक गौरी नाईक, जयंत पाटील, सिध्दार्थ नाईक यांनीही डॉ. कंठाळे यांच्या यशाबद्दल कौतुक केले असून यापुढेही अशा स्पर्धा राष्ट्रीय पातळीवर आयोजित केल्या जातील असे नमूद केले आहे.





## बिस्मील्लानगर तरुणाजवळून चाकु जप्त

**अमरावती** - नागपुरी गेट पोलिसांनी चाकू बाळगणार्या एका तरुणाला बिस्मील्लानगरातून अटक केली. अहेमद खान हसन खान (44, रा. बिस्मील्लानगर) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून चाकु जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई 11 मार्च रोजी पोलिस उपनिरीक्षक गजानन विधाते यांच्या पथकाने केली.

# महापालिकेत महिलेचा आत्महत्या करण्याचा प्रयत्न

## विषाची बाटली जप्त, महिला ताब्यात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** - बेनोडा येथील एका महिलेने अनुकंपा तत्त्वावर महापालिकेत नोकरी मिळण्यासोबतच वडिलोपार्जित घरात हिस्सा देण्याच्या मागणीसाठी आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यामुळे महापालिका प्रशासनाची बुधवारी 12 मार्चला स. 11.30 वाजताच्या सुमारास तारांबळ उडाली. महिला मनपा मुख्यालयात आल्यानंतर सुरक्षा रक्षकांनी पोलिसांना माहिती दिल्याने महिला पोलिस



महापालिकेत पोहोचल्या. त्यांनी महिलेच्या हातातून विषाची बाटली जप्त केली. नंतर त्या महिलेला डिटेन केले. विजया आठोर (आठवले) असे डिटेन केलेल्या महिलेचे नाव आहे. बेनोडा येथील शांताबाई उकरडा आठोर (आठवले) यांचे पती उकरडा आठवले हे मनपाच्या बडनेरा अतिक्रमण निर्मूलन विभागात कार्यरत होते. त्यांचे 1997 मध्ये निधन झाल्यानंतर महापालिकेने मुलगी म्हणून विजया आठोरला अनुकंपा तत्त्वावर नोकरी, शांताबाई यांना निवृत्ती वेतन देणे गरजेचे होते. परंतु, मुलगी विजया व पहिली पत्नी शांताबाई दोघींचा हक्क डावलला गेल्याने मुलगी विजयाने न्यायासाठी मनपा मुख्यालयात आत्महत्येचा प्रयत्न केला. महापालिकेत आत्मदहनाचा इशारा दिल्यामुळे मनपाने मुख्य द्वार बंद करून अग्नीशमन वाहनाची तैनाती केली होती. ही महिला 11.30 वाजता ज्यावेळी महापालिकेत पोहोचली त्यावेळी तिच्या हाती विषाची बाटली होती. मनपा प्रशासनाला ती आत्मदहन करणार असे वाटले त्यामुळे अगदी सकाळी 9.30 पासूनच मुख्यालयात सुरक्षा रक्षकांचा कडेकोट बंदोबस्त होता. त्यानंतर 11.30 पासून पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त दिसून आला.

# घराचा मलबा टाकला रस्त्यावर

## नागरिक त्रस्त, नगर परिषदेचे दुर्लक्ष

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.13 )** - स्वच्छ सुंदर वरुडची घोषणा देणार्या नगर परीषदेच्या ढिसाळ कारभारामुळे शहरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. अशातच शहराच्या विष्णू मंगल कार्यालयाच्या मागील परीसरात रहदारीच्या रस्त्यावर अज्ञाताने इमारत पाडल्यानंतर त्यातून निघालेला मलबा व कचरा थेट रस्त्यावर आणून टाकल्याने येथे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला असून या भागातील नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.



याबाबत नगरपरीषदेला 4 मार्चला रहिवाशांनी तक्रार दिली. मात्र अद्यापतरी नगर परीषदेने हा रस्ता स्वच्छ करण्यासाठी कोणतीही हालचाल केलेली नाही. परिणामी नगर परिषद प्रशासनाप्रती नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे. शहरात अनेक ठिकाणी बांधकामे सुरु आहे. नगरपरीषद प्रशासन काही अटी व शर्तीच्या आधारे बांधकाम करण्यास परवाणगी देते. परंतु परवाणगी मिळाल्यानंतर बांधकाम करणारे लोक त्या अटी व शर्ती पाळत नसल्याचे दिसून येते. विष्णु मंगल कार्यालय परीसरातीत प्रकार असाच आहे. येथील मुख्य रस्त्यावरच अज्ञाताने ट्रॅक्टरमधून इमारतीचा मलबा रस्त्याच्या मधोमध आणून टाकला आहे. याबाबत परिसरातील रहिवासी रविंद्र दोड यांनी नगर परीषद प्रशासनाला लेखी तक्रार दिली. मात्र प्रशासनाने त्याची दखल घेतली नाही. हा मलबा उचलून रस्ता मोकळा करण्यात यावा आणि येथे मलबा टाकणार्या व्यक्तीचा शोध घेवून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा नगरपरीषद प्रशासनाच्या विरोधात आंदोलनाचा इशाराही या परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

## अश्लिल शिविगाळ करून जीवे मारण्याची धमकी

**अमरावती** - जुन्या वादातून एका इसमाला अश्लिल शिविगाळ करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या घटनेची तक्रार मोहन नथ्थुलाल विश्वकर्मा (51, रा. मसानगंज) यांनी 11 मार्च रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी सोन्या चांदुरकर (40), संदिप बहिरे (35), प्रकाश शुक्ला, क्रिष्णा पानठेलेवाला) व पंज्या आकाळमोर (रा. अमरावती) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. या घटनेचा पुढिल तपास गाडगेनगर पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलीस कर्मचारी करीत आहे.

# अंगणवाडी सेविका व मदतनिसाच्या 27 पदाकरीता 429 अर्ज प्राप्त

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा ( दि.13 )** - एकात्मीक बालविकास सेवा योजना पंचायत समिती अचलपूर अंतर्गत 14 फेब्रुवारी रोजी अचलपूर तालुक्यातील अंगणवाडी सेवीका व मदतनिस पदाकरीता अर्ज मागविण्यात आले होते. यामध्ये 27 पदाकरीता 429 अर्ज प्राप्त झाले आहे.

अचलपूर तालुक्यातील बोरगांव दोरी, वासनी खुर्द, चौसाळा, येवता, नारायणपूर, अंबाडा कंडारी, नायगांव बोर्डी, वाघडोह, कासमपूर, रामापूर, हरम, शिंदी बु, इसापूर, तुळजापूर, देवगांव, बेलखेडा, सावळी दातूरा, कोल्हा, शहापूर येथील 21 अंगणवाडी सेवीका पदाकरीता तर भूगांव सावळी दातूरा, चमक बु., भीलोना, टवलार, निमदरी येथील 6 मदतनिस पदाकरीता अर्ज मागविण्यात आले होते. या



पदाकरीता शैक्षणिक अर्हता 12 वी पास अशी ठेवण्यात आली होती. 80 गुणापर्यंत शैक्षणिक व विविध प्रमाणपत्रांचा समावेश करण्यात आला. तर 20 गुण हे विधवा किंवा अनाथ, अनुसुचित जाती जमाती, ओबिसी, दुर्बल घटक व घटक व अनुभव असणाऱ्या उमेदवारांकरीता निश्चीत करण्यात आले आहे. या पदभरती संदर्भात अचलपूर पंचायत समिती येथील एकात्मीक बाल विकास सेवा योजना कार्यालयात भरती पारदर्शक, कुणीही आर्थीक व्यवहार करू नये. अंगणवाडी सेवीका व मदतनीस पदभर्तीची प्रक्रिया सुरू आहे. या पदभर्ती दरम्यान काही दलाल फसवणूकीच्या उद्देशाने आर्थीक व्यवहार करत नोकरी लावून देतो अशी सांगुन फसवणूक करू शकतात. त्यामुळे अर्जदारांनी अशी मागणी झाल्यास तत्काळ पंचायत प्रशासनाला माहिती द्यावी. ही भरती पारदर्शक पध्दतीने केली जाणार आहे. असे आवाहन अचलपूर गटविकास अधिकारी सुधिर अरबट यांनी केले आहे.

# शकुंतला रेल्वेमार्ग ब्रॉडगेज करा!

## 23 मार्चला चक्काजाम ■ शकुंतला बचाव समितीचे आंदोलन



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.13 )**- गेल्या सात वर्षांपासून शकुंतला रेल्वे बंद आहे. या मार्गाचे ब्रॉडगेज मध्ये रुपांतर करण्यात यावे या मागणीसाठी संघर्ष करणार्या शकुंतला बचाव सत्याग्रह समितीने आत त्याकरिता 23 मार्च रोजी शहीद दिनाच्या दिवशी अचलपूर येथे चक्का जाम आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. समितीची सलग 7 व्या वर्षातील 33 वी आढावा बैठक पार पडली. या बैठकीत विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आंदोलनाच्या पुढील रणनीतीवर सविस्तर चर्चा झाली. समितीने प्रशासनाला आज बुधवारी याबाबत लेखी पूर्वसूचना देवून 23 मार्चला चक्का जाम आंदोलन करणार असल्याचे कळविले आहे.

अचलपूर ते मूर्तिजापूर दरम्यान धावणारी शकुंतला नॅरोगेज रेल्वे अचानक बंद झाली. तब्बल सात वर्षांपासून ती पुन्हा सुरू करण्यासाठी संघर्ष सुरू आहे. ही रेल्वे ब्रॉडगेजमध्ये रूपांतरित झाली, तर हा संपूर्ण परिसर आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या अधिक विकसित होईल. या मागणीसाठी 30 पेक्षा अधिक आंदोलने आतापर्यंत करण्यात आली आहेत. राष्ट्रपती, पंतप्रधान, रेल्वेमंत्री आणि राज्य सरकारकडे वारंवार निवेदने पाठवण्यात आली आहेत. मात्र, अजूनही शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. शासनाने 21 मार्चपर्यंत शकुंतला रेल्वेच्या ब्रॉडगेजसाठी निर्णय घेतला नाही, तर 23 मार्चला अचलपूर येथील चांदूर नाका, अमरावती मार्गावर चक्का जाम आंदोलन करण्यात येईल. शांततेच्या मार्गाने सत्याग्रह करूनही सरकारने दुर्लक्ष केल्याने आता हा कठोर निर्णय घेण्यात आल्याचे सत्याग्रहींनी स्पष्ट केले आहे.

### मुख्यमंत्र्यांना पाठविले निवेदन

हे आंदोलन शांततेत होणार असले, तरी प्रशासनाने योग्य वेळी दखल घ्यावी, यासाठी 12 मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावतीमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. शकुंतला रेल्वे ही केवळ प्रवासी वाहतुकीपुरती मर्यादित नसून, हा लाखो लोकांच्या प्रगतीचा मार्ग आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरातील नागरिक, व्यापारी, विद्यार्थी आणि विविध संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा द्यावा व आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी व्हावे, असे आवाहन शकुंतला बचाव सत्याग्रह समितीने केले आहे. आढावा बैठकीत शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीचे योगेश खानझोडे, राजा धर्माधिकारी, राजेश अग्रवाल, दिपा तायडे, दयाराम चंदेल, राजेंद्र पांडे, किरण गवई, एस. बी. बारखडे, विजय गोंडचवर, राजेंद्र जयस्वाल, वसंतराव धोबे, संजय डोंगरे उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

**अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील ( कु. एस.एम. जाधव ) सह. दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. ७८/२०२५ ने.ता. १७/०४/२०२५

दिलीप नारायणराव माहुलकर वय ५३ वर्षे धंदा- शेती
रा.मुऱ्हा बु. ता.अंजनगांव सुर्जी जि. अमरावती
ह.मु. उमरी अकोला ता.जि. अकोला ... अर्जदार

**विरूद्ध**

निरंक .... गैरअर्जदार

याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील नामे नारायण बाजीराव माहुलकर यांचा दिनांक १४/०९/२०२२ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | प्रमिला नारायणराव माहुलकर | वय ७४ वर्षे | पत्नी |
| २ | दिलीप नारायणराव माहुलकर | वय ५३ वर्षे | मुलगा |
| ३ | दिपक नारायणराव माहुलकर | वय ५१ वर्षे | मुलगा |
| ४ | गजानन नारायणरा माहुलकर | वय ४९ वर्षे | मुलगा |
| ५ | सिमा गोविंदराव शिरपुरकर | वय ४८ वर्षे | मुलगी |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

नारायणराव बाजीराव बाहुलकर हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५/०३/२०२५ रोजी माझे सहीने व न्याययाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशासार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी**
**चांदूर बाजार**

## जाहीर नोटीस

**अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील ( कु. एस.एम. जाधव ) सह. दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. ८२/२०२५ ने.ता. २३/०४/२०२५

हर्षतोष वसंतराव बोबडे वय ३३ वर्षे धंदा- नोकरी
रा. पो. अंजनगांव सुर्जी ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती
ह.मु. प्लॉट नं.४४ सेक्टर नं.३५ ई खारघर रायगड ... अर्जदार

**विरूद्ध**

निरंक .... गैरअर्जदार

याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील नामे वसंत नारायण बोबडे यांचा दिनांक ०१/०१/२०१७ रोजी मृत्यू झाला आहे व आई नामे शोभा वसंत बोबडे यांचा दिनांक २१/०५/२०२३ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | आशुतोष वसंत बोबडे | वय ४१ वर्षे | मुलगा |
| २ | हर्षतोष वसंतराव बोबडे | वय वर्षे | मुलगी |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

वसंत नारायण बोबडे, शोभा वसंत बोबडे हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत शोभा वसंत बोबडे यांचे नावे मौजा अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील नझूल शिट नं. १७ सी. प्लॉट नं. १७/२/क्षेत्र १२८.८१ असून याची अंदाजे बाजारभाव किंमत रूपये २०,०००/- आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/०३/२०२५ रोजी माझे सहीने व न्याययाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशासार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी**
**चांदूर बाजार**

## जाहीर नोटीस

**अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील ( कु. एस.एम. जाधव ) सह. दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. ८०/२०२५ ने.ता. १७/०४/२०२५

सतिश शंकर तायडे वय ४७ वर्षे धंदा- मजुरी
रा. वनोजा, पो. चिंचोली बु. ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती ... अर्जदार

**विरूद्ध**

निरंक .... गैरअर्जदार

याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील नामे शंकर राजाराम तायडे यांचा दिनांक २१/०८/२०२४ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | मंजुळा शंकर तायडे | वय ७७ वर्षे | पत्नी |
| २ | सतिश शंकर तायडे | वय ४७ वर्षे | मुलगा |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

शंकर राजाराम तायडे हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५/०३/२०२५ रोजी माझे सहीने व न्याययाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशासार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी**
**चांदूर बाजार**

## जाहीर नोटीस

**अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील ( कु. स्नेहा रा. जाधव ) सह. दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. ७७/२०२५ ने.ता. १५/०४/२०२५

निजामोद्दीन इस्लामोद्दीन वय ३६ वर्षे धंदा- मजुरी
रा. खिडकीपूरा, अंजनगांव सुर्जी ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती ... अर्जदार

**विरूद्ध**

निरंक .... गैरअर्जदार

याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील नामे इस्लामोद्दीन शफीयोद्दीन यांचा दिनांक २३/१०/२०२४ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराची आई नामे हमीदा बी इस्लामोद्दीन यांचा दिनांक १७/०८/२०२२ रोजी मृत्यू झाला आहे. नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | निजामोद्दीन इस्लामोद्दीन | वय ३६ वर्षे | मुलगा |
| २ | मोईनोद्दीन इस्लामोद्दीन | वय ३० वर्षे | मुलगा |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

इस्लामोद्दीन शफीयोद्दीन, हमीदा बी इस्लामोद्दीन हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/०३/२०२५ रोजी माझे सहीने व न्याययाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशासार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी**
**चांदूर बाजार**

# अस्मिता

# कलोपासक दुलारीजी

**यंदाचा अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी स्वदेशी साडी परिधान केल्याचे तुमच्या नजरेस आले असेल. पण या साडीत काहीतरी खास होते कारण पद्मश्री पुरस्कार विजेत्या दुलारी देवी यांनी भेट दिलेली ही साडी होती. तेव्हा पद्मश्री विजेती दुलारी देवी या आजच्या मानिनीविषयी सविस्तर जाणून घेऊ या.**



एके काळी दुलारी देवींना दोन वेळचे जेवणही मिळत नसे. त्यांचे प्रारंभीचे आयुष्य अतिशय कष्टप्रद होते. पण असे असूनही त्यांच्याकडे धाडस आणि श्रद्धा या गुणांची कमतरता नव्हती. त्याआधारे त्यांनी पुढचा सगळा संघर्ष पार केला आणि मोठे नाव मिळवले. बिहार राज्यातील मधुबनी जिल्ह्यातील राठी गावातील रहिवासी दुलारी देवी, मिथिला चित्रकलेसाठी पद्मश्री मिळवणाऱ्या तिसऱ्या महिला आहेत. अतिशय प्रतिकूल परिस्थिती असतानाही त्यांनी आपल्यातील प्रतिभेला ओळख मिळवून दिली. त्याचमुळेच आज मधुबनी कला केवळ देशातच नाही तर परदेशातही लोकप्रिय झाली आहे. दुलारी देवी यांनी आतापर्यंत सात हजारांहून अधिक मिथिला चित्रे काढली आहेत.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे त्यांचा जन्म अत्यंत गरीब मच्छीमार कुटुंबात झाला. लहान असताना पालकांसोबत मासेमारीलाही जावे लागत असे. मग खर्च भागवण्यासाठी लहानग्या दुलारीनेही काम करायला सुरुवात केली. पुढे लग्न १२ व्या वर्षीच पालकांनी तिचे लग्न लावून दिले. परंतु सासरीही गरिबीने तिला सोडले नाही. लग्नाच्या सात वर्षांनंतर मुलीच्या मृत्यूच्या दुःखाने तिने सासरचे घर सोडले आणि पुन्हा आईवडिलांच्या घरी परतली. त्यानंतर दुलारी देवीच्या संघर्षाला नव्याने सुरूवात झाली. घर चालवण्यासाठी आणि भूक भागवण्यासाठी घरोघरी जाऊन झाडण्या-पुसण्याचे काम करत असताना त्या एका मिथिला कलाकाराच्या घरीही जात असत. अशाप्रकारे त्यांचा संपर्क प्रसिद्ध मिथिला चित्रकार श्रीमती करपुरी देवी यांच्याशी झाला. त्यांची चित्र पाहून दुलारी देवींच्या मनातही मिथिला चित्रकला शिकण्याची इच्छा निर्माण झाली आणि हळूहळू शिकायला सुरुवात केली. आधी त्यांनी अंगणात रंगकाम करायला सुरुवात केली. कलेच्या माध्यमातून मच्छीमार समुदायाचे जीवन, विधी आणि सण तसेच शेतकरी, कामगार आणि शेतात काम करणाऱ्या गरीब लोकांच्या दुःखाचे चित्रण केले. अशाप्रकारे करपुरी देवीच्या मदतीने दुलारी देवींना मिथिला चित्रकलेचे चांगले ज्ञान मिळाले आणि त्यांच्या हातातील झाडूची जागा पेंटिंग ब्रशने घेतली. त्यांची मिथिला चित्रे इतकी लोकप्रिय झाली की माजी राष्ट्रपती स्वर्गीय एपीजे अब्दुल कलाम यांच्याकडूनही प्रोत्साहन मिळाले. याशिवाय, पाटण्यातील बिहार संग्रहालयाच्या उद्घघाटनानिमित्त नितीश कुमार यांनी दुलारी देवी यांना खास आमंत्रित केले होते. या कार्यक्रमात नदीच्या पूजेचे दृश्य दर्शविणाऱ्या दुलारी देवीजींनी रेखाटलेल्या चित्राला विशेष स्थान देण्यात आले होते. दुलारी यांना २०१२-१३ मध्ये राज्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. दुलारी देवीचे चरित्र आणि कलाकृतींना गीता वुल्फच्या 'फॉलोइंग माय पेंट ब्रश' या पुस्तकातही विशेष स्थान मिळाले. त्यांची जीवनकथा आणि चित्रे मार्टिन ले कॉस यांच्या फ्रेंच भाषेतील 'मिथिला' या पुस्तकातही समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यांच्या चित्रांना 'सतरंगी' नावाच्या पुस्तकातही स्थान मिळाले आहे. आज ५३ वर्षीय दुलारी देवी अनेक महिलांना या कलेची शिकवण देत आहेत. या रुपाने ही कला जिवंत ठेवण्याचे मोठे काम करणाऱ्या मानिनीला मानाचा मुजरा.

मानिनी



# मांदियाळी, भक्तांची की चोरांची

देशातच नव्हे तर जगभर गाजलेल्या कुंभमेळ्याची चर्चा आणखी बराच काळ सुरू राहणार आहे. हा धार्मिक सोहळा अध्यात्मिक भावनेने, चांगल्या संयोजनाने, प्रचंड जनसमुदायाच्या एकत्रित येण्याने गाजला त्याचप्रमाणे काही अयोग्य कृतींचीही यावेळी चर्चा झाली. उदाहरणार्थ, महाकुंभ मेळ्यात महिलांचे स्नान करतानाचे व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड झाल्याची बाब अतिशय गांभीर्याने चर्चेत आली. पोलिसांनी या आरोपींवर कडक कारवाई केली असली तरी मुळात असे प्रकार घडलेच कसे, हा प्रश्न उरतो.



या आरोपींनी 'टेलीग्राम' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर रुग्णालयांमध्ये महिलांची तपासणी करणाऱ्या डॉक्टरांचे व्हिडिओ शेअर केले होते. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथील रहिवासी असणाऱ्या आरोपी चंद्र प्रकाशने 'सीपी मोंडा' नावाचा एक यूट्यूब चॅनल सुरू केला होता आणि त्याच चॅनलवर महाकुंभमेळ्यात महिला स्नान करत असल्याचे व्हिडिओही अपलोड केले होते. यानंतर हे व्हिडिओ इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरही व्हायरल झाले. संबंधित आरोपी महिलांचे आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करून पैसे कमविण्याचा कट रचत असल्याचेही आता समोर आले आहे. आधी या आरोपींनी राजकोटमधील एका रुग्णालयातून डॉक्टरांकडून महिला रुग्णांच्या तपासणीचे व्हिडिओ हॅक केले होते. व्हिडिओंमध्ये महिला रुग्णांची रुग्णालयाच्या खोलीत महिला डॉक्टरांकडून तपासणी केली जात असल्याचे किंवा नर्स त्यांना इंजेक्शन देत असल्याचे दाखवण्यात आले होते. हे व्हिडिओ समाजातील वाढत्या विकृतीप्रमाणेच महिलांच्या सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह निर्माण करतात. पोलीस या प्रकरणाची सखोल चौकशी करतीलच मात्र समाजाच्या संवेदनशीलतेकडे दुर्लक्ष करून सायबर गुन्हेगार लोकांच्या गोपनीयतेचे उल्लंघन कसे करत आहेत याचे हे उदाहरण आहे. त्यामुळेच हे प्रकरण धसास लागणे आणि यापुढे असे प्रकार होणार नाहीत याची काळजी घेणे गरजेचे ठरते.

चर्चेत...





# कौनसी चाय हो जाए?

तुम्ही दिवसाची सुरूवात कशी करता, सकाळी काय खाता किंवा पिता यावर पुढचा सगळा दिवस अवलंबून असतो. त्यामुळेच सकाळी दूध घातलेला चहा न घेता सर्वोत्तम चहाचे सेवन करा आणि दिवसाची तजेलदार सुरूवात करा.

* पांढरा चहा सर्वात कमी प्रक्रिया केलेला असतो आणि त्याची चव सौम्य आणि नाजूक असते. त्यात कॅफिन कमी असले तरीही दिवसभर ताजेतवाने वाटते आणि शरीराला ऊर्जा प्रदान करते. या चहामध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स असतात जे त्वचेचे आरोग्य सुधारतात आणि शांततेची भावना वाढवतात. याशिवाय, ते हायड्रेशन देखील वाढवते.
* अर्ल ग्रे हा काळा चहा संत्र्याच्या सालीपासून बनवलेला असतो. स्वाभाविकच याला वेगळी आणि सुगंधी चव असते. त्यात सौम्य कॅफिन असते जे कॉफीपेक्षा अधिक ऊर्जावान बनवते परंतु तेवढी तीव्रता देत नाही. त्यामुळेच दिवसाची सुरुवात करण्यासाठी हा चहा एक उत्तम पर्याय असू शकतो.
* ग्रीन टीमध्येही कॅफिन कमी असते आणि ते शरीराला सौम्य प्रमाणात ऊर्जा देते. या चहामध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स असतात. ते मेंदूचे कार्य सुधारतात आणि चरबी कमी करण्यास मदत करतात. शिवाय ग्रीन टीचे सेवन हृदयाच्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर ठरू शकते.
* पेपरमिंट चहामध्ये कॅफिन नसते, परंतु दिवसाच्या सुरुवातीला ताजेतवाने वाटायचे असेल तर हा एक उत्तम पर्याय आहे. हा चहा पचन प्रक्रिया सुधारण्यास मदत करतो आणि मूड देखील सुधारतो.
* पारंपरिक काळा चहा अर्थात ब्लॅक टीचे सेवन केल्यास दिवसाच्या सुरुवातीला उर्जा मिळते. काळ्या चहामध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात जे तुमच्या चयापचयला चालना देतात आणि हृदयाच्या आरोग्यास हितकारी सिद्ध होतात. या चहाचे सेवन केल्याने तुमची सकाळ ताजेपणाने भरू शकते आणि आरोग्य देखील सुधारू शकते.

आरोग्यदायी...



# टेस्टी अँड यम्मी राईस

बाहेर जेवायला गेल्यावर बच्चे कंपनी ताव मारते ती राईसच्या वेगवेगळ्या प्रकारांवर... बिर्याणी, कर्ड राईस, पुलाव, दाल खिचडी, चायनिज फ्राईड राईस आदी प्रकार सर्वांनाच आवडतात. नेहमीच्या वरण-भातापेक्षा हटके चव असणारे हे प्रकार भुक भागवतात. त्याचबरोबर जडही होत नाहीत. पण प्रत्येक वेळी बाहेर जाऊन खाणं शक्य होत नाही. अशा वेळी घरीच चायनिज फ्राईड राईस बनवणं हे फार अवघड काम नाही. तुम्ही अगदी सहज चविष्ट फ्राईड राईस बनवू शकता. अर्थात हा राईस आपल्या भारतीय जिभेचे चोचले पुरवणारा असेल. त्याची स्टाईल इंडियन असेल. हा राईस बनवण्याआधी काही नियम लक्षात घ्या. यातील पहिला नियम म्हणजे फ्राईड राईस बनवताना भात मोकळा सळसळीत आणि थंड असायला हवा. तुम्ही रात्रीचा भातदेखील यासाठी वापरू शकता. अजीनोमोटो अथवा सोयासॉसचा वापर आपल्या चवीप्रमाणे करावा. फ्राईड राईसमध्ये साखरेचा वापर होतो. राईसला चांगला रंग मिळावा या दृष्टीनं ही साखर वापरली जाते. म्हणून शक्यतो ब्राऊन शुगरचा वापर करावा. फ्राईड राईससाठी भाज्या चिरताना त्या पातळ आणि लंबुळक्या चिराव्या. हे नियम पाळले तर तुमचा फ्राईड राईसही अगदी रेस्टॉरंटमध्ये मिळतो तसा होईल.

रसगंधा

**साहित्य :** एक वाटी बासमती तांदूळ, एक वाटी चिरलेलं गाजर, एक वाटी चिरलेला श्रावणी घेवडा, सहा बेबीकॉर्न, काळीमिरी पावडर, पातीसह कांदा, चार चमचे ऑलिव्ह ऑईल, तीन चमचे साखर, अजीनोमोटा आणि सोयासॉस आवडीप्रमाणे.



**कृती :** सर्वप्रथम तांदूळ अर्धा कच्चा शिजवून चाळणीत उपसून ठेवा. शितं मोकळी राहतील याची काळजी घ्या. त्यानंतर सगळ्या भाज्या धुवून घ्या. एका पॅनमध्ये तेल गरम करा. त्यात साखर घाला आणि साखरेवर सगळ्या भाज्या घालून परता. पॅनवर झाकण ठेवू नका. भाज्या जास्त शिजवू नयेत. त्यांचा करकरीतपणा टिकायला हवा. भाज्या अर्ध्या कच्च्या शिजल्यावर त्यात काळीमिरी पावडर आणि पातीसह चिरलेला कांदा मिसळा. सर्वात शेवटी मीठ घाला आणि त्यावर शिजलेला भात पसरवा. हलक्या हातानं हलवा. दोन मिनिटं वाफ येऊ द्या. झाला तुमचा चविष्ट फ्राईड राईस तयार.

# पादत्राणांच्या दुनियेत

दररोजच्या फॅशनमध्ये पादत्राणांचंही तितकंच महत्त्व आहे. पेहरावानुसार पादत्राणं घातली जातात. पण काही प्रकारच्या पादत्राणांची सध्या चलती आहे. ही पादत्राणं तुमच्याही वॉर्डरॉबमध्ये असायला हवी.



* स्टायलिश आणि क्लासी लूकसाठी तुम्ही पॉईंटेड टोजवाले शूज कॅरी करू शकता. पार्टी किंवा ऑफिस अशा दोन्ही ठिकाणी ते चालून जातील. पार्टीसाठी एंबेलिश्ड शूजचा पर्याय आहे. पादत्राणांचा हा प्रकार वेस्टर्न कपड्यांवर जास्त उठून दिसतो.
* शॉर्ट अँड लाँग ग्लॅडिएटर सँडल्सचा ट्रेंडही परत आलाय. यंदा या पादत्राणांची चलती असेल. तुमच्याकडील जुने ग्लॅडिएटर्स वापरता येतील किंवा नव्या स्टाईलचे विकतही घेता येतील. फ्लोरल प्रिंट ग्लॅडिएटर्स हा प्रकारही ट्राय करता येईल. केप्री, डेनिम्स, नी लेंथ स्कर्ट यावर ही पादत्राणं शोभून दिसतील.
* ऑक्सफर्ड शूजचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत. ब्राईट रंगापासून ब्राऊन, ब्लॅक, टॅन अशा रंगांमध्येही ते उपलब्ध आहेत.
* पादत्राणांचा आरामदायी पर्याय शोधत असाल तर क्रिस-क्रॉस सँडल्स निवडता येतील. ऑफिस किंवा कॅज्युअल ऑकेजनसाठी या सँडल्स चालून जातील. स्टाईल आणि कंफर्ट या दोन्हीचा मिलाफ या निमित्तानं साधता येईल.
* अलिकडे एंबेलिश्ड हिल्सवाल्या पादत्राणांची चलती असेल. पीप टोज, पॉईंटेड हिल्स, स्लीप ऑन्स अशा प्रत्येक प्रकाराच्या हिल्समध्ये हा ट्रेंड पहायला मिळेल. त्यामुळे पार्टीसाठी पादत्राणांची निवड करताना एंबेलिश्ड हिल्सचा पर्याय तुमच्याकडे आहे. हिल्सचे चाहते असाल तर हा ऑप्शन नक्की ट्राय करा.

अ‍ॅक्सेसरीज

# शरीराला नवतेज देण्यासाठी...

बॉडी रॅप' हा प्रकार बराच लोकप्रिय ठरतोय. बॉडी रॅपमुळे शरीराला नवतजेला मिळतो. फारच आरामदायी अनुभव असतो हा. ताण-तणावानंतर बॉडी रॅप करून घेतला तर अगदी मस्त, रिफ्रेशिंग वाटतं. शरीरातील विषारी द्रव्यं काढून त्वचेला नवतजेला देण्याचा दृष्टीनं बॉडी रॅपची रचना करण्यात आलीय. याला 'बॉडी एनव्हलपमेंट' असंही म्हटलं जातं. घरात एखादा समारंभ असो किंवा लग्नसोहळा, बॉडी रॅप करून तुम्ही मस्त ताज्यातवान्या, तजेलदार दिसू शकता. बॉडी रॅपमुळे त्वचेला निराळीच चमक येते. तुमच्या त्वचेची काळजी घेण्यात बॉडी व्रॅपची महत्त्वाची भूमिका आहे. थकवा दूर करण्यासाठी मरिन रॅपचा पर्याय निवडता येईल. स्लिमिंग रॅप्समुळे शरीर-ातलं अतिरिक्त पाणी आणि विषारी घटक निघून जातात. फॅट्स कमी करण्यासाठी तुम्ही मसाज करू शकता. रोझ रॅपमुळे त्वचेला नवतजेला मिळतो. शरीरातला ओलावा टिकून राहतो. अँटी एजिंग थेरेपीसाठी कॅव्हिअर रॅपचा पर्याय निवडता येईल. वॉडी रॅपसाठी मातीचा वापर केला जातो. बॉडी रॅपचे अनेक पर्याय आहेत.



* चॉकलेट रॅप या प्रकारात डार्क चॉकलेट ऑईलचा वापर केला जातो. हे तेल मातीत मिसळून पॅक तयार केला जातो. यासोबत बदामाचं तल, कोका पावडर तसंच जीवनसत्त्वांचा अर्क यात घातला जातो. या रॅपमुळे तुमचा मूड चांगला होतो. याचा सुगंध आणि इतर घटकांमुळे ताजतवानं वाटतं. यातील कोकाबटरमुळे त्वचा मॉईश्चराईझ होते.
* मड अँड क्ले रॅपही अनेक जणी करताना दिसतात. या रॅपला सुरूवात करण्याआधी थोडी माती अंगात मुरवली जाते. त्वचेला स्वच्छ करून विषारी घटक बाहेर टाकणं हा या रॅपचा मुख्य उद्देश असतो. या रॅपमुळे रक्ताभिसरण वाढतं. शरीरातलं अतिरिक्त पाणी बाहेर टाकलं जातं. यामुळे खूप हलकं वाटतं. यासाठी मातीचे वेगवेगळे प्रकार वापरले जातात. मग, तुम्हीही करणार का बॉडी रॅप?

बॉडीकेअर

स्मार्ट टिप्स

## न्यू स्टाईल



स्टायलिश ब्लाउज तुम्ही केवळ साड्यांवरच नव्हे तर इतर अनेक पोशाखांबरोबरही कॅरी करता येतो. तेव्हा तुमच्याकडेही ट्रेंडी आणि डिझायनर ब्लाउजचा चांगला साठा असेल तर ते आधुनिक आणि फ्यूजन लूकसाठी वेगवेगळ्या प्रकारे स्टाईल करून बघा. जसे की, तुम्ही हेवी वर्क असणारा ब्लाउज फ्लोई लाँग स्कर्टसोबत घालू शकता. हा लूक इंडो-वेस्टर्न फ्यूजनचे एक उत्तम उदाहरण आहे आणि लग्न किंवा कोणत्याही सणाच्या निमित्ताने तुम्ही तो वापरु शकता. तेव्हा चोली स्टाईल किंवा डीप नेक ब्लाउजसह प्लेटेड किंवा फ्लेअर्ड स्कर्ट घाला आणि स्टेटमेंट ज्वेलरीसह लूक खुलवा. त्याचप्रमाणे स्टायलिश ब्लाउज धोती पँटसोबत घालून तुम्ही त्याला एथनिक आणि वेस्टर्न ट्विस्ट देऊ शकता. पेप्लम ब्लाउज किंवा क्रॉप ब्लाउजसह धोती पँट घाला. त्यासह पारंपरिक कानातले घालून वेगळा आणि आकर्षक लूक मिळवा.

हेअर केअर

## केसांची वाढ खुंटलीये?



प्रत्येकीला लांब आणि जाड केस हवे असतात. पण त्यासाठी योग्य काळजी घेणे आणि उपाय करणे आवश्यक असते. केस चांगले वाढवण्यासाठी तुम्हाला काही प्रभावी उपाय करता येतील. उदाहरणार्थ, अंडी हे प्रथिनांचा चांगला स्रोत असल्याचे आपण जाणतो. तेव्हा त्याच्या साह्याने केसांची लांबी वाढवण्यासाठी एका अंड्याचा बलक अर्धा कप दह्यामध्ये मिसळा आणि मिश्रण केसांना मुळांपासून टोकांपर्यंत लावा. यामुळे केस गळणे कमी होईलच तसेच ते जाड आणि मजबूत होतील. केस वाढण्यासाठी तुम्ही कढीपत्ता आणि नारळाच्या तेलाचा वापरही करु शकता कारण कढीपत्ताही केसांच्या वाढीस मदत करतो. त्यासाठी आधी नारळाच्या तेलात कढीपत्ता चांगला उकळून घ्या. हे मिश्रण थंड झाल्यावर केसांच्या मुळांवर लावा आणि मालिश करा. नियमितपणे हा उपाय केल्यास केसांची लांबी वाढण्यास मदत करते.

पालकत्व

## मुलांचे मित्र होताना...

आजकाल मुलांमध्ये नैराश्याची समस्या वाढत असून याचा त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर वाईट परिणाम होताना दिसतो. मुलांचा मानसिक विकास योग्यरित्या होणे खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळेच त्यांच्याशी मोकळेपणाने बोलणे ठेवा. तुमच्याशी कोणत्याही समस्या किंवा चिंतेबद्दल बोलू शकतात, हा विश्वास मुलांच्या मनात निर्माण होणे गरजेचे आहे. मुलांचे मनोबल वाढवण्यासाठी त्यांच्या प्रत्येक समस्येकडे लक्ष द्या. त्यांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐका आणि टीका न करता आधार देत संवाद वाढवा. आपल्या भावना पालकांसाठी महत्त्वाच्या आहेत असा विश्वास वाटला तरच ते कोणत्याही समस्या तुमच्यासोबत शेअर करू लागतील.



## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### बुरा ना मानो...

१ बरसाद

निवडणुकीच्या काळात
आश्वासनांची खैरात होते
नाही भाळला मतदार
तर नोटांची बरसाद होते ..!

२. पाठिंबा

असंगाशी संग करुन पाहीला
गेम फीट होऊन नाही राहीला
आता कोणाला तरी
पाठिंबा देऊ
तेवढच क्रेडीट पदरात घेऊ ..!

३. धक - धक

परीक्षा येता जवळ
जीव करतो धक धक
वर्षभर आम्ही केली
कॉलेज कट्ट्यावर बकबक..!

४. रंग तरंग

नेते भ्रष्टाचारात दंग
आम आदमी झालाय तंग
नैतिकतेचा झालाय भंग
विरंगुळा म्हणुन खेळु या रंग ..!

५. चतुर मतदार

मतदार आता चतुर झाले
स्वागतास त्यांच्या आतुर झाले
जे जो देईल ते घेते झाले
आम्ही तुमचेच म्हणते झाले ..!

## विधिमंडळात लक्षवेधी लावण्याची धमकी देत

# पैसे उकळण्याचा डाव?

### आमदार परिणय फुकेंच्या आरोपाने खळबळ : ऑडिओ क्लिप देखील सादर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

गडचिरोली जिल्ह्यातील काही राईस मिल धारकरांवर राज्य सरकारच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या चुकांबाबत कारवाई झाली होती. तशाच कारवाया परत करण्याची धमकी देऊन सभागृहात लक्षवेधी लावून आम्ही तुमच्यावर कारवाई करू, आम्ही तुमची राईस मिल बंद करू, तुम्हाला जेलमध्ये टाकू, अशा प्रकारच्या धमक्या राईस मिल धारकांना दिल्या जात असल्याचा आरोप विधान परिषदेतील भाजप आमदार परिणय फुके यांनी केला आहे.

इतकेच नाही तर आमदार फुके यांनी याबाबत एजंट सोबत झालेल्या कॉलची ऑडिओ क्लिप देखील विधिमंडळात सादर केली. आता परिणय फुके यांच्या या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

भाजप आमदार परिणय फुके यांनी सादर केलेल्या ऑडिओ क्लिप मध्ये प्रश्न का लावायचा नाही? लावल्यानंतर काय होणार? अशा धमक्या या ऑडिओ क्लिप मध्ये देण्यात आल्या आहेत. विधानसभेत प्रश्न लावण्यासाठी नेत्यांच्या एजंट कडून पैशांचा व्यवहार होत असल्याचा आरोप या माध्यमातून करण्यात आला आहे.

विरोधी पक्षातील आमदार आणि त्यांचे सात ते आठ जवळचे कार्यकर्ते यामध्ये सहभागी असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र यात या संपूर्ण प्रकाराची चौकशी व्हावी, यासाठी या ऑडिओ क्लिप मुख्यमंत्र्यांकडे सोपवण्यात आल्या असल्याचे आमदार



फुके यांनी सांगितले. या ऑडिओ क्लिपची फॉरेनची चौकशी झाल्यानंतरच पोलिस कारवाई करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी देखील सांगितले आहे, अशी माहिती फुके यांनी दिली.

या ऑडिओ क्लिपची फॉरेन्सीक रिपोर्ट हातात येत नाही, तोपर्यंत सभागृहात कोणाचेही नाव न घेण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार फुके यांना केल्या आहेत.

या आधी देखील लक्षवेधी लावण्याच्या संदर्भात पैशाची देवाण-घेवाण झाली असल्याचा आरोप झाले आहेत. मात्र आता या ऑडिओ क्लिप मुळे पुन्हा एकदा या विषयाची जोरदार चर्चा रंगली आहे. विधानसभेत प्रश्न लावण्यासाठी नेत्यांचे एजंट आर्थिक व्यवहार करत असल्याचा खळबळजनक आरोप या माध्यमातून भाजपचे आमदार परिणय फुके यांनी केला आहे.

दरम्यान, हे प्रकरण विरोधकांवर बूमरँग होणार की? निव्वळ स्टंट आहे, हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

## गडचिरोलीतही वाघाची शिकार

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. १३ :

नक्षलप्रभावित गडचिरोली जिल्ह्यात देखील बहेलिया टोळीने वाघांची शिकार करून अवयवांची तस्करी केल्याचे समोर आले आहे. २०२३ मध्ये वाघांची शिकार केलेल्या फरार आरोपीपैकी पाच आरोपींना तब्बल पाच वषानंतर अटक करण्यात आली. यात एका महिला आरोपीचा समावेश आहे.

गडचिरोली जिल्ह्यातून वाघाची शिकार करुन अवयवांची तस्करी करणाऱ्या पाच आरोपींना हरियाणातून अटक करण्यात आली. गडचिरोली वनविभागाने हरियाणात जाऊन ही कामगिरी केली.

चातगाव वनपरिक्षेत्रातील आंबेशिवणी नियतत्रोत्रातील राखीव कक्ष क्र. ४१२ व ४१३च्या सीमेत सापळे लावून दोन वाघांची शिकार करण्यात आली होती. या वाघ शिकारीत वाघाचे कातडे व १७ किलो हाडे हे गुवाहाटी येथे आसाम वनविभाग, पोलीस व वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखेने संयुक्त कार्यवाही करुन पाच आरोपींना अटक केली व गुन्ह्याची नोंद केली.

जप्त केलेले वाघाचे अवयव हे गडचिरोली जिल्ह्यात शिकार करण्यात आलेल्या वाघांचे असलेले समजले. २३ जुलै २०२३ ला रात्री आंबेशिवणी गावात मुसाफिर म्हणून राहात असलेल्या हरियाणा व पंजाब राज्यातील लोकांच्या झोपड्यावर धाड टाकण्यात आली. पाच आरोपींना गुवाहाटीच्या कारागृहातून चौकशीसाठी ताब्यात घेतले. १७ आरोपी फरार होते.



गडचिरोली वनवृत्ताचे मुख्य वनसंरक्षक रमेश कुमार व गडचिरोली वनविभीगाचे उपवनसंरक्षक मिलिश दत्त शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक अंबरलाल मडावी यांनी चातगाव वनपरिक्षेत्र अधिकारी सुनील सोनटक्के यांच्या नेतृत्त्वात मोहीम आखली.

हरियाणा राज्यातील सोनीपट जिल्ह्यातील तेहाजबडोल या गावातून वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखेचे वन्यजीव निरीक्षक डॉ. प्रगतिश यांच्यासोबत वनविभाग गडचिरोलीच्या चमुने संयुक्त कार्यवाही करुन फरार आरोपी सुमनदेवी ११ मार्च २०२५ ला अटक करुन गडचिरोली येथील प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले.

१९ मार्चपर्यंत सात दिवसांची वनकोठडी सुनावण्यात आली. या कारवाईत वनपरिक्षेत्र अधिकारी सुनील सोनटक्के यांच्यासोबत वनपाल साईदास मडावी, वनपाल धनश्री दीकोंडावार, वनरक्षक हिना पदा यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## दोन घटनांमध्ये विवाहिता आणि अल्पवयीन मुलीवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी, वाशिम, दि. १३ :

हिंगोली जिल्ह्यात बासंबा पोलिस ठाण्यांतर्गत एका गावात विवाहितेला धमकी देऊन अत्याचार केल्याची तर सेनगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका अल्पवयीन मुलीला लग्नाचे अमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याची घटना घडली. या प्रकरणी बासंबा व सेनगाव पोलिस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे.

सेनगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका गावातील आखाड्यावरून गौरव करडीले याने एका अल्पवयीन मुलीस लग्नाचे अमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर त्यामुलीस पळवून नेले. पोलिसांनी गौरव विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

अन्य एका घटनेत गावातील विवाहितेला तिचा पती व मुलास जिवे मारण्याची धमकी देऊन लहु जाधव याने तिच्यावर अत्याचार केला. मात्र सदर घटना घरी कळाल्यानंतर आपला संसार मोडेल या भितीने तिने कुटुंबियांना सांगितले नाही. नंतर महिलेने कुटुंबियांना सांगितल्यानंतर त्यांनी थेट बासंबा पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी लहु जाधव याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

## पुन्हा स्वाईन फ्लूचा धोका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

देशात पुन्हा स्वाईन फ्लूचा धोका निर्माण झाला आहे. एच1एन1 व्हायरसचे संक्रमण वाढत आहे. देशातील आठ राज्यांमध्ये स्वाईन फ्लूचा प्रसार वेगाने होत आहे. जानेवारी 2025 मध्ये 16 राज्यांमधील 516 जणांना स्वाइन फ्लू झाला. त्यात 6 जणांचा मृत्यू झाला आहे.

स्वाईन फ्लूमुळे सर्वाधिक मृत्यू केरळमध्ये झाले आहेत. या ठिकाणी चार जणांचा मृत्यू जानेवारी महिन्यात झाला आहे. त्यानंतर कर्नाटक, हिमाचल प्रदेशात एक-एक जणाचा मृत्यू झाला आहे. राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्रच्या अहवालानुसार दिल्ली, कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडूमधील परिस्थिती गंभीर आहे.

तामिळनाडू, पुदुचेरी, केरळ, महाराष्ट्र, जम्मू-काश्मीर, गुजरात, कर्नाटक आणि दिल्ली या राज्यांमध्ये स्वाईन फ्लूबाबत निगराणी वाढवण्याचे आवाहन एनसीडीसीकडून करण्यात आले आहे. तामिळनाडूमध्ये 209, कर्नाटकात 76, केरळमध्ये 48, जम्मू आणि काश्मीरमध्ये 41, दिल्लीत 40, पुदुचेरीमध्ये 32, महाराष्ट्रात 21 आणि गुजरातमध्ये 14 रुग्ण आढळले आहेत. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला एनसीडीसीने अहवाल दिला आहे. त्या अहवालात म्हटले आहे की, 2024 मध्ये 20 हजार 414 लोकांना स्वाईन फ्लूचा संसर्ग झाला होता. त्यापैकी 347 जणांचा मृत्यू झाला. या अहवालानुसार, 2019 मध्ये सर्वाधिक 28,798 प्रकरणे नोंदवली गेली.

## चक्क प्लास्टिक पट्टीच्या सहाय्याने
## एटीएममधून १० हजार लांबवले

### दोन चोरट्यांना रंगेहात अटक

■ महासागर प्रतिनिधी
वणी, दि. १३ :

चोरटे चोरीच्या विविध शक्कल लढवू लागले आहेत. एटीएम मधून पैसे चोरी करण्याचा घाट चोरट्यांनी रचला. मात्र चोरी करीत असताना शिरपूर पोलिसांनी चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या.

एटीएम मधून पैसे चोरी करताना शिरपूर पोलिसांनी दोन चोरट्यांना रंगेहात अटक केली. ही कारवाई ११ मार्च रोजी करण्यात आली. या चोरट्यांनी याआधीही एटीएम मधून पैसे चोरी केल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

शिरपूर पोलिस स्टेशन हद्दीत चारगाव चौकी येथे हिताची कंपनीच्या एटीएम मधून चोरटे पैसे चोरी करण्याचा प्रयत्न करीत असल्याची माहिती शिरपूर पोलिसांना मिळाली. या माहिती वरून शिरपूर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठले. पोलिसांनी एटीएममध्ये जाऊन पाहिले असता तेथे दोन चोरटे प्लॅस्टिक पट्टीच्या साहाय्याने एटीएम मधून पैसे काढताना आढळून आले. एटीएम मधून पैसे चोरी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोनही चोरट्यांना पोलिसांनी रंगेहात अटक केली.

सुशिल वसंत तोडेकर (वय ३६) व नरेश रामदास घुगुल (वय ३३) दोघेही रा. बल्लारपूर, जि. चंद्रपूर अशी या पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी या दोनही चोरट्यांची आणखी कसून चौकशी केली केल्यानंतर त्यांनी २२ फेब्रुवारीलाही एटीएम मधून हीच शक्कल लढवून १० हजार रुपयांची चोरी केल्याची कबुली दिली.

## हरित सेनेने बनवला ५०० लिटर नैसर्गिक रंग



■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १३ :

होळी सणादरम्यान रसायन युक्त रंगाचा वापर टाळत पर्यावरण संवर्धनासाठी पर्यावरणपूरक रंगाचा वापर नागरिकांनी करावा, यासाठी हरित सेनेने पुढाकार घेतला आहे. यंदा होळीसाठी सुमारे ५०० लिटर नैसर्गिक रंग त्यांनी तयार केला आहे.

येथील राष्ट्रीय हरित सेना एडेड हायस्कूल बुलडाणा, सामाजिक वनीकरण विभाग बुलडाणा व जिल्हा उपवनसंरक्षक विपुल राठोड यांच्या संयुक्त विद्यमाने, मुख्याध्यापक धनंजय किंबहूने, वनपरिक्षेत्र अधिकारी तोंडीरायता यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम सुरू केली आहे. ही संस्था होळीदरम्यान हे रंग हळद, बीट, पालक, गुलाब, पानफुलं, फळांचे साल अशा नैसर्गिक घटकांपासून तयार करण्यात आले आहेत. हे रंग त्वचेसाठी सुरक्षित असून, पाण्यात सहज मिसळून जातात.

## लक्ष हटवण्यासाठी एकमेकांचे व्हिडिओ समोर

■ वृत्तसंस्था, बीड, दि. १३ :

संतोष देशमुख हत्या प्रकरणावरील लक्ष हटवण्यासाठी एकमेकांचे व्हिडिओ समोर आणले जात आहे, असा आरोप मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. कार्यकर्त्यांचे व्हिडिओ काढून राजकीय डाव टाकला जात आहे, असा आरोप त्यांनी केला आहे.

जरांगे पुढे बोलताना म्हणाले की, राजकीय लोकं जर एखाद्या प्रश्नामध्ये घुसले तर सामजिक प्रश्न सोडवण्यासाठी आमच्या सारख्या माणसांना अडचणी निर्माण होतात. हे लोकं मॅटर दाबण्यासाठी आतून ही व्हिडिओ बाहेर काढण्याची शाळा खेळू शकतात. मी तुझा व्हिडिओ दाखवतो, तु माझा व्हिडिओ दाखव, आता हे सुरू झाले आहे. थोड्या दिवसांत अनेकांचे व्हिडिओ समोर आणले जातील, हा सर्व गेम असल्याचे जरांगे म्हणाले.

## शासनाच्या निषेधार्थ पुरस्कार प्राप्त शेतकऱ्याची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १३ :

राज्य शासनाचा युवा शेतकरी पुरस्कार मिळालेल्या एका तरुणाने विषारी औषध प्राशन करून आपली जीवनयात्रा संपवल्याची खळबळजनक घटना बुलढाणा जिल्ह्यात घडली आहे.

शेतकऱ्याने आत्महत्येपूर्वी एक ३ पानांची सुसाईड नोट लिहिली आहे. त्यात त्यांनी शेतकऱ्यांना खडकपूर्णा जलाशयातून पाणी मिळत नसल्यामुळे शासनाच्या निषेधार्थ आपण हे पाऊल उचलत असल्याचे नमूद केले आहे. ऐन होळीच्या दिवशी घडलेल्या या घटनेमुळे मोठा संताप व्यक्त केला जात आहे.

कैलास अर्जुन नागरे असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांनी आज सकाळी देऊळगाव राजा तालुक्यातील शिवनी आरमाळ येथील आपल्या शेतात विषारी औषध प्राशन करून आपली जीवनयात्रा संपवली.




कैलास नागरे हे एक प्रगतीशील शेतकरी होते. त्यांना राज्य शासनाचा पुरस्कारही मिळाला होता. त्यांनी आज होळीच्या दिवशीच शेतकऱ्यांसाठी आत्महत्या केल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे.

बुलढाण्याचे पोलिस अधीक्षक विश्व पानसरे यांनी याची पुष्टी केली आहे. कैलास नागरे गत अनेक दिवसांपासून देऊळगाव राजा परिसरातील शेतकऱ्यांना खडकपूर्णा जलाशयातून पाणी मिळावे यासाठी लढा पुकारला होता. गत डिसेंबर महिन्यात त्यांनी 10 दिवसांचे अन्नत्याग आंदोलनही केले होते. पण प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले होते. अखेर त्यांनी आज टोकाचे पाऊल उचलत आपली जीवनयात्रा संपवली.

दुसरीकडे, कैलास नागरे यांच्या आत्महत्येमुळे या भागातील शेतकरी चांगलेच संतापलेत. त्यांनी या प्रकरणी पालकमंत्री व जिल्हाधिकारी घटनास्थळी येऊन दिवंगत कैलास नागरे यांच्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन देईपर्यंत शेतातून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी घेऊन जाऊ देणार नाही अशी टोकाची भूमिका घेतली आहे. त्यामुळे येतील वातावरण तापले आहे.

पोलिस आंदोलक शेतकऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करत आहेत. पण ते आपल्या मागणीवर ठाम आहेत. त्यामुळे पेच निर्माण झाला आहे. या ठिकाणी परिसरातील हजारो शेतकरी जमले होते.

## दोन मुलांसह मातेची विहिरीत उडी घेत आत्महत्या

■ वृत्तसंस्था, सोलापूर, दि. १३ :

दोन आणि पाच वर्षांच्या मुलासह आईने विहिरीत उडी मारून आत्महत्या केल्याची घटना वांगी (ता. उत्तर सोलापूर) गावातील शेतात घडली. त्यापैकी दोघांचे मृतदेह सापडले. एका मुलाचा शोध सुरू आहे. दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात आणले.

चित्रा कविराज ऊर्फ दत्तात्रय हाके (२८) आणि स्वराज कविराज हाके (२) यांचा मृतदेह सापडला. पृथ्वीराज कविराज हाके (५) याचा शोध सुरू आहे. एक मुलगा गतिमंद व दुसऱ्यास ऐकू कमी येत असल्याच्या तणावातून चित्रा यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचा अंदाज आहे. चित्रा या पतीसह शेती करतात.

त्यांना दोन मुले व एक मुलगी. मोठा मुलगा पृथ्वीराज हा गतिमंद होता. त्याच्या उपचारावर मोठा खर्च झाला. दुसरा मुलगा स्वराज यास ऐकू कमी येत होते. त्याच्यावर उपचार सुरू होते. यामुळे चित्रा या मानसिक तणावात होत्या. मलाच अशी मुले का? असे त्या वारंवार म्हणत, अशी माहिती त्यांच्या भावाने दिली. चित्रा यांनी दोन मुलासह शेतातील ५० ते ६० फूट विहिरीत उडी घेतल्याची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी त्यांना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले. स्वराज याचा मृतदेह तरंगत असल्याने तो काढण्यात आला. मात्र विहिरीत पाणी जास्त असल्याने शोधकार्यात अडथळे येत होते. चित्रा यांचा मृतदेह बुधवारी सायंकाळी सहा वाजता बाहेर काढला.

## अर्थसंकल्पात आदिवासींवर अन्याय

### ५८ टक्के निधी कपात : ॲड. चटप यांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. १३ :

आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांच्या कल्याणासाठी दे. ग. सुखठणकर समितीने एकूण अर्थसंकल्पाच्या ९.०४ टक्के निधी देण्याची शिफारस केली होती. मात्र या शिफारसी डावलून राज्य सरकारने या अर्थसंकल्पात त्यापैकी केवळ ४२ टक्के निधी दिला.

निम्म्यापेक्षा जास्त म्हणजे ५८ टक्के निधीची कपात केली. राज्य सरकारने आदिवासींवर केलेला हा अन्याय आहे, अशा शब्दात शेतकरी संघटनेचे जेष्ठ नेते माजी आमदार ॲड. वामनराव चटप यांनी निषेध केला.

दुसरीकडे, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी अर्थसंकल्पात ४० टक्के निधी वाढवून दिला, असे सांगितले आहे. आदिवासींच्या निधीवरून आता आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत.

राज्यातील ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा इत्यादी तालुक्यात आदिवासी उपयोजना क्षेत्रात कुपोषण व त्यामुळे होणारे बालमृत्यू व गर्भात माता मृत्यू, शुद्ध पाणी पिण्याची गैरव्यवस्था, अपूरी दळणवळणाची साधने आणि सतत हा भाग अविकसित राहिल्यामुळे तत्कालीन राज्य सरकारने राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव दे. म. सुखठणकर यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमून आदिवासीबहुल भागातील विकासाकरिता शिफारसी करण्यासाठी कार्यक्षम व कार्यकक्षा ठरवून अहवाल देण्याचे जाहीर केले होते.

सुकठणकर समितीने राज्यातील असलेली आदिवासींची ९.०४ टक्के लोकसंख्या विचारात घेऊन अर्थसंकल्पात अर्थसंकल्पातील ९.०४ टक्के निधी आदिवासीच्या किमान गरजांकरिता, वैयक्तिक लाभांच्या योजनांसाठी व आदिवासी उपयोजना क्षेत्रातील माडा व मिनी माडा क्षेत्रातील आदिवासी कल्याणाकरिता ९.०४ टक्के निधी राज्याच्या अर्थसंकल्पातून देण्याची शिफारस केली होती आणि पुढे ती राज्य सरकारने स्वीकारून दरवर्षी आदिवासींच्या लोकसंख्येच्या आधारावर आदिवासी करिता ९.०४ टक्के निधी राखीव ठेवण्याची तरतूद केली जात होती.



अर्थसंकल्पात आदिवासी विभागासाठी ४० टक्के निधी वाढवून मिळाला आहे. यावर्षी २१ हजार ४९५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. निधी योग्य बाबींवर खर्च केला जाईल.
**डॉ. अशोक उईके**
आदिवासी विकास मंत्री

मात्र, यावर्षीच्या अर्थसंकल्पात आदिवासी भागात आदिवासींवर अन्याय झाला असून केवळ २१ हजार ४९५ कोटी रुपयांचीच तरतूद केली आहे. समितीच्या शिफारसीप्रमाणे ही तरतूद प्रत्यक्षात ५० हजार ७११.०५ कोटी रुपयांची असावयास हवी होती.

परंतु प्रत्यक्षात ती २१ हजार ४५० कोटी एवढीच म्हणजे जवळपास फक्त ४२ टक्के आहे. एकुण २९ हजार २१६ कोटी रुपये म्हणजे जवळपास ५८ टक्के कमी आहे. हा आदिवासींवर अन्याय आहे, असे ॲड. चटप यांनी म्हटले आहे.

## निवृत्त अधिकाऱ्याला सायबर अरेस्ट; ३० लाखांनी गंडवले

■ वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. १३ :

सायबर भामट्यानी सेवानिवृत्त अतिरिक्त उद्योग संचालकास डिजिटल अरेस्ट करून तब्बल ३० लाखांना गंडा घातला. याप्रकरणी सिडको पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर चोरट्यांनी बँकेतील एफडी मोडायला भाग पाडले.

अतिरिक्त उद्योग संचालक म्हणून सेवानिवृत्त झालेल्या विश्वनाथ लक्ष्मणराव राजळे यांना अज्ञात क्रमांकावरून कुरिअर कंपनीतून बोलत असल्याचा कॉल आला. त्यांनी तुमच्या नावाने पार्सल आले आहे, असे म्हणत अजय जैन यांच्याशी बोलण्यास सांगण्यात आले. त्याने, तुमच्या नावाने तैवान येथून एक पार्सल आले असून, ड्रग्ज आढळल्याने ते मुंबई येथील कस्टम विभागाकडून रोखून ठेवले आहे, असे सांगून दुसऱ्या व्यक्तीकडे फोन दिला. त्याने, तुमचे आधार कार्ड देशविघातक कार्यासाठी वापरल्याचे सांगत तुमच्या एफडीची रक्कम ऑनलाइन पोर्टलवर अपलोड करावी लागेले, अशी थाप मारली.

राजळे यांनी त्यांच्या खात्यावरील एफडीची ३० लाख ४० हजारांची रक्कम समोरच्या व्यक्तीने दिलेल्या एसबीआयच्या बँक खात्यावर पाठवली. त्यानंतर अर्ध्या तासाने राजाळे यांनी कॉल केला असता सायबर चोरट्यांनी धमकी दिली.

## वीज तारेच्या घर्षणाने बांबू वन जळून खाक

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १३ :

अचलपूर तालुक्यातील असदपूर येथे विद्युत तारेच्या घर्षणामुळे मोठी दुर्घटना घडली आहे. प्रगतिशील शेतकरी संजय तापडिया यांच्या शेतातील लाखो रुपयांचे बांबू वन जळून खाक झाले आहे.

तापडिया यांनी मौजा रायपूर येथील गट क्रमांक ३४ मधील ४ एकर शेतात तीन वर्षांपूर्वी बांबूची लागवड केली होती. पिकाचे उत्पादन मिळण्याच्या टप्प्यात असताना वीज तारेच्या घर्षणामुळे ठिणगी पडून संपूर्ण बांबू वन जळाले.

महत्त्वाची बाब म्हणजे तापडिया यांनी या



धोक्याची पूर्वसूचना दोन वर्षांपूर्वीच विद्युत विभागाला दिली होती. असदपूर उपकेंद्रातील कृषी रोहित्रावरून जाणाऱ्या एलटी लाईनमुळे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करून त्यांनी विद्युत ताराऐवजी केबल टाकण्याची मागणी केली होती.

तत्कालीन आमदार बळवंत वानखडे यांनीही अचलपूरचे कार्यकारी अभियंता आणि असदपूर उपकेंद्र अभियंता यांना पत्र देऊन केबल टाकण्याची विनंती केली होती. मात्र, अभियंत्यांनी दुर्लक्ष केले. आता या नुकसानीस महावितरण कंपनीला जबाबदार धरून नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे.